सत्यमेव जयते

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०१५-२०१६

## ग्रामविकास व जलसंधारण विभाग

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर
२०१५

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०१५-२०१६

## ग्रामविकास व जलसंधारण विभाग

# अनुक्रमणिका

## ग्रामविकास व जलसंधारण विभाग


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **१.** | **प्रस्तावना** | (सात) |
| | **ग्रामविकास विभाग** | |
| १. | ग्रामविकास व जलसंधारण विभाग (आस्थापना-आस्था-१) | १ |
| २. | अधिकारांचे पंचायत राज संस्थांकडे विकेंद्रीकरण (पंरा-१) | १ |
| ३. | ग्रामविकास व जलसंधारण विभागातील पंचायत राज संस्थाबाबतचा. रचनात्मक तक्ता (आस्था-३) | २ |
| ४. | ग्रामविकास विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना | ७ |
| **अ.** | **राज्य पुरस्कृत योजना** | |
| १. | नवनिर्मित जिल्हा परिषद/पंचायत समिती प्रशासकीय व निवासी इमारत बांधकामासाठी सहाय्यक अनुदाने (पंरा-७) | ७ |
| २. | ट्रायसेम व मिनी आयटीआय ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (योजना-३) | ७ |
| ३. | यशवंत पंचायत राज अभियान (पंरा-१) | ८ |
| ४. | यशवंत ग्राम समृध्दी योजना (योजना-६) | ९ |
| ५. | ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम (योजना-६) | ९ |
| ६. | ग्रामीण भागातील विकास कामांसाठी जिल्हा परिषदांना अनुदान (मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे) (योजना-६) | १० |
| ७. | पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना (पंरा-४) | १० |
| ८. | ई-पंचायत प्रकल्प (संग्राम) | १० |
| ९. | प्रशिक्षण योजना (योजना-४) | ११ |
| १०. | ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य यांचे मानधन व इतर भत्ते व ग्रामपंचायत ३७ कर्मचाऱ्यांचे किमान वेतन (पंरा-३) | १३ |
| ११. | राष्ट्रीय गौरव ग्रामसभा पुरस्कार (पंरा-३) | १४ |
| **ब.** | **केंद्र-राज्य पुरस्कृत योजना** | |
| १. | रस्ते, पूल दुरूस्ती व परीरक्षण (पंरा-८) | १५ |
| २. | महालक्ष्मी सरस प्रदर्शन व विक्री केंद्रे (योजना-१) | १५ |
| ३. | जिल्हा व तालुकास्तरीय कायमस्वरूपी विक्री केंद्रे बांधणे (योजना-१) | १५ |
| ४. | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा- प्रशासन (योजना-५) | १५ |
| ५. | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (योजना-३) | १६ |
| ६. | आजिविका कौशल्यवृध्दी विकास कार्यक्रम (ASDP) | १७ |
| ७. | इंदिरा आवास योजना (योजना-१०) | १८ |
| ८. | राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान (RGPSA) (योजना-४) | १९ |
| ९. | सौर उर्जा पथदिवे उभारणी कार्यक्रम (पंरा-६) | १९ |
| **क.** | **केंद्र पुरस्कृत योजना** | |
| १. | प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (योजना-८) | २० |
| २. | राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम (पंरा-६) | २० |
| ३. | मागासक्षेत्र अनुदान निधी योजना (पंरा-६) | २३ |
| ४. | मागासक्षेत्र विकास अनुदान निधी योजना (प्रशिक्षण) (योजना-४) | २३ |
| ५. | ग्रामीण प्रशिक्षण केंद्रांना बळकटीकरणाची योजना (योजना-४) | २३ |

**अनुक्रमणिका** (पुढे चालू)


| | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| २. **पंचायत राज संस्थांना स्वउत्पन्नविषयक बाबींसाठी अर्थसहाय्य** (वित्त-२, वित्त-३ व वित्त-४) .. .. | २४ |
| **जलसंधारण विभाग** | |
| १. लघु पाटबंधारे योजना .. .. .. .. .. .. | २९ |
| २. मृदसंधारण .. .. .. .. .. .. | ३७ |
| ३. **ग्रामविकास विभागातील योजनांबाबत माहिती दर्शविणारी परिशिष्टे/विवरणपत्रे/प्रपत्रे--** | |
| १. **राज्य पुरस्कृत योजनांची माहिती दर्शविणारी परिशिष्टे** | |
| १. जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रशासकीय इमारती बांधकामाचे विवरणपत्र (परिशिष्ट अ) (पंरा-७) .. .. .. | ६७ |
| २. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवासी इमारत बांधकामाचे विवरणपत्र (परिशिष्ट ब) (पंरा-७) .. .. .. | ६७ |
| ३. राज्यामध्ये सुरू असलेल्या ट्रायसेम केंद्राची ठिकाणे दर्शविणारे विवरणपत्र (परिशिष्ट क) (योजना-५) .. .. .. | ६८ |
| ४. राज्यामध्ये सुरू असलेल्या लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची ठिकाणे दर्शविणारे विवरणपत्र (परिशिष्ट ड ) (योजना-५) .. .. .. | ६९ |
| २. **केंद्र-राज्य पुरस्कृत योजनांची परिशिष्टे** | |
| १. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेतील जिल्हा व तालुका स्तरावरील मंजूर पदे (परिशिष्ट-अ)(योजना-५) .. .. .. | ७३ |
| २. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रशासन प्रतिबिंबित सुधारीत अंदाज सन २०१४-१५ (परिशिष्ट-ब) (योजना-५) .. .. | ७५ |
| ३. प्रतिबिंबित अर्थसंकल्पिय अंदाज सन २०१५-१६ (जि. ग्रा. वि. यं.) प्रशासन (परिशिष्ट-क) (योजना-५) | ७६ |
| ४. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना) भौतिक उद्दिष्टे (परिशिष्ट-ड) (योजना-३) .. .. .. .. .. | ७७ |
| ५. इंदिरा आवास योजने अंतर्गत झालेली आर्थिक व भौतिक प्रगती (परिशिष्ट-इ) (योजना-१०) .. .. .. | ७८ |
| ३. **केंद्र पुरस्कृत योजनांची विवरणपत्रे** | |
| १. राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रमासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात केलेली प्रतिबिंबीत तरतूद व जिल्हा परिषदांना उपलब्ध करून दिलेल्या निधीची तपशील (विवरणपत्र-१) (पंरा-६) .. .. .. | ७९ |
| २. मागास क्षेत्र अनुदान निधी योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात केलेली तरतूद व प्रत्यक्ष केलेल्या खर्चाचा तपशील (विवरणपत्र-२) (पंरा-६) .. .. .. | ८० |
| ४. **ग्रामविकास विभागातील योजनांसंदर्भातील माहिती दर्शविणारी प्रपत्रे** | |
| १. ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या आस्थापनेवरील राजपत्रित / अराजपत्रित पदांची माहिती (प्रपत्र-अ) (आस्था-१) .. | ८३ |
| २. जिल्हा परिषदांचा सुधारित अधिकारी व अराजपत्रित कर्मचारी आकृतीबंध (प्रपत्र-ब) (आस्था-८) .. .. .. | ८८ |
| ३. जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या लेख्यांसाठी कर्मचारी वर्ग (प्रपत्र-क) (आस्था-११) .. .. .. | ८९ |
| ४. विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचा सुधारीत आकृतीबंध (प्रपत्र-ड) (आस्था-९) .. .. .. | ९१ |

# ग्रामविकास विभाग

## प्रस्तावना

ग्रामविकास विभागाची स्थापना दि. १ मे १९६० रोजी झाली. तथापि, कालांतराने ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्र. रवका-१०९२/प्र.क्र. १२१७/०३ए, दिनांक १६-९-१९९२ अन्वये जलसंधारण विभाग ग्राम विकास विभागाशी संलग्न करण्यात येवून 'ग्रामविकास विभाग' हा 'ग्रामविकास व जलसंधारण विभाग' म्हणून संबोधिला जावू लागला.

या प्रकाशनात ग्राम विकास व जलसंधारण विभागामध्ये कार्यान्वित होणारी कार्ये व कार्यक्रमाबाबतचे २०१५-१६ चे 'कार्यक्रम अंदाजपत्रक' तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. या कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये, या विभागाने ज्या कार्यक्रमांसाठी निधीची विशिष्ट मागणी केली आहे. त्या सर्व विकास कार्यक्रमांचा समावेश आहे.

जिल्हा परिषदांचे व पंचायत समित्यांचे प्रशासन, 'प्रशासकीय विभाग' म्हणून 'महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१' मधील तरतुदीनुसार तसेच 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८' च्या तरतुदीनुसार, त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीचे प्रशासन, 'मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८' मधील तरतुदीनुसार करण्याची जबाबदारी 'ग्रामविकास व जलसंधारण विभागाची' आहे. त्याशिवाय या अधिनियमातील संबंधित कलमांनुसार या संस्थांकडे सुपुर्द केलेले कार्यक्रम व योजना कार्यान्वित करण्यासाठी निरनिराळी देय अनुदानेदेखील दिली जातात.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून कार्यान्वित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमांच्या विश्लेषणाच्या आधारे, सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकाचे खाली नमूद केल्याप्रमाणे दोन भाग केलेले आहेत.

(१) ग्रामविकास विभाग (खुद्द)
(२) जलसंधारण विभाग (खुद्द)

**(१) ग्रामविकास विभाग** (खुद्द) च्या अंतर्गत खाली दर्शविल्याप्रमाणे कार्यक्रम राबविले जातात :

**(अ) राज्य पुरस्कृत योजना**

१. नवनिर्मित जिल्हा परिषद/पंचायत समिती प्रशासकीय व निवासी इमारत बांधकामांसाठी सहाय्यक अनुदाने.
२. ट्रायसेम व मिनी आयटीआय ट्रेनिंग इन्स्टिट्यूट.
३. यशवंत पचायत राज अभियान.
४. यशवंत ग्राम समृध्दी योजना.
५. ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम.
६. ग्रामीण भागातील विकास कामांसाठी जिल्हा परिषदांना अनुदान (मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे).
७. पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना.
८. ई-पंचायत प्रकल्प (संग्राम).
९. प्रशिक्षण योजना.
१०. ग्राम पंचायतीचे सरपंच, सदस्य यांचे मानधन व इतर भत्ते व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे किमान वेतन.
११. राष्ट्रीय गौरव ग्रामसभा पुरस्कार

**(ब) केंद्र-राज्य पुरस्कृत योजना**

१. रस्ते, पूल दुरुस्ती व परिरक्षण.
२. महालक्ष्मी सरस प्रदर्शन व विक्री केंद्रे.
३. जिल्हा व तालुकास्तरीय कायमस्वरुपी विक्री केंद्रे बांधणे.
४. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रशासन.
५. स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान).
६. इंदिरा आवास योजना.
७. राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान (RGPSA)
८. सौर उर्जा पथदिवे उभारणी कार्यक्रम.

**(क) केंद्र पुरस्कृत योजना**

१. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना.
२. राष्ट्रीय बायोगॅस कार्यक्रम.
३. मागासक्षेत्र अनुदान निधी योजना.
४. मागासक्षेत्र विकास अनुदान निधी योजना (प्रशिक्षण).

**(२) जलसंधारण विभाग (खुद्द) या विभागांतर्गत**

१. लघु पाटबंधारे योजना (स्थानिक क्षेत्र)
२. मृदसंधारण

या योजना राबविल्या जातात.

जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती या पंचायत राज संस्थांचे कामकाज ज्या नियमानुसार किंवा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार चालते त्यासंबंधी विस्तृत माहिती संबंधित प्रकरणांमध्ये देण्यात आली आहे.

कार्यक्रम अंदाजपत्रकाच्या तंत्राचे स्वरूप लक्षात घेवून प्रत्येक कार्यक्रम, 'राज्य पुरस्कार योजना', 'केंद्र-राज्य पुरस्कृत योजना' अशा स्वतंत्र भागांत सादर केला आहे. या सर्व योजनांबाबतची सांख्यिकीय माहिती, या कार्यक्रम अंदाजपत्रकाच्या शेवटी परिशिष्ट, प्रपत्रे व तक्त्यांमध्ये देण्यात आली आहे.

कार्यक्रम अंदाजपत्रक म्हणजे 'मूल्यमापन अहवाल' नव्हे, तरीही ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून कार्यान्वित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे स्वरूप लक्षात घेवून उपलब्ध असलेल्या अद्ययावत माहितीच्या आधारे निरनिराळ्या कामांची कृती विषयक माहिती या प्रकाशनात देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

# ग्रामविकास व जलसंधारण विभाग (आस्थापना)

प्रधान सचिव (ग्रामविकास व पंचायतराज) हे ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे प्रशासकीय प्रमुख असून त्यांच्या अधिनस्त मंत्रालयीन स्तरावर सह सचिव, उप सचिव, अवर सचिव व इतर संवर्गातील (उप सचिव/अवर सचिव दर्जाचे) वर्ग-१ चे एकूण ४८ राजपत्रित अधिकारी, वर्ग २ चे ५६ राजपत्रित अधिकारी कार्यरत आहेत. तसेच, मंत्रालयीन स्तरावर ग्रामविकास व जलसंधारण विभागात वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गाची ३५१ पदे असे एकूण ४५५ अधिकारी/कर्मचारी ग्रामविकास व जलसंधारण विभागात कार्यरत आहेत. त्या व्यतिरिक्त पंतप्रधान ग्राम सडक योजनेचे राज्यस्तरीय नियंत्रण करण्यासाठी मुख्य अभियंत्याचे स्वतंत्र पद निर्माण केलेले आहे. त्यानुसार या विभागाचे प्रशासकीय कामकाज चालते. (प्रपत्र-अ)

जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती व पंचायती राज संस्था ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली येतात. त्यांचे कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली स्वतंत्र राज्यस्तरीय आयुक्तालय नाही. त्यामुळे या संस्थांवर देखरेख ठेवण्याचे, त्यात समन्वय साधण्याचे व नियंत्रण ठेवण्याचे काम संबंधित कायद्यान्वये व शासनाच्या प्रशासकीय आदेशानुसार विभागीय आयुक्त यांचेकडे सोपविण्यात आलेले आहे.

**अधिकारांचे पंचायत राज संस्थांकडे विकेंद्रीकरण**

दिनांक २० एप्रिल, १९९३ रोजी झालेल्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार अधिकारांचे पंचायत राज संस्थांकडे विकेंद्रीकरण करण्यासाठी घटनेतील अनुसूची ११ मधील २९ विषय पंचायत राज संस्थांकडे हस्तांतरित करावयाचे आहेत. त्यानुसार राज्य शासनाने निरनिराळ्या विभागाकडील आजपर्यंत २९ विषयांपैकी १६ विषयांच्या ९४ योजना, १५४८० कर्मचाऱ्यांसह जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केल्या आहेत. उर्वरित विषयांचे हस्तांतरणाची कार्यवाही सुरु आहे.

ग्रामविकास तथा पंचायत राज विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली राज्यात एकूण ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या आणि २८००१ ग्रामपंचायती आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी प्रत्येक जिल्हा परिषदेचे प्रशासकीय प्रमुख म्हणून व त्यासोबत केंद्र शासनाच्या योजना जिल्हा स्तरावर राबविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे अध्यक्ष म्हणूनही काम पाहतात. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व खात्यांचे प्रमुख अधिकारी कार्यरत आहेत. तसेच पंचायत समिती स्तरावर गटविकास अधिकारी हे प्रमुख असून राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीचा सचिव म्हणून ग्रामसेवक कार्यरत आहेत. याशिवाय राज्यातील सर्व जिल्हा परिषदा तसेच पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीत एकूण २८९१ अधिकारी व ३,५९,७६४ कर्मचारी कार्यरत आहेत. (प्रपत्र ब, क) या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत पंचायत राज व्यवस्थेचे कामकाज पाहिले जाते.

जिल्हा परिषदांचे व पंचायत समित्यांचे प्रशासन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीचे प्रशासन मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार चालविण्याची जबाबदारी ग्रामविकास व जलसंधारण विभागाची आहे.

पंचायती राज संस्थासाठी शासकीय नियंत्रक विभाग म्हणून ग्रामविकास व जलसंधारण विभागाची कार्ये स्थूलमानाने पुढीलप्रमाणे आहेत.

१. पंचायती राज संस्थाच्या वैधानिक, घटनात्मक व धोरणाविषयक प्रकरणासंबंधात कार्यवाही करणे आणि या संस्थांशी निगडित सर्वसाधारण अडचणी हाताळणे.

२. शासनाच्या कार्य नियमावलीनुसार सोपविण्यात आलेल्या योजनांची अंमलबजावणी करणे.

३. पंचायती राज संस्था व इतर शासकीय विभाग यांच्यातील समन्वय साधणे.

वर उल्लेखिलेल्या कर्तव्यांच्या अनुरोधाने खुद्द ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे कामकाज पुढीलप्रमाणे चालते.

* ग्रामविकास व जलसंधारण विभाग (खुद्द) संबंधी अंतर्गत कार्यालयीन व्यवस्था आणि आस्थापना.
* महाराष्ट्र विकास सेवा, घटना वर्गीकरण, सेवा प्रवेश इत्यादी.
* जिल्हा परिषदांची आस्थापनाविषयक प्रकरणे (स्टाफींग पॅटर्न, सेवा वर्गीकरण, नवीन जागा निर्माण करणे, सेवा प्रवेश इत्यादी.)
* जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांचे घटनात्मक कार्य, शिवाय वैधानिक आणि जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे दुरुस्त्याविषयक कार्य.
* विधानमंडळ सदस्यांची पंचायती राज समिती, विचारविनियम समिती आणि जिल्हा परिषदांचे वार्षिक अहवाल या संबंधीची कामे.
* जिल्हा परिषदेकडे व पंचायत समितीकडे असलेल्या वाहनासंबंधी त्याचप्रमाणे आयुक्तांच्या कचेऱ्यातील वाहनांसंबंधीची प्रकरणे.
* जिल्हा परिषदा, पंचायत समिती व ग्रामपंचायतीचे अधिकारी, कर्मचारी, बिनसरकारी अधिकारी, पदाधिकारी व सदस्य यांच्या प्रशिक्षणविषयक प्रकरणे.
* जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांच्या निवडणुका व त्याविषयक निर्माण होणारे विवाद/तंटे.
* पंचायतीराज संस्थांमार्फत राज्य पुरस्कृत, केंद्र-राज्य पुरस्कृत व केंद्र पुरस्कृत योजना राबविल्या जातात व त्याचे संनियंत्रण ग्राम विकास विभागाद्वारे केले जाते.

ग्रामविकास व जलसंधारण विभागातील पंचायतीराज संस्थांबाबतचा रचनात्मक तक्ता, ग्रामविकास विभागाचा प्रधान शीर्षवार सारांश (प्रस्तावित/अंदाजित) (तक्ता-१), ग्रामविकास व जलसंधारण विभाग आस्थापना, (प्रस्तावित/अंदाजित (तक्ता-२) आणि निदेशन व जिल्हा प्रशासन (प्रस्तावित/अंदाजित) (तक्ता-३) पुढीलप्रमाणे देण्यात आला आहे.

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

**रचनात्मक तक्ता**




(१) कृषि अधिकारी
(२) विस्तार अधिकारी (कृषि)
(३) विस्तार अधिकारी (पंचायत व समाज कल्याण)
(४) विस्तार अधिकारी (शिक्षण)
(५) विस्तार अधिकारी (आरोग्य/आरोग्य पर्यवेक्षक)
(६) कनिष्ठ अभियंता (बांधकाम/पाणीपुरवठा/जलसंपदा)

तक्ता १

ग्रामविकास विभाग

**प्रधान शीर्षवार सारांश (प्रस्तावित/अंदाजित)**

(रुपये हजारात)

| प्रधान शीर्ष |  | प्रत्यक्ष रकमा २०१३-१४ |  |  | अर्थसंकल्प २०१४-१५ |  |  | सुधारित अंदाज २०१४-१५ |  |  | अर्थसकल्पीय अंदाज २०१५-१६ |  |  |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
|  |  | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण |
| (१) |  | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **ए- महसूली लेख्यावरील खर्च-** |  |  |  |  |  |  |  |  |  |  |  |  |  |
| २०४९. व्याज प्रदान | भारित | 6917266 | .. | 6917266 | 8149085 | .. | 8149085 | 8372919 | .. | 8372919 | 8736421 | .. | 8736421 |
| २०५३. जिल्हा प्रशासन | भारित | .. | .. | .. | 100 | .. | 100 | .. | .. | .. | 100 | .. | 100 |
|  | दत्तमत | 24696572 | 145000 | 24841572 | 26271207 | 175000 | 26446207 | 28812400 | 175000 | 28987400 | 31663379 | 28000 | 31691379 |
| २२३५. सामाजिक सुरक्षा व कल्याण | भारित | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
|  | दत्तमत | 31960 | .. | 31960 | 32020 | .. | 32020 | 32020 | .. | 32020 | 32020 | .. | 32020 |
| २४१५. कृषिविषयक संशोधन व शिक्षण | दत्तमत | 90155 | .. | 90155 | 107492 | .. | 107492 | 99621 | .. | 99621 | 111739 | .. | 111739 |
| २५०१. ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम | दत्तमत | 10698 | 398680 | 409378 | .. | 521800 | 521800 | .. | 165000 | 165000 | .. | 948456 | 948456 |
| २५०५. ग्रामीण सेवायोजन | दत्तमत | .. | 343394 | 343394 | .. | 1057272 | 1057272 | .. | 1057272 | 1057272 | .. | 3119350 | 3119350 |
| २५१५. इतर ग्रामीण विकास कार्यक्रम | दत्तमत | 9118983 | 8434732 | 17553715 | 18197440 | 5995220 | 24192660 | 26326806 | 11573400 | 37900206 | 45112 | 2222290 | 2267402 |
| २८१०. अपारंपरिक ऊर्जा साधने | दत्तमत | .. | 138130 | 138130 | .. | 165955 | 165955 | .. | 165955 | 165955 | .. | 181770 | 181770 |
| ३०५४. मार्ग व पूल | दत्तमत | 9636025 | .. | 9636025 | 6325550 | .. | 6325550 | 7504750 | .. | 7504750 | 5108302 | 7630000 | 12738302 |
| ३४५१. सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा | भारित | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
|  | दत्तमत | 184676 | .. | 184676 | 223065 | .. | 223065 | 223778 | 12150 | 235928 | 252166 | 14000 | 266166 |
| ३६०४. स्थानिक संस्था व पंचायत राज | भारित | 5664675 | .. | 5664675 | 5600544 | .. | 5600544 | 6400544 | .. | 6400544 | 5800544 | .. | 5800544 |
| संस्था यांना नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे | दत्तमत | 9865544 | 167331 | 10032875 | 4948607 | 178430 | 5127037 | 7325524 | 168683 | 7494207 | 5861900 | 168000 | 6029900 |
| **एकूण ए-महसूली लेख्यावरील खर्च** | भारित | 12581941 | .. | 12581941 | 13749729 | .. | 13749729 | 14773463 | .. | 14773463 | 14537065 | .. | 14537065 |
|  | दत्तमत | 53634613 | 9627267 | 63261880 | 56105381 | 8093677 | 64199058 | 70324899 | 13317460 | 83642359 | 43074618 | 14311866 | 57386484 |
| **एकूण** | . . | 66216554 | 9627267 | 75843821 | 69855110 | 8093677 | 77948787 | 85098362 | 13317460 | 98415822 | 57611683 | 14311866 | 71923549 |
| **(बी)-भांडवली लेख्यावरील खर्च --** |  |  |  |  |  |  |  |  |  |  |  |  |  |
| ४५१५. इतर ग्रामविकास कार्यक्रम | भारित | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| यावरील भांडवली खर्च | दत्तमत | .. | 560000 | 560000 | .. | 497000 | 497000 | .. | 534168 | 534168 | .. | 497000 | 497000 |
| **एकूण बी-भांडवली लेख्यावरील खर्च** | भारित | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
|  | दत्तमत | .. | 560000 | 560000 | .. | 497000 | 497000 | .. | 534168 | 534168 | .. | 497000 | 497000 |
| **एकूण** | . . | .. | 560000 | 560000 | .. | 497000 | 497000 | .. | 534168 | 534168 | .. | 497000 | 497000 |

तक्ता १ (पुढे चालू)

ग्रामविकास विभाग

**प्रधान शीर्षवार सारांश (प्रस्तावित/अंदाजित)**

(रुपये हजारात)

| प्रधान शीर्ष | | प्रत्यक्ष रक्कम २०१३-१४ | | | अर्थसंकल्प २०१४-१५ | | | सुधारित अंदाज २०१४-१५ | | | अर्थसकल्पीय अंदाज २०१५-१६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण |
| (१) | | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **सी-ऋण शीर्षाखालील खर्च --** | | | | | | | | | | | | | |
| ६२१६. गृहनिर्माण कर्जे | दत्तमत | 5000 | .. | 5000 | 6000 | .. | 6000 | 6000 | .. | 6000 | 7000 | .. | 7000 |
| ७६१०. शासकीय कर्मचारी इत्यादीना कर्जे | दत्तमत | 20729 | .. | 20729 | 73040 | .. | 73040 | 32010 | .. | 32010 | 53000 | .. | 53000 |
| **एकूण सी-ऋण शीर्षाखालील खर्च** | भारित | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | दत्तमत | 25729 | .. | 25729 | 79040 | .. | 79040 | 38010 | .. | 38010 | 60000 | .. | 60000 |
| **एकूण** | . . | 25729 | .. | 25729 | 79040 | .. | 79040 | 38010 | .. | 38010 | 60000 | .. | 60000 |
| **स्थूल बेरीज-ग्राम विकास विभाग** | भारित | 12581941 | .. | 12581941 | 13749729 | .. | 13749729 | 14773463 | .. | 14773463 | 14537065 | .. | 14537065 |
| | दत्तमत | 53660342 | 10187267 | 63847609 | 56184421 | 8590677 | 64775098 | 70362909 | 13851628 | 84214537 | 43134618 | 14808866 | 57943484 |
| **एकूण** | . . | 66242283 | 10187267 | 76429550 | 69934150 | 8590677 | 78524827 | 85136372 | 13851628 | 98988000 | 57671683 | 14808866 | 72480549 |

तक्ता २

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

**आस्थापना (प्रस्तावित/अंदाजित)**

**(दोन) वित्तीय आवश्यकता :** (रुपये हजारात)

| वर्गीकरण | प्रत्यक्ष रक्कमा २०१३-१४ | | | अर्थसंकल्प २०१४-१५ | | | सुधारित अंदाज २०१४-१५ | | | अर्थसकल्पीय अंदाज २०१५-१६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | योजनेतर | योजनांतर्गत | एकूण | योजनेतर | योजनांतर्गत | एकूण | योजनेतर | योजनांतर्गत | एकूण | योजनेतर | योजनांतर्गत | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **(अ) कार्याचे वर्गीकरण** | | | | | | | | | | | | |
| (१) ग्रामविकास विभाग (प्रधानशीर्ष ३४५१) | 184676 | .. | 184676 | 223065 | .. | 223065 | 223778 | 12150 | 235928 | 252166 | 14000 | 266166 |
| (२) घरबांधणी व इतर अग्रिमे (प्रधानशीर्ष ७६१०) | 20729 | .. | 20729 | 73040 | .. | 73040 | 32010 | .. | 32010 | 53000 | .. | 53000 |
| एकूण (अ) स्थूल | 205405 | .. | 205405 | 296105 | .. | 296105 | 255788 | 12150 | 267938 | 305166 | 14000 | 319166 |
| वजा-वसूली | | | | | | | | | | | | |
| **एकूण (अ) निव्वळ** | 205405 | .. | 205405 | 296105 | .. | 296105 | 255788 | 12150 | 267938 | 305166 | 14000 | 319166 |
| **(ब) उद्दिष्टवार वर्गीकरण** | | | | | | | | | | | | |
| (१) वेतन | 171150 | .. | 171150 | 211105 | .. | 211105 | 211105 | .. | 211105 | 238537 | .. | 238537 |
| (२) अतिकालीक भत्ता | 213 | .. | 213 | 360 | .. | 360 | 360 | .. | 360 | 471 | .. | 471 |
| (३) दूरध्वनी वीज व पाणी शुल्क | 3689 | .. | 3689 | 4200 | .. | 4200 | 4200 | .. | 4200 | 4500 | .. | 4500 |
| (४) देशांतर्गत प्रवास खर्च | 1544 | .. | 1544 | 1807 | .. | 1807 | 1807 | .. | 1807 | 2600 | .. | 2600 |
| (५) विदेश प्रवास खर्च | 3135 | .. | 3135 | 50 | .. | 50 | 43 | .. | 43 | 53 | .. | 53 |
| (६) कार्यालयीन खर्च | 4644 | .. | 4644 | 5009 | .. | 5009 | 5809 | .. | 5809 | 5335 | .. | 5335 |
| (७) संगणक खर्च | 301 | .. | 301 | 464 | .. | 464 | 394 | 12150 | 12544 | 600 | 14000 | 14600 |
| (८) इतर प्रशासकीय खर्च | .. | .. | .. | 20 | .. | 20 | 17 | .. | 17 | 20 | .. | 20 |
| (९) व्यावसायिक सेवा | .. | .. | .. | 50 | .. | 50 | 43 | .. | 43 | 50 | .. | 50 |
| (१०) इतर खर्च | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| (११) ई-गव्हनर्स (संगणक खर्च) | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| (१२) घरबांधणी व इतर अग्रिम | 20729 | .. | 20729 | 73040 | .. | 73040 | 32010 | .. | 32010 | 53000 | .. | 53000 |
| एकूण (ब) स्थूल | 205405 | .. | 205405 | 296105 | .. | 296105 | 255788 | 12150 | 267938 | 305166 | 14000 | 319166 |
| एकूण (अ) निव्वळ | 205405 | .. | 205405 | 296105 | .. | 296105 | 255788 | 12150 | 267938 | 305166 | 14000 | 319166 |
| **(क) वित्त व्यवस्थेची साधने** | | | | | | | | | | | | |
| प्रधानशिर्ष (३४५१) | 184676 | .. | 184676 | 223065 | .. | 223065 | 223778 | 12150 | 235928 | 252166 | 14000 | 266166 |
| (७६१०) | 20729 | .. | 20729 | 73040 | .. | 73040 | 32010 | .. | 32010 | 53000 | .. | 53000 |
| एकूण (क) स्थूल | 205405 | .. | 205405 | 296105 | .. | 296105 | 255788 | 12150 | 267938 | 305166 | 14000 | 319166 |
| एकूण (क) निव्वळ | 205405 | .. | 205405 | 296105 | .. | 296105 | 255788 | 12150 | 267938 | 305166 | 14000 | 319166 |

तक्ता ३

निदेशन व जिल्हा प्रशासन

**(प्रस्तावित/अंदाजित)**

**(दोन) वित्तीय आवश्यकता : (२०५३)** (रुपये हजारात)

| वर्गीकरण | प्रत्यक्ष रक्कम २०१३-१४ | | | अर्थसंकल्प २०१४-१५ | | | सुधारित अंदाज २०१४-१५ | | | अर्थसकल्पीय अंदाज २०१५-१६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण | योजनेत्तर | योजनांतर्गत | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **(अ) कार्याचे वर्गीकरण --** | | | | | | | | | | | | |
| (१) जिल्हा आस्थापना (२०५३) | 24696572 | 145000 | 24841572 | 26271307 | 175000 | 26446307 | 28812400 | 175000 | 28987400 | 31663479 | 28000 | 31691479 |
| (२) ठेव संलग्न विमा योजना (२२३५-०६५२) सामाजिक सुरक्षा व ठेव कल्याण | 31960 | .. | 31960 | 32020 | .. | 32020 | 32020 | .. | 32020 | 32020 | .. | 32020 |
| (३) नुकसान भरपाई (३६०४) (भारित) | 5664675 | .. | 5664675 | 5600544 | .. | 5600544 | 6400544 | .. | 6400544 | 5800544 | .. | 5800544 |
| (दत्तमत) | 9865544 | 167331 | 10032875 | 4948607 | 178430 | 5127037 | 7325524 | 168683 | 7494207 | 5861900 | 168000 | 6029900 |
| (४) गृहनिर्माणसाठी कर्जे (६२१६) | 5000 | .. | 5000 | 6000 | .. | 6000 | 6000 | .. | 6000 | 7000 | .. | 7000 |
| (५) जिल्हा परिषद प्रशासकीय इमारातीसाठी कर्जे (६५१५) | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| (६) राज्य शासनाकडून जिल्हा परिषदांना अस्थायी अग्रिम (७६१५) | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| **एकूण (अ) निव्वळ** | 40263751 | 312331 | 40576082 | 36858478 | 353430 | 37211908 | 42576488 | 343683 | 42920171 | 43364943 | 196000 | 43560943 |
| वजा - वसुली | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| **एकूण (अ) निव्वळ** | 40263751 | 312331 | 40576082 | 36858478 | 353430 | 37211908 | 42576488 | 343683 | 42920171 | 43364943 | 196000 | 43560943 |

## ४. ग्रामविकास विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना :--

### अ) राज्य पुरस्कृत योजना-

#### १. नवनिर्मित जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रशासकीय व निवासी इमारतींच्या बांधकामासाठी सहायक अनुदान (लेखाशिर्ष २५१५ ००५३ व २५१५ १२५६) :--

७३ व्या घटनात्मक दुरुस्तीन्वये पंचायत राज संस्थांचे बळकटीकरण करावयाचे आहे. दारिद्र्य निर्मूलनाच्या व विकासाच्या अनेक शासकीय योजनांच्या यशस्वीरित्या अंमलबजावणीमध्ये पंचायत राज संस्थांचे आत मोठे योगदान राहणार आहे. त्यासाठी पंचायत समिती प्रशासकीय कार्यालय सुव्यवस्थेत असणे अगत्याचे आहे. यासाठी नवनिर्मित जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या प्रशासकीय व निवासी इमारतीच्या बांधकामाचा संपूर्ण खर्च राज्य शासनामार्फत केला जातो. सदर योजनेखाली प्रशासकीय व निवासी इमारत बांधकामाकरिता मागणी प्रमाणे/आवश्यकतेनुसार निधी अनुदानाच्या स्वरुपात सदर स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध करून दिला जातो.

माहे ऑक्टोबर, २०१४ अखेर प्रशासकीय इमारत बांधकामावरील दायित्व रु. १८६.५८ कोटी व निवासी इमारत बांधकामावरील दायित्व रु.२१.३६ कोटी इतके आहे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी प्रशासकीय इमारत बांधकामाकरिता रु. ४६.८६ कोटी व निवासी इमारत बांधकामासाठी रु. ९.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर असून, त्यापैकी वित्त विभागाने प्रशासकीय बांधकामासाठी रु. २८.११ कोटी व निवासी बांधकामासाठी रु. ५.४० कोटी इतकी तरतूद उपलब्ध करून दिली आहे. सन २०१५-१६ करिता प्रशासकीय इमारत बांधकामासाठी रु. ९०.०० कोटी व निवासी इमारत बांधकामाकरिता रु. ३०.०० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या प्रशासकीय व निवासी इमारत बांधकामांकरिता सन २००८-०९ ते २०१३-१४ या वर्षात मंजूर झालेली तरतूद, कामावर झालेला खर्च, उद्दिष्ट व साध्य या बाबतच्या तपशिलाचे परिशिष्ट अ आणि ब सोबत जोडण्यात आले आहे.

#### २. ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र व लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्रे :--

केंद्र शासनाने १ फेब्रुवारी, १९९९ पासून एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ट्रायसेम, ड्वाका, सिट्रा, दशलक्ष विहीर योजना व गंगाकल्याण योजना या ६ योजना एकत्रित करून नव्याने स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना सुरू केली आहे. ट्रायसेम ही योजना स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेत एकत्रित केल्यामुळे केंद्र शासनाकडून मिळणारा ५०% हिस्सा सदर योजनेसाठी बंद केला आहे व सदर योजना पुढे स्वतंत्रारित्या चालू होणार नाही, असे केंद्र शासनाने कळविल्यामुळे ट्रायसेम योजने अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या मूलभूत सुविधा विनावापर वाया जावू नये म्हणून राज्यातील ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र व लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्र व त्यामध्ये स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण यासाठी ७५ ते ९० टक्के राज्य शासनाच्या निधीतून व जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या वर्गवारीनुसार उपलब्ध होणाऱ्या एकूण उत्पन्नापैकी १० ते २५ टक्के निधीतून सुरू ठेवण्याबाबत दिनांक ८ डिसेंबर, १९९९ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने शासन निर्णय, क्र.ग्रायुप्र-१०९९/प्र.क्र. ६४३/४१, दिनांक ८ फेब्रुवारी, २००० अन्वये ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र व लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्र सुरू करणेबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर योजना ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत सुरू आहे. राज्यात एकूण ३० ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र व २९ लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यास मान्यता दिलेली असून सद्य:स्थितीत १८ ट्रायसेम केंद्रे व १९ लघु औद्योगिक प्रशिक्षण केंद्र संस्था सुरू आहेत. (माहिती सोबतच्या प्रपत्र-२(क), (ड)

ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र व लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्रात गट निदेशक, निदेशक लिपिक, शिपाई या पदांवर कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते व गट निदेशक, निदेशक हे कर्मचारी तांत्रिक स्वरुपाचे असून ते नळकारागिर, रेडिओ/टीव्ही दुरुस्ती, वेल्डर, प्लंबर, वायरमन, मोटर रिव्हायडींग पंप मेकॅनिक, सुतारकाम, फिटर टुव्हिलर दुरुस्तीसाठी इ. व्यवसायाशी (ट्रेड) निगडीत आहे. अशा कोणत्याही ४ व्यवसायांचे ६ महिन्यांपर्यंत प्रशिक्षण देण्यात येते. सदर कर्मचारी नियमित वेतनावरील नसून त्यांना ठराविक असे मानधन देण्यात येते.

ट्रायसेम प्रशिक्षण केंद्रातील १ व्यवसायासाठी १५ याप्रमाणे कोणत्याही ४ व्यवसायांचे प्रशिक्षण घेण्यासाठी ६० प्रशिक्षणार्थ्यांची मर्यादा विहित केली आहे. तर लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्रातील १ व्यवसायाकरिता २० याप्रमाणे ४ व्यवसायासाठी ८० प्रशिक्षणार्थ्यांची मर्यादा विहित केलेली आहे.

या योजनेसाठी कंत्राटी पध्दतीने नेमण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मानधन खालीलप्रमाणे आहे :--

| अ.क्र. | पदनाम | मानधन | |
|---|---|---|---|
| | | ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र | मीनी आयटीआय प्रशिक्षण केंद्र |
| १ | गट निदेशक | ६५०० | ६५०० |
| २ | निदेशक | ५५०० | ५५०० |
| ३ | लिपिक | ४००० | ४००० |
| ४ | वर्ग-४ चे कर्मचारी (शिपाई, मदतनीस, सफाई कामगार) | ३००० | ३००० |
| | **एकूण** | **१९०००** | **१९०००** |

ट्रायसेम प्रशिक्षण केंद्रे व लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्रे ही योजना नियोजन विभागाने जिल्हास्तरीय योजना म्हणून राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या योजनेसाठी लागणारा निधी नियोजन विभागामार्फत अर्थसंकल्पीत करण्यात येतो.

**३. यशवंत पंचायत राज अभियान तथा पंचायत सबलीकरण व उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना, राज्यातील अत्युत्कृष्ट जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतीसाठी पुरस्कार योजना :--**

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे योगदान मोठे आहे. राज्यामधील विकासाच्या सर्व योजना पंचायत राज संस्थामार्फत राबविल्या जातात. तेव्हा पंचायत राज संस्थांच्या कामगिरीनुसार त्यांना प्रोत्साहित करून त्यांची कार्यसंस्कृती वाढविण्यासाठी राज्यात पंचायत राज संस्थामधून प्रशासकीय व्यवस्थापन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतीसाठी सन २००५-०६ या आर्थिक वर्षापासून यशवंत पंचायत राज अभियान सुरू करण्यात आले असून विभाग व राज्य अशा दोन्ही स्तरावर अभिनव पुरस्कार योजना सुरू करण्यात आली आहे. सन २०११-१२ पासून पंचायत राज मंत्रालय, भारत सरकार यांनी पंचायत राज व्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या राज्यांना तसेच राज्यातील पंचायत राज संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी "पंचायत सबलीकरण व उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना" (PEAIS) सुरू केली आहे. राज्य पुरस्कृत "यशवंत पंचायत राज अभियान" व केंद्र पुरस्कृत "पंचायत सबलीकरण व उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना" ह्या दोन्ही योजना एकत्रितपणे राबविण्यात येत आहेत.

**"यशवंत पंचायत राज अभियान" पुरस्काराचे स्वरूप :--** राज्यातील अत्युत्कृष्ट तीन जिल्हा परिषदा, तीन पंचायत समित्या व तीन ग्रामपंचायतींना राज्यस्तरावर तसेच तीन पंचायत समित्या व तीन ग्रामपंचायतीना विभागस्तरावर पुरस्कार देण्यात येतात.

**(अ) राज्यस्तर पुरस्कार :--**

| | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषदा :-- | १. | प्रथम पारितोषिक रु. २५,००,०००/- (रु. पंचवीस लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| | २. | द्वितीय पारितोषिक रु. १५,००,०००/- (रु. पंधरा लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| | ३. | तृतीय पारितोषिक रु. १०,००,०००/- (रु. दहा लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| पंचायत समिती :-- | १. | प्रथम पारितोषिक रु. १५,००,०००/- (रु. पंधरा लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| | २. | द्वितीय पारितोषिक रु. १२,००,०००/- (रु. बारा लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| | ३. | तृतीय पारितोषिक रु. १०,००,०००/- (रु. दहा लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| ग्रामपंचायती :-- | १. | प्रथम पारितोषिक रु. ७,००,०००/- (रु. सात लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| | २. | द्वितीय पारितोषिक रु. ५,००,०००/- (रु. पाच लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| | ३. | तृतीय पारितोषिक रु. ३,००,०००/- (रु. तीन लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |

**(ब) विभागस्तर पुरस्कार :--**

| | | |
|---|---|---|
| पंचायत समिती :-- | १. | प्रथम पारितोषिक रु. १०,००,०००/- (रु. दहा लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| | २. | द्वितीय पारितोषिक रु. ७,००,०००/- (रु. सात लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| | ३. | तृतीय पारितोषिक रु. ५,००,०००/- (रु. पाच लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| ग्रामपंचायती :-- | १. | प्रथम पारितोषिक रु. ३,००,०००/- (रु. तीन लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| | २. | द्वितीय पारितोषिक रु. २,००,०००/- (रु. दोन लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |
| | ३. | तृतीय पारितोषिक रु. १,००,०००/- (रु. एक लक्ष फक्त) रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. |

जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांची पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी मूल्यमापनाचे निकष व मुद्दे ठरविण्यात आले आहेत. पंचायत राज संस्थांचे मूल्यमापन त्या त्या वर्षातील उद्दिष्ट व साध्य या आधारावर करण्यात येते.

मूल्यमापनासाठी तालुकास्तर, जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तरावर समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. विभाग स्तरावरील पारितोषिक निवड समिती विभागातील सर्व जिल्हास्तरिय पारितोषिक निवड समित्यांकडून प्राप्त झालेल्या निवड प्रस्तावावर अभ्यास करते व जिल्हा समितीने निवडलेल्या ग्रामपंचायती व पंचायत समित्यांमधून विभागातून प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कारासाठी तीन ग्रामपंचायाती व तीन पंचायत समित्यांची शिफारस राज्य पारितोषिक निवड समितीकडे करते. त्याचप्रमाणे विभागातील सर्व जिल्हा परिषदांच्या कामकाज व प्रगतीबाबत विहित मूल्यांकन पध्दतीनुसार प्रथम क्रमांकाच्या जिल्हा परिषदेची निवड करून निवडीच्या समर्थनार्थ सविस्तर अहवालासह राज्यस्तरावरील परितोषिक निवड समितीकडे प्रस्तावित करते.

राज्यस्तरावरील पारितोषिक निवड समिती राज्यस्तरीय पडताळणी समित्यांकडून प्राप्त झालेल्या निवड प्रस्तावावर अभ्यास करून राज्यातून प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कारासाठी फक्त तीन ग्रामपंचायती, तीन पंचायत समित्या व तीन जिल्हा परिषदा यांची मा. मंत्री (ग्रामविकास) यांच्या सहमतीने निवड करते. अंतिम निवड केलेल्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांना राज्यस्तरावर स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी म्हणजे दरवर्षी दिनांक १२ मार्च रोजी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण समारंभ आयोजित करून राज्य व विभागस्तर अशा दोन्ही स्तरांवरील पुरस्कारांचे वितरण केले जाते.

"पंचायत सबलीकरण व उत्तरदायित्व प्रोत्साहन योजने" अंतर्गत (Panchayat Empowerment and Accountability Incentive Scheme) राज्यात प्रथम आलेली जिल्हा परिषद, राज्यातून प्रथम आलेली पंचायत समिती, राज्यातून प्रथम आलेली अनुसूचित क्षेत्रातील पंचायत समिती, प्रत्येक विभागातून पहिल्या आलेल्या दोन ग्रामपंचायती व राज्यातून अनुसूचीत क्षेत्रातील प्रथम आलेल्या दोन ग्रामपंचायती यांची शिफारस केंद्र शासनास करण्यात येते. केंद्र शासनाकडून राज्य शासनाने शिफारस केलेल्या पंचायत राज संस्थांची देशपातळीवर तपासणी करण्यात येते व त्यातून बक्षीसपात्र पंचायत राज संस्थांना पुरस्कार जाहीर केले जातात. सन २०१२-१३ मध्ये या योजने अंतर्गत राज्यातील १७ पंचायत राज संस्थांना एकूण रु. १.६४ कोटी रकमेचे पुरस्कार मिळाले होते.

सन २०१२-१३ मध्ये "पंचायत सबलीकरण व उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना" अंतर्गत पंचायत सक्षमीकरण व संचयी प्रदानीकरणात देशात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला असून रुपये २.५० कोटी पुरस्कार मिळाला आहे.

केंद्र शासनाने "पंचायत सबलीकरण व उत्तरदायित्व प्रोत्साहन योजने अंतर्गत" सन २०१३-१४ या वर्षी महाराष्ट्र राज्यास प्रथम क्रमांकाचा रु. ३.०० कोटीचा पुरस्कार देऊन गौरविले आहे. तसेच या योजने अंतर्गत राज्यातील १८ पंचायत राज संस्थानादेखील रु. २.२० कोटी रकमेचे पुरस्कार देऊन गौरविले आहे.

**४. यशवंत ग्राम समृद्धी योजना :--**

**योजना सुरू झाल्याचा दिनांक--** शासन निर्णय क्र. २००१/प्र.क्र. १९४/पं.रा. ६ दिनांक २७-०८-२००२ पासून योजना सुरू करण्यात आली आहे.

**योजनेचा मूळ विभाग :--** ग्रामविकास विभाग

**योजनेचे स्वरूप :--** ग्रामीण भागातील गावांचा विकास करण्यासाठी ग्रामसभेच्या मान्यतेने आवश्यक कामांची निवड करून गावांमध्ये लोकसहभागातून पायाभूत सुविधा निर्माण करून गावांची समृद्धी करण्याच्या उद्देशाने सन २००२ पासून "यशवंत ग्राम समृद्धी योजना" राज्यात राबविण्यास सुरूवात केली आहे.

यशवंत ग्राम समृद्धी योजना ही लोकसहभागातून राबविण्यात येत असल्याने या योजनेमध्ये दलित व आदिवासी लाभार्थ्यांना १०% तर सर्वसाधारण लाभार्थ्यांना १५% लोकवर्गणी निश्चित केली असून योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामांची आर्थिक मर्यादा देखील निश्चित केलेली आहे. या आर्थिक मर्यादेनुसार यशवंत ग्राम समृद्धी योजनेंतर्गत एका आर्थिक वर्षात एका ग्रामपंचायीस रु. १०.०० लक्ष किमतीची एकच योजना राबविता येते.

या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील विकास होण्याच्या दृष्टीने जी कामे सर्व प्रथम घेणे आवश्यक आहे त्याबाबत शासन निर्णय क्र. २००१/ प्र.क्र.१९४/पं.रा.६, दिनांक २७-०८-२००२ मध्ये स्पष्ट केले आहे.

यशवंत ग्राम समृद्धी योजना तात्पुरत्या स्वरूपात स्थगित असल्याने या वर्षात कोणत्याही जिल्हा परिषदेस निधी वितरीत करण्यात आला नाही.

**योजनेसाठी केलेली अर्थसंकल्पीय तरतूद व खर्च :--**

१) सन २०१३-१४ - निरंक

२) सन २०१४-१५ - तरतूद रु. ७० हजार, खर्च- निरंक.

**५. ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम :--**

**योजना सुरू झाल्याचा दिनांक--** शासन निर्णय क्र. व्हीपीएम-१०९६/२२०/२२, दिनांक २८ ऑक्टोबर, १९९७ अन्वये योजना सुरू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णय अधिक्रमित करून योजनेच्या सुधारित तरतूदी शासन निर्णय क्र. तीर्थवि-२०११/प्र.क्र. ६५१/योजना ७, दि. १६ नोव्हेंबर, २०१२ अन्वये विहित करण्यात आल्या आहेत.

**योजनेचा मूळ विभाग :--** ग्रामविकास विभाग

**योजनेचे स्वरूप :--** ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी दिवसेंदिवस देवदर्शनासाठी भाविक/यात्रेकरूंची संख्या मोठ्या प्रमाणात सातत्याने वाढत आहे. अशा ठिकाणी भाविक/यात्रेकरू यांना विविध सोयी-सुविधा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना (उदा. ग्रामपंचायत) त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नामुळे पुरविणे शक्य होत नाही. म्हणून शासनाने ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देण्याची योजना सुरु केली. या योजनेंतर्गत गावातील तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मंदिरापर्यंत पोहोच रस्ते, पाणी पुरवठ्याची व्यवस्था करणे, स्वच्छतागृह, शौचालय, वाहनतळ, भक्तनिवास, पाहोच रस्त्यावरील दिवे आणि संरक्षक भिंत इत्यादी सुविधा निर्माण केल्या जातात.

ग्रामीण तिर्थक्षेत्रांची वर्गवारी "अ", "ब" व "क" या तीन प्रकारात करण्यात आली आहे. "अ" वर्गातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय किर्तीची स्थळे जी केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातून विकसित करण्यात येतात. "ब" वर्गातील तीर्थक्षेत्रे जी राज्यस्तरावरील तरतुदीतून विकसित करण्यात येतात. तिर्थक्षेत्रांना "ब" वर्ग दर्जा देण्यासाठी व निधीची शिफारस करण्यासाठी प्रधान सचिव (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून राज्यस्तरावरून एका तिर्थक्षेत्रास रु. २.०० कोटी एवढ्या निधीच्या मर्यादेत विकास कामांसाठी निधी वितरित केला जातो.

तिर्थक्षेत्रास "ब" वर्ग दर्जा देण्यासाठी, तिर्थक्षेत्रास "क" वर्ग दर्जा असल्याचा पुरावा व तिर्थक्षेत्रास भेट देणाऱ्या भाविकांची संख्या ४ लाख असल्याचे जिल्हा पोलीस अधिक्षकांचे प्रमाणपत्र, जागेचा ७/१२ उतारा, जागा हस्तांतरणाचे संमतीपत्र, जागा वनक्षेत्रात येत नसल्याचे प्रमाणपत्र, देखभाल-दुरूस्ती प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांसह विहीत प्रपत्रात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत शासनास प्रस्ताव सादर करावा लागतो. सदर प्रस्तावावर राज्य निकष समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही केली जाते.

"क" वर्गातील तिर्थक्षेत्रे जी स्थानिक पातळीवर प्रसिध्द असून, सदर तिर्थक्षेत्रांस जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन व विकास समिती "क" वर्ग दर्जा व निधी मंजूर करते. सदर निधी नियोजन विभागामार्फत जिल्हा योजने अंतर्गत जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन दिला जातो.

**योजनेसाठी केलेली अर्थसंकल्पीय तरतूद व खर्च :--**

१) सन २०१३-१४ - तरतूद रु. २६५०.०० लक्ष खर्च रु. १६७३.४७ लक्ष

२) सन २०१४-१५ - तरतूद रु. २२४९.१० लक्ष, खर्च- रु. ११५२.८४ लक्ष (ऑक्टोबर-२०१४ पर्यंत)

**६. मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते, गटारे व अन्य मूलभूत सुविधांच्या कामाबाबत विशेष कार्यक्रम :--**

**योजना सुरू झाल्याचा दिनांक--** शासन निर्णय क्र. विकास २००९/प्र.क्र. १९३/पं.रा. ८ दिनांक २४-०२-२००९ अन्वये सदर योजना सुरू करण्यात आली आहे.

**योजनेचा मूळ विभाग :--** ग्रामविकास विभाग

**योजनेचे स्वरूप :--**राज्यातील गावांतर्गत मूलभूत सुविधांच्या कामांना पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याने ग्रामस्थांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. यासाठी लोकप्रतिनिधींकडून निधीची मागणी होत असते. ही बाब विचारात घेऊन लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते, गटारे व अन्य मूलभूत सुविधांच्या कामासाठी प्राप्त मागण्या विचारात घेवून शासनाने शासन निर्णय क्र. विकास २००९/प्र.क्र. १९३/पं रा-८ दि. २४-२-२००९ अन्वये सदर योजना सुरु करण्यात आली आहे.

मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या मुलभूत सुविधांबाबतचे प्रस्ताव/मागणीपत्र, शासन व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडे स्विकारण्यात येतात. शासन स्तरावर तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेले कामांचे प्रस्ताव कामाची निकड तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार मंजूर करण्यात येतात.

**योजनेसाठी केलेली अर्थसंकल्पीय तरतूद व खर्च :--**

१) सन २०१३-१४ - तरतूद रु. ५०८.९२ कोटी, खर्च- रु. ४०९.६६ कोटी

२) सन २०१४-१५ - तरतूद रु. ५७५.२८ कोटी, खर्च- रु. ५७३.९८ कोटी (माहे ऑक्टोबर २०१४ अखेर पर्यंत)

**७. पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना :--**

हरीत ग्राम, स्वच्छ ग्राम, समृध्द ग्राम, सक्षम ग्राम या संकल्पनेला साकार करण्यासाठी पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना राज्यात सुरु करण्यात आली. पहिल्याच वर्षात वृक्ष लागवड, हगणदारीमुक्त, करवसुली या निकषांची पूर्ती करुन राज्यातील २७९२० ग्रामपंचायतींपैकी १२१९३ ग्रामपंचायती यशस्वी झाल्या व त्यांना त्यांच्या स्वयं नियोजनानुसार गावाचा शाश्वत विकास करण्यासाठी रु. ३८९.८९ कोटीचा निधी वितरित करण्यात आला आहे. पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना अंतर्गत तिन्ही वर्षांचे निकष पहिल्याच वर्षी पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना दिनांक २ डिसेंबर, २०११ रोजी महामहिम मा. राष्ट्रपती यांच्या हस्ते राज्यातील ८१० ग्रामपंचायतींना "पर्यावरण विकासरत्न" पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच सन २०१२-१३ मध्ये योजनेचे सर्व निकष व नाविन्यपूर्ण काम करणारे ८३३ ग्रामपंचायती या वर्षी पर्यावरण विकासरत्न पुरस्कारासाठी पात्र झालेल्या आहेत. सन २०१३-१४ मधील बक्षिसपात्र ग्रामपंचायतीची निवडप्रक्रीया अंतिम टप्प्यामध्ये आली आहे.

गावातील शालेय विद्यार्थ्यांपासून ते शासकीय अधिकाऱ्यापर्यंत सर्वांनी कठोर परिश्रम घेवून या योजनेचे महत्त्व जाणून घेतल्यामुळे राज्यभरात प्रथम वर्षी एकूण ५.९३ कोटी इतके वृक्षारोपन करणे शक्य झाले. दुसऱ्या वर्षात ३.२५ कोटी वृक्ष लागवड करण्यात आली आहे. या तिसऱ्या वर्षी ५.९२ कोटी वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे व चौथ्या वर्षात ६.५५ कोटी इतकी वृक्ष लागवड करण्यात आली आहे असे एकूण २१.६६ कोटी वृक्ष लागवड करण्यात आली आहे.

पहिल्या वर्षी पात्र झालेल्या १२१९३ ग्रामपंचायतीपैकी दुसऱ्या वर्षाचे निकष पार करून ७४२४ ग्रामपंचायती पात्र झाले आहेत. तसेच गतवर्षी २७९२० ग्रामपंचायतीपैकी ज्या ग्रामपंचायती पहिल्या वर्षात पात्रच झाल्या नाहीत अशा ग्रामपंचायतींपैकी अभियानाच्या दुसऱ्या वर्षी पहिल्या वर्षाचे निकष पूर्ण करून पात्र होणाऱ्या २३७८ ग्रामपंचायती पात्र झाल्या आहेत. अशाप्रकारे पहिल्या व दुसऱ्या वर्षाचे निकष पूर्ण करणाऱ्या ९८०२ ग्रामपंचायतींना लोकसंख्येनुसार रुपये ३००१३.८२ लक्ष इतका निधी आतापर्यंत वितरित केलेला आहे. सन २०१२-१३ मध्ये पहिल्या वर्षाचे निकष पूर्ण करणाऱ्या १८७२, दुसऱ्या वर्षीचे निकष पूर्ण करणाऱ्या १८६६ व तिसऱ्या वर्षीचे निकष पूर्ण करणाऱ्या ४१७४ अशा एकूण ७९१२ ग्रामपंचायती निकषास पात्र ठरणार आहेत. त्यासाठी रुपये २३४०८.५८ लक्ष इतका निधी ग्रामपंचायतींना वितरित करण्यात येणार आहे. त्यापैकी आतापर्यंत रुपये ७०.५१ कोटी इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे. सदर निधीचा उपयोग पात्र ग्रामपंचायती त्यांचे स्तरावर नियोजन करून ग्रामविकासासाठी गावांनी ठरविलेल्या विकास कामांवर खर्च करत आहेत.

पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना यापुढेही सुरु ठेवण्यास दिनांक ३ मार्च, २०१४ रोजी मा. मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे.

**८. ई-पंचायत मिशन मोड प्रकल्प (संग्राम) :--**

* भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत हाती घेण्यात आलेल्या ई-पंचायत ह्या मिशन मोड प्रोजेक्टची महाराष्ट्र "संग्राम" प्रकल्प (संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र) या नावाने दिनांक १ मे, २०११ पासून अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे.
* महाऑनलाईन ही या प्रकल्पाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेले संपूर्ण तांत्रिक मनुष्यबळ, तंत्रज्ञान सहाय्य व व्यवस्थापन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महाऑनलाईन यंत्रणेची आहे.

* राज्यातील ३३ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या व २७९८० ग्रामपंचायतींना एकसमान कॉम्प्युटर, मल्टीफंक्शन, प्रिंटर उपलब्ध करून देण्यात आले. (सद्य:स्थितीत विभाजन पुनर्गठन प्रक्रियेनंतर राज्यात ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या व २८,००१ ग्रामपंचायती अस्तित्वात आहेत.)
* राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व जवळजवळ २६००० पंचायती इंटरनेट जोडणीयुक्त झालेल्या आहेत.
* १ हजार लोकसंख्येवरील सर्व ग्रामपंचायतीस एक संगणक चालक व १ हजार पेक्षा कमी लोकसंख्येखालील ३ ग्रामपंचायती मिळून एक याप्रमाणे संगणक परिचालक आहेत.
* याशिवाय जिल्ह्यासाठी प्रत्येकी एक याप्रमाणे सॉफ्टवेअर इंजिनिअर व प्रत्येक पंचायत समितीस एक याप्रमाणे संगणक तज्ज्ञ या प्रकल्पांतर्गत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.
* राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषद व्हिडीओ कॉन्फरन्स यंत्रणेद्वारे मंत्रालयाला जोडण्यात आली आहे.
* राज्यातील प्रत्येक पंचायती राज संस्थेमध्ये वेब कॅमेरा व एम एस ऑफीस २०१० या प्रकल्पांतर्गत उपलब्ध करून देण्यात आले आहे.
* ई-पंचायत प्रकल्पांतर्गत आतापर्यंत एकूण १० सॉफ्टवेअर Online वापरासाठी उपलब्ध झाले आहेत व यांच्या वापराबाबत महाराष्ट्र राज्य संपूर्ण देशात अग्रेसर आहे.
* राज्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामाचे Digitization करण्यासाठी (१ ते २७ नमुने) संग्राम सॉफ्ट विकसित केले असून दि. १ एप्रिल, २०१३ पासून राज्यात पंचायती राज संस्थांकडून देण्यात येणारे सर्व दाखले दि. १ एप्रिल, २०१३ पासून संगणकीकृत स्वरुपात देणे बंधनकारक करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत संगणकीकृत वितरित दाखल्यांची संख्या ९५,१५,४२९ इतकी आहे.
* राज्यातील सर्व इंटरनेट जोडणीयुक्त ग्रामपंचायतीमध्ये ई-पंचायत प्रकल्प अंमलबजावणी व ग्रामीण जनतेला दाखले/प्रमाणपत्रे त्यांचे रहिवासी क्षेत्रात उपलब्ध करून देण्यासाठी संग्राम केंद्राची (ग्रामसेवा केंद्र) स्थापना झाली असून या सर्व संग्राम केंद्रांना महा-ई-सेवा केंद्राचा दर्जा दि. २३ मे, २०१२ पासून देण्यात आला आहे.
* इतर प्रशासकीय विभागांना संग्राम केंद्रातून डेटा एन्ट्री किंवा इतर सेवा-सुविधा सशुल्क उपलब्ध करून देण्याचा मा. मुख्य सचिव स्तरावर निर्णय घेण्यात आलेला आहे व त्यानुसार सर्व प्रशासकीय विभागांना व क्षेत्रिय यंत्रणांदेखील कळविले आहे. त्यानुसार आम आदमी बीमा योजना-लाभार्थी शिष्यवृत्ती नोंदणी, राजीव गांधी आरोग्यदायी बीमा योजना-हेल्थ कार्ड प्रिंटींग, मनरेगा-पे स्लिप, ICDS-MIS Reporting, ई-आधार कार्ड-प्रिंटींग इत्यादी.
* आर्थिक समावेशन (Financial Inclusion) या उपक्रमाद्वारे, ग्रामपंचायतींमध्ये उपलब्ध साधन संपत्तीचा पूर्णत: उपयोग करून, ग्रामस्थांना दाखले/प्रमाणपत्रे तसेच बँकिंग सेवेसह, एल.आय.सी., इन्शुरन्स, इलेक्शन कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड, नॅशनल पेंशन सिस्टिम (स्वावलंबन योजना), लाभार्थ्यांना थेट अनुदान (DBT), मोबाईल रिचार्ज इत्यादी प्रकारच्या (G२C व B२C सेवा) त्यांचे रहिवासी क्षेत्रात उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामविकास विभागाने पंचायती राज संस्थांच्यावतीने महाऑनलाईन व CSC-SPV यांचेमध्ये दि. ५ फेब्रुवारी, २०१४ रोजी त्रिपक्षीय करारनामा करून शासन निर्णय निर्गमित केला आहे व राज्यात ग्रा. पं. परसोडी (बु.), ता. कळंब, जि. यवतमाळ येथून दि. १० फेब्रुवारी, २०१४ पासून या प्रकल्पाच्या अंमलबजावणीला सुरुवात करण्यात आलेली आहे.
* दि. २१ ऑगस्ट, २०१४ पासून ग्रामपंचायतीत नोंद असलेल्या जन्म-मृत्यू, विवाह, नमुना क्र. ८ यांच्या प्रमाणित माहितीवरून जगात कोठूनही संबंधित ग्रामपंचायतीतील दाखले ऑनलाईन उपलब्ध करून देण्याची सुविधा संग्रामसॉफ्टच्या माध्यमातून दिलेली आहे. तसेच प्रधानमंत्री जन-धन योजने अंतर्गत संग्राम केंद्रांमार्फत ग्रामस्थांची बँकेत खाते उघडण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत या योजने अंतर्गत संग्राम केंद्रामार्फत १,३८,४९५ खाती बँकेत उघडण्यात आली आहेत.
* सन २०१०-२०११ मध्ये प्रिया सॉफ्ट अंमलबजावणीत द्वितीय पारितोषिक (रु. ३० लाख) मिळाले आहे.
* सन २०११-२०१२ मध्ये ई-पंचायत प्रकल्प अंमलबजावणीस राष्ट्रीय पातळीवरील रु. ५० लाखाचे पहिले पारितोषिक राज्याला मिळाले आहे.
* तसेच सन २०१३-२०१४ मध्येही ई-पंचायत प्रकल्प अंमलबजावणीस राष्ट्रीय पातळीवरील रु. ४० लाखाचे पहिले पारितोषिक राज्याला मिळाले आहे.

**९. प्रशिक्षण योजना :--**

**योजनेचा मूळ विभाग :--** ग्रामविकास विभाग

योजना ग्राम विकास विभागाकडून कार्यान्वित असलेल्या प्रशिक्षण योजनांचा भौतिक अहवाल.

**१. राज्यात खालीलप्रमाणे ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रे कार्यरत आहेत**

१. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, कोसबाड हिल, जिल्हा ठाणे

२. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर

३. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, अमरावती

४. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, मांजरी फार्म, जिल्हा पुणे

५. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, कसबा बावडा, जिल्हा कोल्हापूर

६. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, बुलढाणा

७. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, परभणी

८. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, जालना

९. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, सिंदेवाही, जिल्हा चंद्रपूर

या केंद्रांमार्फत राज्यातील ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी इत्यादीना सेवांतर्गत प्रशिक्षण देण्यात येते. या सर्व केंद्रांना वेतन बाबींसाठी राज्य शासनाकडून दरवर्षी १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात येते. या सर्व केंद्रांना वेतनेतर बाबींसाठी राज्य शासनाकडून दरवर्षी ८० टक्के अनुदान मंजूर करण्यात येते यापैकी वेतनासाठी सन २०१४-१५ या वित्तीय वर्षी एकूण रुपये ५३४.९२ लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली होती व वेतनेतर साठी रु. ९०.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली होती सन २०१४-१५ मध्ये माहे सप्टेंबर, २०१४ अखेर ३१९७ ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरिता एकूण रु. ७४६.७४ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**२. राज्यात खालीलप्रमाणे ११ पंचायत राज प्रशिक्षण केंद्रे कार्यरत आहेत**

१. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, वर्ये, जिल्हा सातारा

२. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, मुरुड, जिल्हा लातूर

३. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, खामगांव, जिल्हा बुलढाणा

४. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, अमरावती

५. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर

६. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, पुसद, जिल्हा यवतमाळ

७. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, गौंडगांव, जिल्हा सोलापूर

८. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, हनुमाननगर, जिल्हा नागपूर

९. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, कोसबाड हिल, जिल्हा ठाणे

१०. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, खिरोंदा, जिल्हा जळगांव

११. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, मूल, जिल्हा चंद्रपूर

या प्रशिक्षण केंद्रांमार्फत ग्रामपंचायतीचे सरपंच, उप सरपंच, ग्रामपंचायत सदस्य इत्यादीना त्यांचे दैनंदीन कर्तव्य कार्यक्षमतेने पार पाडता यावे तसेच त्यांची क्षमता बांधणी व्हावी या उद्देशाने प्रशिक्षण दिले जाते. या सर्व केंद्रांना वेतन व वेतनेतर बाबींसाठी राज्य शासनाकडून दरवर्षी १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात येते. यासाठी सन २०१४-१५ या वित्तीय वर्षी एकूण रुपये २४६.७६ लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. माहे सप्टेंबर, २०१४ अखेर ४१०४ प्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यात आले.

सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरिता एकूण रु. ४१५.०० लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**३. संयुक्त प्रशिक्षण केंद्र, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर**

पंचायत राज संस्थेतील संबंधित विस्तार अधिकारी/कक्ष अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे दैनंदीन कर्तव्य योग्यरितीने सक्षमपणे पार पाडण्याच्या उद्देशाने या प्रशिक्षण केंद्रांमार्फत प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण केंद्र मौनी विद्यापीठ, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर या खाजगी संस्थेकडून चालविले जात असून सदर केंद्रांसाठी वेतन व वेतनेतर बाबींसाठी राज्य शासनाकडून दरवर्षी १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात येते. यासाठी सन २०१४-१५ या वित्तीय वर्षी एकूण रुपये ७१.०५ लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली होती. माहे सप्टेंबर, २०१४ अखेर ६८१ प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देण्यात आले.

सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरिता एकूण रु. ८५.२६ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**४. यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी यशदा, पुणे**

ग्रामविकास विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समिती व इतर कार्यालयातील कर्मचारी/अधिकारी यांना नियमित प्रशिक्षण यशदा, पुणे यांच्याकडून देण्यात येत आहे. यासाठी सन २०१४-१५ या वित्तीय वर्षाकरिता एकूण रु. ४५०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरिता एकूण रु. ६००० लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**१०. ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य यांचे मानधन व इतर भत्ते व ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांचे किमान वेतन**

**ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन**

महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना शासन निर्णय दि. २१ जानेवारी, २००० नुसार आकृतीबंधाप्रमाणे पदांची संख्या खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

| ग्रामपंचायत वर्ग (लोकसंख्या) | कर्मचारी संख्या | कर्मचाऱ्यांचा प्रकार (प्रती ग्रामपंचायत) |
|---|---|---|
| (अ) ० ते १००० | १ | शिपाई/दिवाबत्ती/पाणीपुरवठा कर्मचारी-१ |
| (ब) १००१ ते ३००० | २ | शिपाई-१, दिवाबत्ती/पाणीपुरवठा कर्मचारी-१ |
| (क) ३००१ ते ६००० | ३ | लिपिक/वसुली कारकून-१, शिपाई-१ तथा दिवाबत्ती/पाणीपुरवठा कर्मचारी-१ |
| (ड) ६००१ ते १०००० | ४ | लिपिक/वसुली कारकून-१, शिपाई-१ दिवाबत्ती/पाणीपुरवठा कर्मचारी-१, सफाई कामगार-१ |
| (इ) १०००१ वरील | ६ | लिपिक/वसुली कारकून-२, शिपाई-१ दिवाबत्ती/पाणीपुरवठा कर्मचारी-१, सफाई कामगार-२ |

वरील आकृतीबंधानुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनाचे शासन निर्णय दिनांक ४ मार्च, २०१४ नुसार ० ते २.०० लाख उत्पन्न असलेल्या व १००० ते ५००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना १००% अनुदान, रु. २००००१ ते ५००००० उत्पन्न असलेल्या व १ ते १०००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना ७५% व उर्वरित सर्व ग्रामपंचायतींना ५०% अनुदान शासनाकडून देण्यात येते. सदर अनुदान मागणी क्रमांक एल, २-लेखाशिर्ष, २०५३ जिल्हा प्रशासन-०९३, जिल्हा आस्थापना राज्य क्षेत्र (०७) मानधन व इतर भत्ते यासाठी अनुदाने (०१)(०७), ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य यांचे मानधन व इतर भत्ते आणि कर्मचाऱ्यांचे किमान वेतन यासाठी अनुदाने, ३१ (२०५३ १०४२) सहाय्यक अनुदान (योजनेतर) याखाली खर्च करण्यात येते. शासन अधिसूचना दिनांक ७ ऑगस्ट, २०१३ नुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनात पुढीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कर्मचारी वर्गवारी | मूळ किमान वेतन दर (दरमहा रुपये) | | |
|---|---|---|---|---|
| | | परिमंडळ-१ (१०००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती) | परिमंडळ-२ (५००० ते १०००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती) | परिमंडळ-३ (५००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती) |
| १ | कुशल (लिपिक) | ७१०० | ६९०० | ६३०० |
| २ | अर्धकुशल (पाणी/दिवाबत्ती कर्मचारी) | ६४०० | ६२०० | ५६०० |
| ३ | अकुशल (शिपाई व सफाई कामगार) | ५९०० | ५७०० | ५१०० |

**सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्ता :** शासन निर्णय दिनांक ६ सप्टेंबर, २०१४ नुसार दिनांक १५ ऑगस्ट, २०१४ पासून सरपंच मानधन लोकसंख्यानिहाय खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे. तसेच सदस्यांना रु. २०० प्रति बैठक भत्ता देण्यात येतो.

| ग्रामपंचायतीची लोकसंख्या निहाय वर्गवारी | मानधनाची दरमहा रक्कम (रुपये) |
|---|---|
| (अ) ० ते २००० पर्यंत लोकसंख्येच्या ग्रामपंचायती | १००० |
| (ब) २००१ ते ८००० पर्यंत लोकसंख्येच्या ग्रामपंचायती | १५०० |
| (क) ८००१ पेक्षा जास्त लोकसंख्येच्या ग्रामपंचायती | २००० |

उक्त मानधनाबाबत शासनाकडून ७५% अनुदान व सदस्य बैठक भत्त्याबाबत शासनाकडून १००% अनुदान देण्यात येते.

**ग्रामसभा :** ग्रामसभा ही लोकशाहीतील सर्वोच्च व्यवस्था आहे. ही बाब लक्षात घेऊन शासनाने ग्रामसभा बळकटीकरणासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात वॉर्डसभेची तरतूद तसेच महिला ग्रामसभेचाही अंतर्भाव करण्यात आला आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनिमानुसार वर्षातून ग्रामसभेच्या किमान ६ सभा घेण्याची तरतूद होती यामध्ये सुधारणा करण्यात आली असून ग्रामसभांमधील जनतेची उपस्थिती वाढावी म्हणून यामध्ये सन २०१२ मध्ये सुधारणा केली असून आता ६ ऐवजी ४ सभा घेण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सदर सुधारणेनुसार ग्रामसभेच्या प्रत्येक नियमित सभेपूर्वी आणि ग्रामसभेच्या महिला सदस्यांच्या सभेपूर्वी प्रभाग (वॉर्ड) सभेची तरतूद करण्यात आली आहे. या सभेमध्ये राज्याच्या किंवा केंद्र सरकारकडून प्राप्त होणाऱ्या सूचनेच्या अनुषंगाने वेगवेगळे विषय ग्रामसभेत घेण्यात येतात.

**११. राष्ट्रीय गौरव ग्रामसभा पुरस्कार :** ग्रामसभेची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि ग्रामसभेचे अधिकार याची माहिती गावातील जनतेला व्हावी म्हणून मोठ्या प्रमाणात जनजागृती कार्यक्रम हाती घेण्यात आले होते. केंद्र शासनाने सन २००९-१० हे वर्ष राष्ट्रीय गौरव ग्रामसभा वर्ष म्हणून जाहीर केले होते. त्यानुषंगाने केंद्र शासनाकडून रु. १०.०० लक्ष रकमेचा पुरस्कार व प्रशस्तीपत्रक देऊन देशातील एका ग्रामपंचायतीस सन्मानित करण्यात येते. देशपातळीवर महाराष्ट्र राज्यातील सन २००९-१० मध्ये चहार्डी, जि. जळगांव, सन २०१०-११ मध्ये पेठ, ता. वाळवा, जि. सांगली व सन २०११-१२ मध्ये टिकेकरवाडी ग्रामपंचायत, ता. जुन्नर, जि. पुणे व सन २०१२-१३ मध्ये मान्याची वाडी, ता. पाटण, जि. सातारा या ग्रामपंचायतींचा राष्ट्रीय गौरव ग्राम पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे.

-------------

# (ब) केंद्र-राज्य पुरस्कृत योजना

**१. रस्ते व पूल दुरुस्ती व परिरक्षण :**

जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग, रस्ते व पूल दुरूस्ती व परिरक्षण (लेखाशिर्ष ३०५४) हा योजनेतर कार्यक्रम सन २०१२-१३ या आर्थिक वर्षापासून ग्राम विकास विभागामार्फत राबविला जात आहे. सदर योजनेबाबतची कार्यपध्दती व अंमलबजावणी संदर्भात विभागाच्या दि. १० सप्टेंबर, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी सदर कार्यक्रमासाठी रु. ४७४४७.५० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पीत केलेला आहे. तसेच तेराव्या वित्त आयोगांतर्गत रु. ८०००.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पीत केलेला आहे.

प्रस्तुत योजनेद्वारे जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील ग्रामीण रस्ते दुरुस्ती प्रयोजनार्थ निधी नियमितपणे पंचायत राज संस्थांना उपलब्ध करून दिला जात आहे.

**२. महालक्ष्मी सरस प्रदर्शन व विक्री केंद्रे :**

ग्राम विकास विभाग मार्फत दारिद्र्यरेषेखाली कुटुंबांचे जीवनमान उंचवावे व त्यांना रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे यासाठी सन १९९९ पासून केंद्रशासन पुरस्कृत स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार ही योजना राबविण्यात येत होती. आता या योजनेचे रूपांतर "महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान" असे झाले असून सन २०११ पासून महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची सुरुवात करण्यात आली. यामध्ये स्वयंसहाय्यता गट/स्वरोजगारी यांना व्यावसायाभिमुख प्रशिक्षण देण्यात येते. तसेच त्यांना व्यवसायासाठी अनुदान व कर्ज उपलब्ध करून देण्यात येते.

स्वरोजगारींनी तयार केलेल्या वस्तुंना हक्काची बाजारपेठ मिळण्याकरिता दि. २७-०२-२००९ अन्वये विभागीय व जिल्हा पातळीवरील विक्री प्रदर्शने आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने महालक्ष्मी सरस प्रदर्शनाच्या धर्तीवर स्वयंसहाय्यता गटाच्या उत्पादित मालाच्या विक्री व प्रदर्शनासाठी विभाग व जिल्हा स्तरावर दरवर्षी विक्री प्रदर्शने आयोजित करून विभागीय प्रदर्शनासाठी प्रत्येकी रु. २५.०० लक्ष व जिल्हा प्रदर्शनासाठी प्रत्येकी रु. १०.०० लक्ष याप्रमाणे अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात महालक्ष्मी सरस, विभाग व जिल्हा प्रदर्शनाकरिता एकूण रु. ४२०.०० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

**३. जिल्हा व तालुकास्तरीय कायमस्वरुपी विक्री केंद्र बांधणे :**

ग्राम विकास विभागांमार्फत १९९९ पासून दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील व्यक्तीचे जीवनमान उंचावून देशातील प्रगत तंत्रज्ञान सोप्या पध्दतीने त्यांच्यापर्यंत पोहोचवून त्यांना रोजगार मिळवून देऊन त्यांचे उत्पन्न किमान रु. २००० प्रती महा इतके व्हावे, या उद्देशाने स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (७५% केंद्र व २५% राज्य पुरस्कृत) योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये स्वयंसहाय्यता गट/स्वरोजगारी यांना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्यात येते. तसेच त्यांना व्यवसायासाठी अनुदान व कर्जही उपलब्ध करून देण्यात येते. या स्वरोजगारींनी तयार केलेल्या वस्तुंना हक्काची बाजारपेठ मिळणे आवश्यक झाले होते. या उद्देशाने राज्य शासनाने प्रत्येक विभागीय व जिल्हा पातळीवर विक्री प्रदर्शने आयोजित करण्याचा आणि जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणी कायमस्वरूपी विक्री केंद्र बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक : पणन-२००८/प्र.क्र. ७३८/योजना-१ दिनांक २७ फेब्रुवारी, २००९ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले. त्यासाठी जिल्हा केंद्राला प्रत्येकी रु. ५०.०० लक्ष व तालुका केंद्राला प्रत्येकी रु. २५.०० लक्ष अनुदान देण्याचे निश्चित करण्यात आले.

दरम्यान शासन निर्णय क्रमांक पणन-२००९/प्र.क्र. ९२४/योजना-१ दिनांक ९ डिसेंबर, २०११ अन्वये केंद्र शासन पुरस्कृत गाव, जिल्हा व राज्यस्तरीय कायमस्वरूपी विक्री केंद्र बांधण्याची ७५%-२५% योजना स्विकारण्यात आली असून यापूर्वीची राज्यस्तरीय तालुका विक्री केंद्र बांधण्याची योजना सुरू ठेवण्यात आली आहे. या योजनेनुसार सन २००९-१० ते सन २०१३-१४ या कालावधीत एकूण १७९ कायमस्वरूपी तालुका विक्री केंद्र बांधण्यासाठी रु. ४४७५.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. आतापर्यंत २९ तालुका विक्री केंद्राची कामे पूर्ण झाली असून जागे अभावी ८३ तालुका विक्री केंद्राची कामे सुरू करण्यात आलेली नाहीत. तसेच ५० तालुका विक्री केंद्राची कामे प्रगतीपथावर आहेत.

**४. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रशासन :**

**योजनेचे नाव : जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रशासन**

**उद्देश :** भारत सरकार पुरस्कृत दारिद्र्य निर्मुलन विषयक कार्यक्रम राबविण्याकरिता राज्यातील सर्व जिल्ह्यात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांची स्थापना करण्यात आली असून, या यंत्रणा सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५०

खाली पंजीकृत केले आहेत. या यंत्रणांमध्ये केंद्र शासनाच्या सुचनानुसार कर्मचारी आकृतीबंध लागू करण्यात आला आहे. दिनांक १ एप्रिल, १९९९ पासून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांमधील कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते आणि कार्यालयीन खर्च या करिता (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रशासन) ही योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत उपरोक्त खर्चाकरिता केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून ७५ : २५ या प्रमाणात अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. जिल्ह्यातील गटांच्या संख्येनुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाची (अ)(ब)(क)(ड) या चार वर्गात वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार राज्यातील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांची वर्गनिहाय संख्या पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | जिल्ह्यातील गटांची संख्या | वर्गवारी |
|---|---|---|
| १. | ६ पेक्षा कमी | अ |
| २. | ६ ते १० | ब |
| ३. | ११ ते १५ | क |
| ४. | १५ पेक्षा जास्त | ड |

या योजने अंतर्गत केंद्र शासनाने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांसाठी नवीन कर्मचारी आकृतीबंध विहित केला आहे. त्यानुसार दिनांक १७ मार्च, २००४ च्या शासननिर्णयान्वये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांसाठी सुधारित कर्मचारी आकृतीबंध लागू करण्यात आला आहे. यानुसार एकूण १२७२ पदे निर्माण करण्यात आली असून दिनांक २८-२-२०१२ च्या शासननिर्णयान्वये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडील योजनांच्या अंतर्गत लेखापरिक्षणासाठी वित्त शाखेंतर्गत एकूण १०० पदे निर्माण करण्यात आली. नवनिर्मित पालघर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (गट ब वर्ग जिल्हा) साठी शासन निर्णय क्र. जिग्राप्र-२०१४/प्रक्र ५४/योजना ५, दिनांक २० ऑक्टोबर, २०१४ अन्वये नव्याने ३८ पदे निर्माण करण्यात आली आहेत.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रशासन याबाबतच्या शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांमध्ये कोणतीही पदे सरळ सेवेने भरावयाची नसून, ते प्रतिनियुक्तीद्वारे अथवा करार पध्दतीने भरण्यात येतात. ही सर्व पदे संबंधित जिल्हा परिषद तसेच राज्य शासनाच्या इतर विभागाकडून प्रतिनियुक्तीने भरण्यात येतात. (परिशिष्ट-अ मध्ये मंजूर पदांचा तक्ता सोबत जोडला आहे.)

**अर्थसंकल्प--** केंद्र हिस्सा--आर्थिक वर्ष २०१४-१५ पासून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांमधील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन-भत्त्यासाठी केंद्र शासनाकडून (७५%) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रशासन या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी प्राप्त होणारा हिस्सा राज्याचा अर्थसंकल्पात दर्शवून त्याचे वितरण सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांना करण्याचे केंद्र शासनाचे निदेश आहेत. त्यास अनुसरून केंद्र शासनाच्या हिश्शाची तरतूद राज्याच्या अर्थसंकल्पात ग्राम विकास व जलसंधारण विभाग मागणी क्र. एल-३, २५०१-ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम, ०१-एकात्मिकृत ग्राम विकास कार्यक्रम, ००१-संचालन व प्रशासन, (००) गटपातळीवरील यंत्रणा अधिक बळकट करणे, (००)(०३) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (योजनांतर्गत), (७५% केंद्र पुरस्कृत योजना), ३६-सहाय्यक अनुदाने (वेतन व भत्ते) (केंद्र हिस्सा) (२५०१ २९१७) या लेखाशिर्षाखाली सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रशासन मधील अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन भत्ते भागविण्याकरिता रु. ३१३४.५३ लक्ष एवढा निधी अर्थसंकल्पित केला आहे. यात प्रतिवर्षी ५% वाढ करण्यात येते. यासंबंधीची माहिती परिशिष्ट ब मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**राज्य हिस्सा--** राज्य समरूप हिस्सा २५% नियोजन विभागामार्फत जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे वितरीत करण्यात येतो. राज्य हिस्सा रु. १९१८.३३ लक्ष एवढा निधी अर्थसंकल्पित केला आहे. यात प्रतिवर्षी १०% वाढ करण्यात येते. (परिशिष्ट-क मध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रशासन (वित्तिय आवश्यकता) तक्ता सोबत जोडला आहे.)

**५. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान :**

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात (Natioanl Rural Livelihoods Mission) (NRLM) मध्ये रुपांतर करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे.

सन २०११-१२ या वर्षापासून राज्यात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना 'महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM)' स्वरुपात करून राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर अभियान केंद्र शासन ७५% व राज्य शासन २५% पुरस्कृत आहे.

"तळागाळातील गरीबांसाठी मजबूत अशा संस्थांची बांधणी करून त्याद्वारे लाभदायक स्वयंरोजगार व कुशल वेतनी रोजगाराची संधी मिळविणे गरीब कुटुंबाना शक्य व्हावे व त्याद्वारे दारिद्र्य कमी करणे, परिणामी कायमस्वरूपी तत्वावर त्यांच्या उपजिविकेत उल्लेखनीय सुधारणा करणे" हा अभियानांचा उद्देश आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची खालील मार्गदर्शक तत्वे आहेत.

१) दारिद्र्यातून बाहेर येण्याची गरीबांची प्रबळ इच्छाशक्ती आहे आणि ते करण्याची त्यांच्याकडे अंगभूत क्षमता आहे.

२) सामाजिक संघटन करण्यास, संस्थांची बांधणी करण्यास व त्यांचे सक्षमीकरण करण्याची प्रक्रिया करण्यास प्रेरणा देण्यासाठी बाह्य समर्पित व संवेदनक्षम आधारभूत रचना आवश्यक आहे.

३) ज्ञानाचा प्रसार, कौशल्य बांधणी, पतपुरवठा, बाजारपेठ आणि उपजिविकेच्या इतर सेवा उपलब्ध झाल्यास, या वाढत्या संघटनास खालून आधार मिळेल.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची खालील केंद्रभूत मुल्ये आहेत.

१) गरिबातील गरिबांचा अंतर्भाव व सर्व प्रक्रियामध्ये त्यांची अर्थपूर्ण भूमिका,

२) पारदर्शकता

३) उत्तरदायित्व

४) समानता-दुर्बल गटातील विशेषत: महिला व असुरक्षित गट

५) भागीदारी

६) नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रणाच्या सर्व टप्प्यांमध्ये गरीबांचा व त्यांच्या संस्थांचा मालकी हक्क व ठोस भूमिका.

राज्यामधील सर्वात कमी मानवी विकास निर्देशांक असलेल्या (१) ठाणे, (२) रत्नागिरी, (३) नंदूरबार, (४) सोलापूर, (५) जालना, (६) यवतमाळ, (७) उस्मानाबाद, (८) वर्धा, (९) गडचिरोली, (१०) गोंदिया या १० जिल्ह्यातील ३६ तालुके प्रथम टप्प्यात निवडून तेथे राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान राबविण्यात येणार आहे. उर्वरित तालुक्यांमध्ये सदर अभियान पुढील टप्प्यात राबविण्यात येणार आहे.

या योजने अंतर्गत वरील १० जिल्ह्यांमधील ३६ तालुक्यांकरिता सदर योजना NRLM Intensive म्हणून राबविण्यात येणार असून उर्वरित तालुक्यांकरिता सदर योजना NRLM Non Intensive म्हणून राबविण्यात येणार आहे.

राज्यातील Poverty Diagnostic करण्याचे काम गोखले इन्स्टिट्यूट यांना देण्यात आलेले आहे.

या अभियानाच्या SPIP तयार करण्याच्या कामी मदत करण्यासाठी CORE GROUP व THEMATIC GROUP ची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये अभियानाच्या संबंधित नामवंत तज्ज्ञ, सहभागी घटक, क्षेत्र कार्यातील प्रतिनिधी, युनिसेफ, माविम, नाबार्ड, TISS, नामवंत स्वयंसेवी संस्था, ग्रामस्तरीय संस्था इ. चा समावेश करण्यात आला आहे.

सन २०१५-१६ या वर्षाकरिता राज्य शासनाने NRLM करिता रु. १५०.०० कोटी व NRLP करिता रु. ११५.०० कोटी इतका वार्षिक कृती आराखडा केंद्र शासनाकडे प्रस्तावित केलेला आहे. या योजनेच्या भौतिक उद्दीष्टाबाबतचा तक्ता परिशिष्ट ड सोबत जोडला आहे.

राज्य शासनाने अभियान राबविण्यासाठी खालीलप्रमाणे तरतूद प्रस्तावित केली आहे.

| हिस्सा | (Non-Tribal) | (SCP) | (TSP) | (OTSP) | Total |
|---|---|---|---|---|---|
| केंद्र | १४२५०.०० | ३२६३.०० | २३६३.०० | -- | १९८७६.०० |
| राज्य | ४७५०.०० | १०८८.०० | ७१७.०० | ७१.०० | ६६२६.०० |

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत महिला किसान सशक्तीकरण परियोजना--**

महिला किसान सशक्तीकरण परियोजने अंतर्गत केंद्र शासनाने दिनांक ७ जानेवारी, २०११ अन्वये मार्गदर्शक सूचना विहित केल्या आहेत. सदर योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील शेतकरी महिलांचा दर्जा उंचावणे, ग्रामीण भागातील महिलांना शाश्वत कृषी क्षेत्रातील जीवनमानाच्या संधी उपलब्ध करून देणे, या महिलांच्या कृषी तसेच अकृषी क्षेत्रातील कौशल्य व क्षमतेमध्ये वाढ करणे, या महिलांचा शासकीय तसेच शासनाच्या इतर संस्थांशी संपर्क करून देणे आणि या महिलांना कुटुंब व समाज स्तरावर खाद्य व पोषण सुरक्षा देणे हा आहे. हे करीत असताना त्यांच्यातील कौशल्याचा विकास करणे, त्यांच्यातील व्यवस्थापन क्षमता वाढविणे जेणेकरून शेतीमध्ये बायोडायव्हरसिटीच्या व्यवस्थापनामध्ये याचा उपयोग होईल, याबाबतचा विचार या योजने अंतर्गत करण्यात आला आहे. या योजने अंतर्गत राबविण्यात येणारे प्रकल्प NGOs, CSOs, CBOs, SH Federations पंचायतराज संस्था किंवा इतर शासकीय संस्थामार्फत राबविण्यात येतात. या योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीचे प्रमाण ७५% केंद्र शासनाचा हिस्सा, २५% राज्य शासनाचा हिस्सा व प्रकल्प राबविणारी संस्था असे असते. सदर योजने अंतर्गत राज्यात बजरंग रीसर्च फाऊंडेशन, बीड व एम. एस. स्वामीनाथन, वर्धा हे प्रकल्प सुरू आहेत.

सन २०१५-१६ मध्ये महिला किसान सशक्तीकरण परियोजनेकरिता केंद्र हिश्शासाठी रुपये ९००.०० लाख व राज्य हिश्शासाठी रुपये ३००.०० लाख इतकी तरतूद करण्यात येणार आहे.

**६. आजिविका कौशल्यवृद्धी विकास कार्यक्रम** (ASDP)

* राज्यातील ग्रामीण भागातील १५ ते ३४ वयोगटातील युवकांची कौशल्यवृद्धी करून रोजगार उपलब्ध करून देणे.

* सदर योजना केंद्र पुरस्कृत असून त्यामध्ये केंद्र शासनाचा ७५% व राज्य शासनाचा २५% असा सहभाग आहे.

* केंद्र शासनाने या पूर्वीच्या स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजने अंतर्गत असलेल्या विशेष प्रकल्पाच्या तरतुदींमध्ये सुधारणा करून आजिविका कौशल्यवृद्धी विकास कार्यक्रम सन २०१२-१३ मध्ये सुरू केला.

* केंद्र शासनाने आजिविका कौशल्यवृद्धी विकास कार्यक्रमांतर्गत सादर करावयाच्या प्रकल्पांसाठी सप्टेंबर, २०१३ मध्ये सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या.

* राज्य शासनाने या योजने अंतर्गत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी राज्यस्तरीय प्रकल्प छाननी समिती व राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समिती अनुक्रमे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व प्रधान सचिव, ग्रामविकास यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आल्या आहेत.

* सन २०१५-१६ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद करण्यात येणार आहे. (रु. लाखात)

| हिस्सा | (Non-Tribal) | (SCP) | (TSP) | (OTSP) | Total |
|---|---|---|---|---|---|
| केंद्र | ५४०८०.०० | ३१३७.०० | २२७२.०० | -- | १०८१७.०० |
| राज्य | १८०३.०० | ०.०० | ६८९.०० | ६१.०० | २५६०.०० |

**स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (R-SETI) संबंधीचे सर्व कामकाज--**

केंद्र शासनाने बेरोजगारीच्या प्रश्नावर तोडगा म्हणून श्री. धर्मस्थळ मंजूनाथेश्वर एज्युकेशनल ट्रस्ट, सिंडीकेट बँक व कॅनरा बँक यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण विकास व स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (Rural Development and Self Employment Training Institute) सन १९८२ पासून स्थापन करण्यात आली. त्यानुसार शासन निर्णय दिनांक १९ जून, २००८ नुसार राज्यातील सर्व जिल्ह्यात सदर संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर संस्था त्या त्या जिल्ह्यातील लिड बँकेमार्फत चालविण्यात येणार असून त्यासाठी राज्य शासनाने किमान एकर जमीन विनामूल्य द्यावयाची आहे. केंद्र शासनाकडून या संस्थेच्या बांधकामासाठी व इतर सुविधेसाठी रुपये १ कोटी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जमीन उपलब्ध होऊन बांधकाम होईपर्यंत भाड्याच्या जागेत प्रशिक्षण सुरू करण्यात येत आहे. राज्यातील ३३ जिल्ह्यात (R-SETI) मंजूर करण्यात आलेली आहे. सध्या या जिल्ह्यामध्ये भाड्याच्या जागेत तात्पुरत्या स्वरूपात प्रशिक्षण सुरू करण्यात आलेले आहे. सन २०१२-१३ या वर्षामध्ये (R-SETI) करिता भाड्याच्या जागेत एकूण ७८७५ प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण घेतले आहे. या संदर्भात (R-SETI) साठी इमारत व इतर तत्सम बाबींची पूर्तता करण्याची कार्यवाही चालू आहे.

**७. इंदिरा आवास योजना--**

इंदिरा आवास योजना १९८९ पासून डिसेंबर, १९९५ अखेरपर्यंत जवाहर रोजगार योजनेची उपयोजना म्हणून राबविली जात होती. त्यानंतर दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून ही योजना स्वतंत्रपणे केंद्र पुरस्कृत योजना म्हणून राबविण्यात येत आहे. या योजनेच्या निधीच्या उपलब्धतेची पध्दत ७५:२५ प्रमाणे आहे. (७५% केंद्र शासन आणि २५% राज्यशासन)

या योजने अंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील बेघर/कच्चे घर असलेल्या कुटुंबासाठी घरकूल बांधणीसाठी अनुदान देण्यात येते. सदर योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी व्यक्तिचे नाव ग्रामसभेने मंजूर केलेल्या बेघर कुटुंबाच्या प्रतिक्षा यादीत असणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार उपलब्ध निधीच्या ४० टक्के निधी बिगर अनुसूचित जाती / जमातीसाठी राखून ठेवण्यात येतो. अनुसूचित जाती / जमातीसाठी ६० टक्के निधी आरक्षित ठेवला जातो. अपंगांसाठी ३ टक्के आरक्षण ठेवण्यात येते. हे आरक्षण समस्तर असे असते. सन २००७-०८ पासून अल्पसंख्यांकांसाठी १५ टक्के आरक्षण ठेवण्यात येत आहे. दरवर्षी घरकुलांचे उद्दिष्ट केंद्र शासनाद्वारे निश्चित करण्यात येते. तसेच जिल्हा निहाय घरकुलांचे वाटप केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाकडून जिल्ह्यांना परस्पर करण्यात येते. त्यामध्ये राज्याला बदल करता येत नाही. केंद्र शासनाने निश्चित केलेल्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने इंदिरा आवास योजनेतील घरकुलांबाबतची कार्यवाही प्रकल्प संचालक, संबंधित जिल्हा यंत्रणा यांचेमार्फत पूर्ण करण्यात येते.

दिनांक १ एप्रिल, २०१३ पासून केंद्र शासनाने दर्जेदार घरे बांधण्याकरिता प्रति घरकूल रु. ७०,०००/- इतकी सुधारित किंमत निर्धारित केली आहे. राज्य शासनाने प्रति घरकुल राज्य अतिरिक्त हिस्सा रुपये २५,०००/- एवढा निश्चित केला असल्याने राज्यातील प्रति घरकुलाची किंमत रुपये १,००,०००/- इतकी निश्चित करण्यात आलेली आहे. त्याची विभागणी खालीलप्रमाणे--

| | |
|---|---|
| अ) केंद्र शासनाचा हिस्सा (७५%) | रु. ५२,५००/- |
| ब) राज्य शासनाचा हिस्सा (२५%) | रु. १७,५००/- |
| क) राज्य शासनाचा अतिरिक्त प्रति घरकूल | रु. २५,०००/- |
| ड) मजुरीच्या स्वरूपात लाभार्थ्याचा हिस्सा | रु. ५,०००/- |
| **एकूण** | **रु. १,००,०००/-** |

**मुख्य उद्दिष्ट--**दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती/जमाती व इतर ग्रामीण गरीब व्यक्तींना तसेच मुक्तवेठबिगारांना, सशस्त्र दलातील व अर्धसैनिक दलातील लढाईमध्ये मारल्या गेलेल्या सैनिकांचे कुटूंब व विधवा यांना उत्पन्नाची अट शिथिल करून घरकुलासाठी अनुदान उपलब्ध करून देणे हे या योजनेचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. या अनुदानातून किमान २६९ चौ. फूट क्षेत्रफळाचे बांधकाम लाभार्थ्याने करणे बंधनकारक आहे.

**कार्यवाहीची जबाबदारी--** इंदिरा आवास योजनेचे सर्व प्रकारचे कामकाज प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचेमार्फत होते. यात लाभार्थी स्वत:च्या जागेवर किंवा ग्रामपंचायतींच्या उपलब्ध गावठाणाच्या जागेवर घरकुल स्वत: बांधून घेतात. सन २००२ च्या दारिद्र्य रेषेच्या सर्वेक्षणानंतर इंदिरा आवास योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील निवारा नसलेल्या/कच्ची घरे असलेल्या कुटुंबाची ग्रामपंचायतनिहाय कायम प्रतिक्षा यादी तयार करण्यात आलेल्या आहेत. या कायम प्रतिक्षा यादीमध्ये अनुसूचित जाती/जमाती व इतर यांच्या स्वतंत्र यादी तयार करण्यात आलेल्या आहेत. सदर यादी गुणानुक्रमे चढत्या क्रमाने तयार करण्यात आलेल्या आहेत. या प्रतिक्षा याद्या अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीसाठी बिगरअनुसूचित जाती/जमातीसाठी अशा प्रकारे केल्या जातात. दारिद्र्य रेषेच्या कुटुंबाच्या यादीला ग्रामसभेची मान्यता घेतली जाते. प्रतिवर्षी वर नमूद केलेल्या प्रतिक्षा याद्यामधून लाभार्थ्यांची गुणानुक्रमे निवड केली जाते.

**घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नसलेल्या लाभार्थ्यांसाठी योजना--** इंदिरा आवास योजनेचा एक भाग म्हणून ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील बेघरांपैकी ज्यांना स्वत:ची जागा नाही अशा कुटूंबाकरिता जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भातील योजनेस केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. ही योजना केंद्र व राज्य ५०:५०% अशी पुरस्कृत आहे. या योजने अंतर्गत घरकुलाच्या जागेसाठी प्रत्येक लाभार्थ्यास साधारण १०० ते २५० चौरस मीटर जागा खरेदी करणे किंवा जागा ताब्यात घेण्यासाठी रु. २०,०००/- किंवा प्रत्यक्ष खर्चाची रक्कम यापैकी जी कमी असेल एवढे आर्थिक सहाय्य अदा करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे.

केंद्र शासनाने सन २०१४-१५ या वर्षासाठी १,७१,७२२ घरांचे लक्ष्य निर्धारित केले असून रुपये ९०९.६१ कोटी रकमेची अर्थसंकल्पिय तरतूद केली आहे. तर राज्य शासनाने रु.५५९.२५ कोटीची तरतूद केली आहे. इंदिरा आवास योजनेकरिता सन २००३-०४ ते सन २०१४-१५ (ऑक्टोबर, २०१४ पर्यंत) झालेली आर्थिक व भौतिक प्रगती महिलांच्या नावे मंजूर करण्यात आलेल्या घरकुलांची माहिती सोबत जोडली आहे. (परिशिष्ट-इ).

## ८. राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान (RGPSA)

१२ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान (RGPSA) या योजनेचा समावेश करण्यात आला आहे. ही योजना सन २०१३-१४ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण (RGPSA) अंतर्गत ३३ जिल्ह्यात ३३ जिल्हा पंचायत संसाधन केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. ग्रामपंचायतींना पुरेसे पायाभूत मनुष्यबळ, पायाभूत सुविधा, पंचायती राज संस्थांचे सदस्य व कर्मचारी यांचे प्रशिक्षण व क्षमता बांधणी, पंचायतीच्या क्षमता बांधणीसाठी संस्थात्मक संरचनांचा विकास, माहिती व्यवस्थापनाद्वारे पारदर्शी व उत्तरदायी पंचायतींची बांधणी, स्थानिक स्वराज्याची व्यासपीठे व पंचायत प्रक्रियांचे बळकटीकरण, पेसा क्षेत्रातील पंचायतींच्या क्षमता वृध्दीसाठी विशेष अभियान, पंचायत सक्षमीकरण व कार्यक्रमाचे प्रभावी व्यवस्थापन, सनियंत्रण व मूल्यमापन, पंचायती राज सशक्तीकरणासाठी जनजागृती व लोकप्रबोधन, राज्य निवडणूक आयोगाचे प्रशासकीय बळकटीकरण व पंचायती राज सशक्तीकरणासाठी नाविण्यपूर्व उपक्रम राबविण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. ही केंद्र पुरस्कृत योजना (७५:२५) सन २०१३-१४ करिता यशदा, पुणे यांचेमार्फत राबविण्यात आली व सन २०१४-१५ पासून राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पुणे यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे.

या योजनेकरिता सन २०१३-१४ पर्यंत केंद्र शासनाकडून रुपये ८३१७.०० लक्ष व राज्य शासनाकडून रुपये १४५०.०० लक्ष असे एकूण रुपये ९७६७.०० लक्ष इतका निधी यशदा, पुणे यांना वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी सप्टेंबर, २०१४ पर्यंत रुपये ५००८.६३ लक्ष इतका निधी खर्च झालेला आहे व रुपये ४७५८.३७ लक्ष इतका निधी शिल्लक आहे. आतापर्यंत साध्य १६७७८ इतके झालेले आहे.

या योजनेकरिता मागील वर्षाचा शिल्लक निधी रुपये ४७५८.३७ लक्ष मधून रुपये ४३९५.२५ लक्ष इतका निधी खर्च झालेला आहे व रुपये ३६३.२३ लक्ष इतका निधी शिल्लक आहे. आतापर्यंत साध्य ८६४५ इतके झालेले आहे.

## ९. सौर ऊर्जा पथदिवे उभारणी कार्यक्रम

ग्रामीण भागात पर्यावरण संतुलन प्रणीत मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आणि विजेचे भारनियमन टाळून विनाव्यत्यय अपारंपरिक स्त्रोतातून निर्मित विजेचा पुरवठा व्हावा या उद्देशाने ग्रामीण भागातील रस्त्यांवर सौर पथदिवे (Solar street light) बसविण्याची योजना सन २०१०-११ पासून कार्यान्वित झाली. ही योजना राज्य शासन, केंद्र शासन व ग्रामपंचायती यांच्या सहभागातून राबविण्यात येते. या योजनेचा मूळ विभाग हा ग्राम विकास विभाग आहे.

सन २०१०-११ या वर्षात १०००० सौर पथदिव्यांचे उद्दिष्ट निश्चित करुन या वर्षात रुपये ९००.०० लक्ष एवढा निधी जिल्हा परिषदांना उपलब्ध करून देण्यात आला आहे. या वर्षात केंद्र शासनाचा हिस्सा प्राप्त झाला नसल्याने राज्य शासन व ग्रामपंचायत यांच्या सहभागाने हा कार्यक्रम राबविण्यात आला.

सन २०११-१२ या वर्षात पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या ग्रामपंचायतींची निवड उशिराने झाली आणि या वर्षातही केंद्र हिस्सा प्राप्त न झाल्याने सन २०११-१२ व सन २०१२-१३ या वर्षासाठी आवश्यक असणारा केंद्र हिस्सा केंद्र शासनाकडून मंजूर केला असून सन २०१२-१३ या वर्षात हा कार्यक्रम एकत्रितरित्या राबविण्यात आला.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात योजना राबविताना पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या ग्रामपंचायतींपैकी ६४२३ ग्रामपंचायतींमध्ये १९२७० सौर पथदिव्यांचे उद्दिष्ट निश्चित करून त्यासाठी एकूण रुपये १८५०.०० लक्ष एवढा निधी जिल्हा परिषदांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात योजना राबविताना पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या ग्रामपंचायतींपैकी २९५० ग्रामपंचायतींमध्ये ८८५० सौर पथदिवे उभारण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यासाठी एकूण रुपये ७८०.५७ लक्ष एवढा निधी जिल्हा परिषदांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**ग्रामपंचायतींच्या रस्त्यावर सौर पथदिवे उभारणे**

(रुपये लक्ष)

| अ. क्र. | वर्ष | उद्दिष्ट | साध्य | अर्थसंकल्पिय तरतूद | विभागाने जिल्हा परिषदांना वितरीत कलेले अनुदान |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | २०१०-११ | १०००० | ५७८१ | रुपये १००.०० | रुपये ९००.०० |
| २ | २०११-१२ | ८८५४ | ८७२४ | रुपये ८५०.०० | रुपये ८५०.०० |
| ३ | २०१२-१३ | १०४१६ | १०००७ | रुपये ७८०.७० | रुपये ७८०.७० |
| ४ | २०१३-१४ | ८८५० | निरंक | रुपये १०००.०० | रुपये २१९.२६ (सन २०१२-१३ साठी) रु. ७८०.५७ (सन २०१३-१४ साठी) |
| ५ | २०१४-१५ | ८४३७ | निरंक | रुपये ८१०.०० | प्रस्तावित |

# (क) केंद्र पुरस्कृत योजना

**१. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना :**

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना ही १०० % केंद्र पुरस्कृत असून राज्यात सन २००० पासून राबविण्यात येत आहे.

सन २००१-०१ (टप्पा-१) मध्ये ही योजना सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राबविण्यात आली. सध्या सदर योजनेची अंमलबजावणी ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचा मुख्य उद्देश हा सर्वसाधारण व बिगर आदिवासी भागातील ५०० पेक्षा जास्त व आदिवासी भागातील २५० पेक्षा जास्त लोकवस्तीची न जोडलेली गांवे बारमाही रस्त्यांद्वारे (वर्षभर चालू रहाणारे कलव्हर्ट व क्रॉस ड्रेनेज बांधून) जोडणे हा आहे.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये एकूण ७८८६ लोकवस्त्या जोडणाऱ्या २२५५२ कि.मी. लांबीच्या ५४०१ रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. फ्लॅगशिप कार्यक्रमांतर्गत प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या विविध टप्प्यांतर्गत माहे ऑक्टोबर, २०१४ अखेरपर्यंत रु. ५७०७ कोटी इतका खर्च झालेला आहे.

केंद्र शासनाने सन २०१० मध्ये सादर करण्यात आलेल्या टप्पा १० व ११ च्या रु. १०७७.८७ कोटी किमतीच्या प्रस्तावास दि. १४ ऑगस्ट, २०१२ व दि. २३ ऑगस्ट, २०१२ च्या पत्रान्वये मंजुरी दिलेली आहे.

तर, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या टप्पा १२ अंतर्गत एकूण रु. ३५३.६२ कोटी किमतीच्या प्रस्तावास केंद्र शासनाने दि. १८ ऑक्टोबर, २०१३ च्या पत्रान्वये मंजुरी दिली आहे.

केंद्र शासनाने सन २०००-२०१२ या कालावधीमध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये उद्दिष्टे पूर्ण झालेल्या राज्यासाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग-२ मान्य केला असून केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याकरिता रु. १४४८ कोटींची २६१८.९० कि.मी. इतक्या लांबीच्या रस्त्यांची कामे व रु. १२४.१७ कोटींच्या १०८ पुलांची कामे अशा एकूण रु. १५७२.५८ कोटी किमतीच्या रस्ते व पूल बांधकामाची कामे मंजूर केलेली सदर कामे सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहेत.

**२. राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम :**

पारंपारिक ऊर्जा साधने जसे पेट्रोल, केरोसिन, कोळसा, नैसर्गिक वायु व लाकडी इंधन ही काळाच्या ओघात संपणारी ऊर्जा साधने आहेत. यांच्या वापरावरील भार कमी करण्यासाठी, ग्रामीण भागातील स्त्रियांचे जीवनमान सुधारण्यासाठी, सर्वसाधारण स्वच्छता तसेच पर्यावरण संतुलन राखण्यासाठी सन १९८२-८३ पासून शासनाने राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना कार्यान्वित केली आहे.

सदर योजना जिल्हास्तरावर कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत राबविण्यात येते. या योजनेंतर्गत केंद्र शासन दरवर्षी राज्यास बायोगॅस संयंत्राचे उद्दिष्ट ठरवनू देते. ठरवून दिलेले उद्दिष्ट राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना वाटप करण्यात येते. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी केंद्र शासन राज्यास १००% निधी २ ते ३ हप्त्यात उपलब्ध करून देते. केंद्र शासनाने १२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये बायोगॅस संयंत्रांचे नवीन दर निश्चित करून दि. ३० जून, २०१४ रोजी नवीन सुधारीत मार्गदर्शक सूचना/प्रशासकीय मंजुरी आदेश निर्गमित केला आहे.

या योजनेचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

(१) योजना राबविताना लाभार्थी असलेल्या गावांचा समूह करून योजना राबविण्यात यावी.

(२) बायोगॅस संयंत्राची मागणी निश्चित करताना लोकांचा सहभाग घ्यावा.

(३) दोन किंवा अधिक जनावरे असलेल्या कुटुंबाची लाभार्थी म्हणून निवड करणे.

(४) दोन किंवा अधिक जनावरे असलेल्या कुटुंबाची संख्या जास्त असल्यास अशा गावांच्या समुहाची निवड करणे.

(५) ज्या जिल्ह्यात बायोगॅस संयंत्र कार्यान्वित राहण्याचे प्रमाण अधिक आहे व संयंत्राच्या देखभाल दुरुस्तीच्या सुविधा उपलब्ध आहेत, अशा भागास अधिक बायोगॅस संयंत्राचे उद्दिष्ट देण्यात यावे.

(६) उद्दिष्टाचे वाटप करताना स्वयंसेवी संस्था, उद्योजकांकडील प्रशिक्षित गवंड्यांची संख्या विचारात घेऊन बायोगॅस संयंत्रे वाटप करावेत.

(७) बायोगॅस संयंत्राची उभारणी करतेवेळी जिल्ह्यातील अनुसुचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांसाठी १०% ते १५% संयंत्र उभारण्याचे प्रयत्न करणे आवश्यक आहेत.

केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या वरील मंजुरी आदेशात राष्ट्रीय बायोगॅस कार्यक्रमांतर्गत उभारणी करावयाच्या बायोगॅस संयंत्रांसाठी अनुदानाचे दर वाढवून दिलेले आहेत. सदरचे दर २०१४-१५ या आर्थिक वर्षातील दि. ०८-५-२०१४ पासून लागू करण्यात आले आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत--

| अ. क्र. | बाब | संयंत्राचे आकारमान | केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान (प्रति संयंत्रास) |
|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण लाभार्थी | १ घ.मी. | रु. ५,५००/- |
| | | २ ते ४ घ.मी. | रु. ९,०००/- |
| २. | अनुसूचीत जाती/जमाती | १ घ.मी. | रु. ७,०००/- |
| | | २ ते ४ घ.मी | रु. ११,०००/- |
| ३. | बायोगॅस संयंत्रास शौचालयास जोडल्यास | १ ते ४ घ.मी. | रु. १,२००/- |
| ४. | टर्न की फी (५ वर्षाच्या हमी कालावधीतील देखभाल दुरुस्तीसाठी) | १ ते ४ घ.मी. | रु. १,५००/- |
| ५. | संयंत्र उभारणीसाठी सेवाशुल्क | | |
| | अ) १००-३००० | | रु. १,००,०००/- (१०० पेक्षा जास्त संयंत्र रु. ४००/- प्रति संयंत्र) |
| | ब) ३००१-७००० | | रु. १०,५०,०००/- (३००० पेक्षा जास्त संयंत्र उभारणीस रु. ३५०/- प्रती संयंत्र) |
| | क) ७००१ पेक्षा जास्त | | रु. २४,५०,०००/- (७००० पेक्षा जास्त संयंत्र उभारणीस रु. ३००/- प्रती संयंत्र, कमाल रु. ६०.०० लक्ष) |
| ६. | प्रशिक्षण शुल्क | | |
| | १) लाभार्थी प्रशिक्षण | | रु. ३,०००/- |
| | २) कर्मचारी प्रशिक्षण | | रु. १०,०००/- |
| | ३) रिफ्रेशर कोर्स/बांधकाम व देखभाल कोर्स | | रु. ४५,०००/- |
| | ४) स्वयंसेवी संस्थांना/टर्न की वर्कर यांना बायोगॅस संयंत्र व व्यवस्थापन कार्यक्रमाचे प्रशिक्षण दिल्यास | | रु. ७५,०००/- |
| ७. | प्रचार व प्रसिध्दी | | |
| | १) १००० संयंत्रांपर्यंत | | रु. २,००,०००/- |
| | २) १००१ ते १०,००० संयंत्रांपर्यंत | | रु. ४,००,०००/- |
| | ३) १०,००० पेक्षा जास्त संयंत्राकरिता | | रु. ६,००,०००/- |
| ८. | अकार्यरत संयंत्रांच्या दुरुस्तीसाठी राज्यास प्राप्त होणाऱ्या नियतव्ययापैकी ५% नियतव्यय वापरण्यात यावा. | | लाभार्थ्यांने दुरूस्तीच्या खर्चापैकी ५०% खर्च केल्यास ५०% केंद्रिय सहाय्य मिळणेस पात्र |

राज्यात बायोगॅसची तंत्रशुध्द पध्दतीने उभारणी व्हावी म्हणून संयंत्र बांधणाऱ्या गवंड्यांना व ट्रेनर्सना या योजनेखाली प्रशिक्षण व उजळणी प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षित झालेल्या गवंड्यांकडून बायोगॅस संयंत्रे बांधली जातात. बायोगॅस संयंत्राचा वापर व देखभाल दुरुस्ती करण्यासंदर्भात लाभार्थ्यांनासुध्दा प्रशिक्षण देण्यात येते. राज्यात सर्वसाधारणपणे जनता, दिनबंधू व के.व्ही.आय.सी. या प्रकारची बायोगॅस संयंत्रे बसविली जातात.

बायोगॅस कार्यक्रमांतर्गत राज्यात उभारणी करण्यात आलेल्या बायोगॅस संयंत्रांसाठी मागील ८ वर्षात व चालू आर्थिक वर्षासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात केलेली तरतूद व जिल्हा परिषदांना वितरीत केलेले अनुदान व साध्य याबाबतचा तपशील परिशिष्टामध्ये (विवरणपत्र-१) जोडला आहे.

### ३. मागास क्षेत्र अनुदान निधी योजना :

मागास क्षेत्र अनुदान निधी योजना (BRGF) ही १००% केंद्र पुरस्कृत योजना आहे. मागास क्षेत्र अनुदान निधी या योजनेचा मुख्य उद्देश प्रादेशिक असमतोल दूर करणे व स्थानिक पायाभूत सुविधांमध्ये कच्चे दुवे जोडणे हा आहे. तसेच या योजनेच्या माध्यमातून पंचायत व नगरपालिका स्तरावरील स्थानिक प्रशासनास बळकटी देण्यासाठी वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध करणे याद्वारे संस्थांची क्षमताबांधणी करणे हा आहे. सदर योजना ही सन २००६-०७ पासून कार्यान्वित झाली आहे. ही योजना कार्यान्वित होण्यापुर्वी राष्ट्रीय समविकास योजना या नावाने नियोजन विभागामार्फत राबविण्यात येत होती. राज्यातील भंडारा, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, हिंगोली, नांदेड, धुळे, नंदूरबार व अहमदनगर या ९ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येते. सन २००६-०७ मध्ये राष्ट्रीय समविकास योजना अमरावती, यवतमाळ व औरंगाबाद या ३ जिल्ह्यांचा नव्याने समावेश झाला व त्यानंतर सदर योजना केंद्रीय आयोगाकडून केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालय या विभागाकडे हस्तांतरीत झाली. सदर योजना हस्तांतरित झाल्यानंतर या योजनेचे नाव मागास क्षेत्र अनुदान निधीमध्ये रुपांतरीत झाले.

मागास क्षेत्र अनुदान निधी (Backward Region Grant Fund) ही योजना १००% केंद्र पुरस्कृत असून सदर योजना राज्यातील १२ मागास जिल्ह्यांमध्ये (भंडारा, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, हिंगोली, नांदेड, धुळे, नंदूरबार, अहमदनगर, अमरावती, यवतमाळ व औरंगाबाद) राबविण्यात येते. या योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार १२ जिल्ह्यांतील गावांचा गाव आराखडा तयार करण्यात येतो. या आराखड्यास जिल्हा नियोजन समितीची (DPC) मंजुरी घेऊन सदर जिल्हा आराखडे शासनस्तरावरील उच्चाधिकार समितीच्या मान्यतेसाठी सादर केले जातात व उच्चाधिकार समितीने मान्य केलेले जिल्हा आराखडे केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालय विभागाकडे निधी उपलब्ध करून घेण्यासाठी पाठविले जातात.

मागास क्षेत्र अनुदान निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतर सन २००७-०८ व सन २००८-०९ या दोन वर्षात जिल्हा नियोजन समित्यांची (DPC) स्थापना झाली नसल्याने या दोन वर्षात या योजनेसाठी निधी प्राप्त झाला नाही. सन २००९-१० पासून या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी, प्रत्यक्ष केलेला खर्च इ. बाबतची माहिती सोबत जोडण्यात येत आहे. (विवरणपत्र २).

### ४. मागासक्षेत्र विकास अनुदान निधी योजनेंतर्गत प्रशिक्षण :

**योजनेचा मूळ विभाग :-- ग्राम विकास विभाग**

मागासक्षेत्र विकास अनुदान निधी योजनेंतर्गत प्रशिक्षण (BRGF) ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना असून २००६-२००७ पासून या विभागामार्फत कार्यान्वित आहे. विकासातील प्रादेशिक असमतोल व विषमता दूर करण्यासाठी पंचायत स्तरावरील शासन यंत्रणा सुदृढ करणे, क्षमतावृध्दी करणे, निर्णय क्षमता वाढविणे व निर्णयांची अंमलबजावणी करणे तसेच अंमलबजावणी व संनियंत्रण व्यावसायिक मदत करणे हे मागासक्षेत्र विकास अनुदान निधी योजनेचे उद्दिष्ट व स्वरुप आहे.

या योजनेंतर्गत राज्यातील अहमदनगर, औरंगाबाद, धुळे, नंदूरबार, यवतमाळ, अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नांदेड, हिंगोली व गडचिरोली हे १२ जिल्हे मागासक्षेत्र विकास अनुदान निधी योजनेंतर्गत मागासक्षेत्र म्हणून निश्चित करण्यात आले आहेत. या जिल्ह्यांतील पंचायत राज संस्थांमधील पदाधिकारी व अधिकारी यांना यशदा, पुणे या संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येते. तसेच यशदा, पुणे यांनी निवडलेल्या संस्थांद्वारे सदर योजनेंतर्गत प्रशिक्षण देण्यात येते.

या योजनेचे सन २०१४-१५ पर्यंतचे उद्दिष्ट ३००४७८ इतके असून माहे सप्टेंबर, २०१४ पर्यंत २९५६३९ इतके साध्य झाले आहे.

योजनेसाठी आतापर्यंत केंद्र शासनाकडून सन २०१४-१५ पर्यंत रु. ७००० लक्ष इतका निधी प्राप्त झालेला असून त्यापैकी आतापर्यंत रु. ६४३९.२६ लक्ष इतका निधी खर्च झालेला असून रु. ५६०.७४ लक्ष इतका निधी शिल्लक आहे.

### ५. ग्रामीण प्रशिक्षण केंद्रांना बळकटीकरणाची योजना

सदर योजना ही १००% केंद्र पुरस्कृत आहे. या योजनेंतर्गत राज्यातील ९ ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रांपैकी कोसबाड हिल, जि. पालघर/गारगोटी, जिल्हा कोल्हापूर/अमरावती/मांजरी फार्म, जिल्हा पुणे/कोल्हापूर/बुलढाणा/परभणी व जालना या ८ ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रांना केंद्र शासनाने (Extension Training Centre) विस्तार प्रशिक्षण केंद्राचा दर्जा दिलेला आहे. या ८ प्रशिक्षण केंद्रांना केंद्र शासनाकडून परस्पर निधी उपलब्ध करून दिला जात असल्याने या योजनेखाली वेगळी तरतूद केली जात नाही.

## ३. पंचायत राज संस्थांना स्वउत्पन्नविषयक बाबींसाठी अर्थसहाय्य

### (अ) जिल्हा परिषदांना स्वउत्पन्नविषयक विविध बाबींसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाचा तपशील :

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना स्वउत्पन्न म्हणून जमीन महसूल उपकर, वाढीव उपकर, मुद्रांक शुल्क, वन महसूल अनुदान, व्यवसाय कर व वाहन कर ही अनुदाने उपलब्ध करुन दिली जातात.

**(१) मुद्रांक शुल्क अनुदान :** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १५८ अंतर्गत जिल्हा परिषदेच्या कक्षेतील ज्या स्थावर मालमत्तेची विक्री देणगी, फलोपभोग व गहाण दस्ताऐवजावर मुद्रांक अधिनियमांन्वये जे मुद्रांक शुल्क आकारले जाते त्या शुल्कात १ टक्के प्रतिशत वाढ करण्यात आलेली आहे. ही वाढ करण्यात आलेली जी रक्कम आहे ती रक्कम मुद्रांक शुल्क अनुदानाच्या रुपाने सर्व जिल्हा परिषदांना वितरीत केली जाते. जिल्हा परिषदांना देय असणाऱ्या मुद्रांक शुल्क अनुदानाचा तपशील नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या कार्यालयाकडून प्राप्त होतो. त्या तपशीलानुसार वित्त विभागाकडून अनुदान प्राप्त होते. सदरचे अनुदान जिल्हा परिषद व संबंधीत ग्रामपंचायत यांच्यामध्ये ५०/५० टक्के वाटप केले जाते. या बाबीसाठी सन २०१४-१५ या वित्तिय वर्षात रु. ५६०,००,००,०००/- एवढी तरतूद मंजूर झाली आहे.

**(२) जमीन महसूल उपकर :** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १४४ नुसार प्रत्येक १ रुपया जमा जमीन महसूलावर २०० पैसे उपकर आकारण्यात येतो. त्याचप्रमाणे या उपकरावर प्रोत्साहनपर अनुदान देखील उपलब्ध करून दिले जाते. तसेच संबंधीत जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ५ रुपयांमार्फत माफ केलेल्या जमीन महसुलावर तसेच ५ ते १० रुपयांपर्यंत माफ केलेल्या जमीन महसुलावरील उपकर जिल्हा परिषदांना अदा केला जातो. सदरचे वाटप करतांना जिल्हा परिषदांना १००% जमीन महसूल उपकर दिला जातो. सन २०१४-१५ वित्तीय वर्षात रु. ११२,०३,२८,०००/- एवढी तरतूद मंजूर झालेली आहे.

**(३) जमीन महसूल वाढीव उपकर :** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १५५ नुसार राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना वाढीव उपकर अनुदानाच्या रुपाने वाटप केला जातो. सदरचा उपकर १ रुपया जमीन महसुलावर रु. ५/- इतका असतो. तर याच उपकराच्या एकूण ५ रुपयावर ८ रुपये या प्रमाणात सापेक्ष अनुदान देखील उपलब्ध करून दिले जाते. तसेच ५ रुपयांपर्यंत माफ केलेल्या जमीन महसुलावर व ५ ते १० रुपयांपर्यंत माफ केलेल्या जमीन महसुलावर जो वाढीव उपकर असतो तो देखील संबंधीत जिल्हा परिषदांना उपलब्ध करून दिला जातो. याचे वाटप करतांना जिल्हा परिषदा व पंचायत समिती यांच्यामध्ये ४०:६० या प्रमाणात वाटप केले जाते. या बाबीसाठी सन २०१४-१५ या वित्तिय वर्षाकरिता रु.१८६,३३,६६,०००/- इतकी तरतूद मंजूर झालेली आहे.

**(४) ७ टक्के वन महसूल :** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८१ नुसार राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना वन महसुलाचे अनुदानाचे वाटप केले जाते. जिल्ह्याच्या हद्दीतील वनांच्या ३ वर्षात वसूल केलेल्या स्थूल रकमांच्या सरासरीच्या ७ टक्के महसूल वन महसूल म्हणून प्रतीवर्षी जिल्हा परिषदांना उपलब्ध करून दिला जातो. याबाबतची अनुदानाची मागणी मुख्य वन संरक्षक, नागपूर यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर मागणीच्या रकमेचे अनुदान शासनाकडून या विभागामार्फत उपलब्ध करून दिले जाते. सदर अनुदान जिल्हा परिषदांना जंगल विभागात राहणाऱ्या लोकांच्या कल्याणकारी कामासाठी उपयोगात आणले जाते. सन २०१४-१५ या वित्तिय वर्षाकरिता रु. १६,११,४३,०००/- इतकी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झालेली आहे.

**(५) व्यवसाय व्यापार व आजिविका यावरील उपकर :** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम २८८ नुसार पुर्वीच्या लोकल बोर्डाचे अधिकार जिल्हा परिषदांना हस्तांतरीत झालेले आहेत. शासनाने व्यवसाय व्यापार व आजिविका अधिनियम १९७५ कलम २९ अन्वये लोकल बोर्डांचे पर्यायाने जिल्हा परिषदांचे कर आकारणी व वसुलीचे अधिकार संपुष्टात आणलेले आहेत. सन १९७५ पूर्वी ज्या जिल्हा परिषदांमार्फत व्यवसाय, व्यापार व आजिविका यावरील कर गोळा केले जात होते व त्यापोटी तेव्हा जेवढी रक्कम गोळा होत होती तेवढीच रक्कम आता त्यांच्या संबंधीत जिल्हा परिषदांना अनुदानाच्या रुपाने वाटप केली जाते. सन २०१४-१५ या वित्तिय वर्षाकरिता रु. २७,४२,०००/- इतकी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झालेली आहे.

**(६) मोटर वाहन कर अनुदान :** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम २८८ नुसार पुर्वीच्या लोकल बोर्डाचे अधिकार जिल्हा परिषदांना हस्तांतरीत झालेले आहेत. त्यानुसार मोटार वाहनावरील कर अधिनियम, १९५८ कलम ११(२) अन्वये वाहन करापोटीच्या भरपाईची रक्कम म्हणून ती जिल्हा परिषदांना देण्यात येते. ज्या जिल्हा परिषदांमार्फत मोटार वाहनावरील कर गोळा केले जात होते व जेवढी रक्कम त्या जिल्हा परिषदा गोळा करीत होत्या त्याच संबंधीत जिल्हा परिषदांना अनुदानाच्या रुपाने तेवढ्याच रकमेचे वाटप केले जाते. सन २०१४-१५ या वित्तिय वर्षाकरिता रु. ५,४४,०००/- इतकी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झालेली आहे.

**(ब) ग्रामपंचायतींना स्वउत्पन्नविषयक विविध बाबींसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाचा तपशील :**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा, पंचायत समिती अधिनियम १९६१ व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार राज्यातील ग्रामपंचायतींना जमीन महसूल अनुदान, जमीन समानीकरण अनुदान गौण खनिजावरील स्वामित्वधनाच्या मिळकतीतून अभिहस्तांकीत रकमा देणेसाठी ग्रामपंचायतींना सहाय्य, रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या देयकांची रक्कम भरण्यासाठी ग्रामपंचायतींना १००% अनुदान, ग्रामपंचायतींना यात्रेकरु कराऐवजी सहाय व मागास व आदिवासी क्षेत्रातील ग्रामपंचायतींना अनुदान ही अनुदाने ग्रामपंचायतींना उपलब्ध करून दिली जातात.

**(१) ग्रामपंचायतींना जमीन महसूल अनुदान** (३६०४०४७९)

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे १३१(१) अन्वये ग्रामपंचायतींना जमीन महसूल अनुदान देण्यात येते. ग्रामपंचायत क्षेत्रात मागील ५ वर्षाच्या कालावधीत जमा होणाऱ्या वसुलीच्या सरासरीप्रमाणे जमीन महसुलाचे संपूर्ण उत्पन्न ग्रामपंचायतींना जमीन महसूल अनुदान म्हणून देण्यात येते. सन २०१४-१५ या वित्तीय वर्षामध्ये या बाबींसाठी रु. ६,१५,६७,०००/- एवढी तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

**(२) ग्रामपंचायतींना जमीन समानीकरण अनुदान** (३६०४०४७९)

गावची लोकसंख्या १ रुपया या आधारे अनुदानाची एकूण रक्कम आणि ग्रामपंचायतींना देय असणाऱ्या जमीन महसूल अनुदानाची रक्कम यातील फरक भरून काढण्यासाठी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे १३२(अ) अन्वये सदर अनुदान देण्यात येते. सन २०१४-१५ या वित्तीय वर्षामध्ये या बाबींसाठी रु. २,२८,४०,०००/- एवढी तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

**(३) गौण खनिजावरील स्वामित्वधनाच्या मिळकतीतून अभिहस्तांकीत रकमा देणेसाठी ग्रामपंचायतींना सहाय** (३६०४०३१६)

ग्रामपंचायत क्षेत्रातील गौणखनिजावरील स्वामित्वधनाच्या मिळकतीतून जमा केलेल्या उत्पन्नाच्या १०० टक्के रक्कम ग्रामपंचायतींना अनुदान म्हणून देण्यात येते. तथापि, महसूल व वन विभागाच्या दिनांक १६ जानेवारी, १९८५ च्या शासन निर्णयानुसार या अनुदानाची रक्कम प्रत्येक ग्रामपंचायतीला १ लाखापेक्षा अधिक देय असणार नाही. सन २०१४-१५ या वित्तीय वर्षाकरिता या बाबींसाठी रु. १५,००,००,०००/- एवढी अनुदान मंजूर झाले आहे.

**(४) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या देयकांची रक्कम भरण्यासाठी ग्रामपंचायतींना १००% अनुदान** (३६०४०३२५)

महाराष्ट्रातील अनेक ग्रामपंचायतींची आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्याने ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची विज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १००% अनुदान देण्याचा शासनाने सन १९९० साली निर्णय घेतला आहे. सन २०१४-१५ या वित्तीय वर्षाकरिता या बाबींसाठी रु. १५६,४४,८५,०००/- एवढे अर्थसंकल्पीय अनुदान मंजूर झाले आहे.

**(५) ग्रामपंचायतींना यात्रा कराऐवजी सहाय (३६०४०३४३)**

ज्या ग्रामपंचायतीचे यात्रा करापासूनचे निव्वळ वार्षिक उत्पन्न (यात्रेसाठी येणारा खर्च वजा जाता) रु. ५००० पेक्षा जास्त आहे. अशा ग्रामपंचायतींनी यात्राकर न आकारल्यास त्यांना यात्रा करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या ७५% अनुदान देण्यात येते. या बाबींसाठी सन २०१४-१५ या वित्तीय वर्षाकरिता रु. २१,३५,०००/- एवढे अनुदान मंजूर झाले आहे.

**(६) मागास व आदिवासी क्षेत्रातील ग्रामपंचायतींना अनुदान (२५१५००४४)**

राज्यातील मागास व आदिवासी क्षेत्रातील ग्रामपंचायतीचे महसूली उत्पन्न कमी असते. यास्तव, दिनांक १-५-१९६० पूर्वी स्थापन झालेल्या व दिनांक १-५-१९६० नंतर स्थापन झालेल्या मागास व आदिवासी क्षेत्रातील ग्रामपंचायतींना अनुक्रमे २५०/- व रु. ५००/- दरवर्षी वित्तीय सहाय देण्यात येते. सन २०१४-१५ या वित्तीय वर्षाकरिता या बाबींसाठी रु. २१,००,०००/- एवढे अनुदान मंजूर झाले आहे.

**(क) तेरावा वित्त आयोग :--**

१. **कालखंड -** १ एप्रिल २०१४ ते मार्च २०१५

२. **उद्दीष्ट -** केंद्र शासनाच्या तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायत राज संस्थांच्या बळकटीकरणासाठी जनरल बेसिक ग्रँट, जनरल परफॉर्मन्स ग्रँट, स्पेशल एरिया बेसिक ग्रँट व स्पेशल एरिया परफॉर्मन्स ग्रँट या ४ प्रकारच्या ग्रँटच्या स्वरुपात राज्यास अनुदान मिळते.

३. **निधी वितरणाचे प्रमाण -** तेराव्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त होणारा जनरल बेसिक ग्रँट, जनरल परफॉर्मन्स ग्रँटचा निधी राज्यातील पंचायत राज संस्थांना जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत स्तरासाठी अनुक्रमे १०:२०:७० टक्के या प्रमाणात व स्पेशल एरिया बेसिक ग्रँट व स्पेशल एरिया परफॉर्मन्स ग्रँटचा निधी १०० टक्के ग्रामपंचायत स्तरासाठी विहित निकषानुसार वितरीत करण्यात येतो.

---

# जलसंधारण विभाग

# लघु सिंचन (जलसंधारण) विभाग

**प्रस्तावना :**

तत्कालीन पाटबंधारे विभागातील लघु सिंचन (जलसंधारण) विभाग आता लघु सिंचन (जलसंधारण), कृषि विभागातील मृदसंधारण विभाग व वन विभागातील सामाजिक वनीकरण विभाग यांचे एकत्रिकरण करून जलसंधारण विभागाची स्थापना ५ जून, १९९२ मध्ये करण्यात आली. यापैकी मृदसंधारण विभागाचे कार्यक्रम अंदाजपत्रक कृषि विभागाच्या कार्यक्रम अंदाजपत्रकासोबत छापण्यात येते. सामाजिक वनीकरण व लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) या उप विभागाचे कार्यक्रम अंदाजपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून छापण्यात येते. परंतु महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१४/प्र.क्र. १८८/फ-५, दि. ४ डिसेंबर, २०१४ अन्वये ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेले सामाजिक वनीकरण संचालनालय दि. १ जानेवारी २०१५ पासून महसूल व वन विभागाच्या प्रशासकिय नियंत्रणाखाली आणण्यात आले असल्यामुळे ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या सन २०१५-१६ च्या कार्यक्रम अंदाजपत्रक पुस्तिकेतून सामाजिक वनीकरण योजना वगळण्यात आली आहे.

जलसंधारण विभागातील लघु सिंचन जलसंधारण या उप विभागाकडे ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या लघु पाटबंधारे योजनांची कामे सोपविण्यात आली आहेत. यापैकी ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या योजनांचे कार्यान्वयन जिल्हा परिषदेतील लघु सिंचन विभागामार्फत करण्यात येत आहे व १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या योजनांचे कार्यान्वयन लघु सिंचन (जलसंधारण) विभागामार्फत करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेकडील योजनांसाठी तांत्रिक सहाय्य लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभागामार्फत पुरविण्यात येत आहे.

**लघु पाटबंधारे विभागाची रचना :**

जलसंधारण विभागातील लघु पाटबंधारे योजनांसाठी राज्य स्तरावर एक मुख्य अभियंता असून त्यांचे मुख्यालय पुणे येथे स्थापन करण्यात आले आहे. मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) यांच्या अधिपत्याखाली ६ मंडळ कार्यालये ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर येथे स्थापन करण्यात आली आहेत. प्रत्येक मंडळ कार्यालयासाठी एक अधीक्षक अभियंता यांचे पद मंजूर करण्यात आले आहे. प्रत्येक मंडळ कार्यालयाच्या अधिनस्त लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग व लघु सिंचन विभाग (जिल्हा परिषद) ही कार्यालये निर्माण करण्यात आली आहेत. तसेच राज्यामध्ये जलसंधारणाचा विशेष कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाची स्थापना दिनांक २२ ऑगस्ट, २००० रोजी करण्यात आली असून त्याचे मुख्यालय औरंगाबाद येथे स्थापन करण्यात आले आहे. जलसंधारण विभागातील लघु पाटबंधारे विभागाची रचना खालीलप्रमाणे आहे.



**जिल्हा परिषद व लघु सिंचन (जलसंधारण) विभागाची आस्थापना : लघु पाटबंधारे**

जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग (तक्ता क्रमांक १) कार्यालयातील व लघुसिंचन विभाग (जिल्हा परिषद) (तक्ता क्रमांक २) कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचा पदाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्रमांक - १**

**अधिकारी व कर्मचारी वर्गविषयक गोषवारा**

**लघु सिंचन (जलसंधारण) लघु पाटबंधारे विभागातील मंजूर पदे**

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | मंजूर पदे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | मुख्य अभियंता ... ... ... | ३७४००-६७००० | २ |
| २ | सहाय्यक मुख्य अभियंता ... ... ... | १५६००-३९१०० | २ |
| ३ | अधीक्षक अभियंता ... ... ... | १५६००-३९१०० | ६ |
| ४ | कार्यकारी अभियंता ... ... ... | १५६००-३९१०० | २६ |
| ५ | सहाय्यक अधीक्षक अभियंता ... ... ... | १५६००-३९१०० | ६ |
| ६ | उपकार्यकारी अभियंता ... ... ... | १५६००-३९१०० | २६ |
| ७ | उपविभागीय अधिकारी/अभियंता ... ... ... | १५६००-३९१०० | १३१ |
| ८ | शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता/ सहाय्यक अभियंता श्रेणी-२ ... | ९३००-३४८०० | ८८४ |
| ९ | अधीक्षक ... ... ... | ९३००-३४८०० | ७ |
| १० | प्रथम लिपीक ... ... ... | ९३००-३४८०० | ३४ |
| ११ | विभागीय लेखापाल ... ... ... | ९३००-३४८०० | २६ |
| १२ | वरिष्ठ लिपीक ... ... ... | ५२००-२०२०० | २५८ |
| १३ | कनिष्ठ लिपीक ... ... ... | ५२००-२०२०० | ३९१ |
| १४ | उच्च श्रेणी लघु लेखक ... ... ... | ९३००-३४८०० | ७ |
| १५ | टंकलेखक ... ... ... | ५२००-२०२०० | २२६ |
| १६ | आरेखक ... ... ... | ९३००-३४८०० | २६ |
| १७ | सहाय्यक आरेखक ... ... ... | ९३००-३४८०० | ६ |
| १८ | अनुरेखक ... ... ... | ५२००-२०२०० | १६० |
| १९ | भांडारपाल ... ... ... | ९३००-३४८०० | २६ |
| २० | सहाय्यक भांडारपाल ... ... ... | ५२००-२०२०० | २६ |
| २१ | वाहन चालक ... ... ... | ५२००-२०२०० | १६० |
| २२ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक ... ... ... | ५२००-२०२०० | १३१ |
| २३ | दप्तरी ... ... ... | ४४४०-७४४० | १ |
| २४ | नाईक ... ... ... | ४४४०-७४४० | ३२ |
| २५ | शिपाई ... ... ... | ४४४०-७४४० | ३८० |
| २६ | चौकीदार ... ... ... | ४४४०-७४४० | १६० |
| २७ | संशोधन अधिकारी ... ... ... | १५६००-३९१०० | ३ |
| २८ | संशोधन सहाय्यक ... ... ... | ९३००-३४८०० | ४ |
| २९ | सांख्यिकी सहाय्यक ... ... ... | ५२००-२०२०० | ६ |
| ३० | कनिष्ठ लिपीक ... ... ... | ५२००-२०२०० | १ |
| ३१ | शिपाई ... ... ... | ४४४०-७४४० | २ |
| | **एकूण** | | **३१५५** |

**तक्ता क्रमांक - २**

**अधिकारी व कर्मचारी वर्गविषयक गोषवारा**

**जिल्हा परिषद, लघु पाटबंधारे विभागातील मंजूर पदे**

| अ. क्र. १ | पदनाम २ | | | | वेतनश्रेणी ३ | मंजूर पदे ४ |
|---|---|---|---|---|---|---|
| **(अ)** | **राजपत्रित वर्ग-१** | | | | | |
| १ | कार्यकारी अभियंता | ... | ... | ... | १५६००-३९१०० | ३० |
| **(ब)** | **राजपत्रित वर्ग-२** | | | | | |
| १ | उप अभियंता | ... | ... | ... | १५६००-३९१०० | १८८ |
| **(क)** | **अराजपत्रित वर्ग-३** | | | | | |
| १ | शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता | ... | ... | ... | ९३००-३४८०० | ८०७ |
| २ | विभागीय लेखापाल | ... | ... | ... | ९३००-३४८०० | २० |
| ३ | अधीक्षक | ... | ... | ... | ९३००-३४८०० | २३ |
| ४ | वरिष्ठ सहाय्यक लेखाधिकारी | ... | ... | ... | ९३००-३४८०० | २० |
| ५ | वरिष्ठ सहाय्यक लिपीक | ... | ... | ... | ५२००-२०२०० | १७१ |
| ६ | कनिष्ठ सहाय्यक | ... | ... | ... | ५२००-२०२०० | ६२२ |
| ७ | आरेखक | ... | ... | ... | ९३००-३४८०० | १४ |
| ८ | कनिष्ठ आरेखक | ... | ... | ... | ५२००-२०२०० | २३ |
| ९ | अनुरेखक | ... | ... | ... | ५२००-२०२०० | १५४ |
| १० | संगणक चालक | ... | ... | ... | ५२००-२०२०० | १२ |
| ११ | भांडारपाल | ... | ... | ... | ९३००-३४८०० | ११ |
| १२ | सहाय्यक भांडारपाल | ... | ... | ... | ५२००-२०२०० | ११२ |
| १३ | वाहनचालक | ... | ... | ... | ५२००-२०२०० | १८ |
| **(ड)** | **अराजपत्रित वर्ग-४** | | | | | |
| १४ | हवालदार | ... | ... | ... | ४४४०-७४४० | २३ |
| १५ | परिचर/शिपाई | ... | ... | ... | ४४४०-७४४० | ४७६ |
| १६ | परिचर/चौकीदार | ... | ... | ... | ४४४०-७४४० | १२६ |
| | | | | **एकूण** | | **२८५०** |

**लघु सिंचन विभागाची कार्ये : (आता लघु सिंचन जलसंधारण)**

लघु सिंचन (जलसंधारण) विभागामार्फत ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या खालील प्रकारच्या योजनांचे सर्वेक्षण व अन्वेषण, बांधकाम व देखभाल/ दुरूस्ती इत्यादी कार्ये शासन निधी, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ निधी व जिल्हा नियोजन समिती निधी इत्यादी निधीस्त्रोतांमधून हाती घेण्यात येतात.

१) लघु पाटबंधारे योजना
२) कोल्हापूर पद्धतीचे बंधारे
३) साठवण बंधारे
४) पाझर तलाव
५) गाव तलाव
६) वळवणी बंधारे
७) उपसा जलसिंचन योजना (फक्त आदिवासी क्षेत्राकरिता)
८) क्षारपड जमिनीचा विकास
९) नाला सरळीकरण योजना
१०) माजी मालगुजारी तलावांची विशेष दुरूस्ती

११) लघु पाटबंधारे योजनेची प्रगणना
१२) लघुसिंचन तलाव
१३) उथळ कूपनलीका
१४) गेटेड सिमेंट बंधारे

**अ) राज्यस्तर शासन निधी योजना :**

**१) ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या योजना :**

लघु सिंचन (जलसंधारण) अंतर्गत राज्यस्तर ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या २१ योजना हाती घेण्याचे नियोजन आहे. या योजनांची अंदाजपत्रकीय किंमत रु. ६६.१३ कोटी असून सन २०१४-१५ साठी रु. १.४० कोटी निधी अर्थसंकल्पित झालेला आहे.

**२) १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या योजना :**

लघु सिंचन (जलसंधारण) अंतर्गत बिगर आदिवासी क्षेत्रातील प्रगतीपथावरील २११ योजनांची अंदाजपत्रकीय किंमत रु. ५६२.१८ कोटी असून झालेला खर्च रु. ४८३.९८ कोटी व उर्वरित किंमत रु. ७८.२० कोटी इतकी आहे. या योजनांची प्रकल्पीय सिंचन क्षमता २७३४४ हेक्टर आहे. या योजनांकरिता सन २०१४-१५ साठी रु. ३८.५० कोटी निधी अर्थसंकल्पित झाला आहे. सन २०१४-१५ या वर्षामध्ये १५ योजना पूर्ण होणार असून त्याद्वारे ३७५० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होईल.

**३) जलसंधारण महामंडळ :**

**(क) महामंडळाची स्थापना :** महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाची स्थापना दि. २२ ऑगस्ट, २००० रोजी करण्यात आली असून महामंडळाचे मुख्यालय औरंगाबाद येथे ठेवण्यात आलेले आहे.

**(ख) महामंडळाचा उद्देश :** महामंडळ स्थापनेचा मुख्य उद्देश राज्यातील २५० हेक्टर पर्यंतच्या सिंचन क्षमतेचे लघु पाटबंधारे प्रकल्प, पाणलोट व मृदसंधारण आणि सामाजिक वनीकरण, कामांचे प्रचालन, प्रवर्तन आणि शीघ्र विकास व नियमन करणे हा आहे,

**(ग) महामंडळाची घटना :** महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम २००० चे कलम ४ (१) अन्वये महामंडळात खालील सदस्यांचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| १. मा. जलसंधारण मंत्री | ... | पदसिध्द अध्यक्ष |
| २. मा. जलसंधारण राज्यमंत्री | ... | उपाध्यक्ष |
| ३. मा. कृषि मंत्री | ... | पदसिध्द सदस्य |
| ४. मा. जलसंपदा मंत्री | ... | पदसिध्द सदस्य |
| ५. व्यवस्थापकीय संचालक | ... | पदसिध्द सचिव |
| ६. शासनाचे प्रधान सचिव/सचिव/संचालक असे एकूण ९ | ... | सदस्य |
| ७. शासनाने नामनिर्देशित करावयाचे विधान सभेतून ५ | ... | सदस्य |
| ८. शासनाने नामनिर्देशित करावयाचे विधान परिषदेतून २ | ... | सदस्य |
| ९. शासनाने नामनिर्देशित करावयाचे पाटबंधारे क्षेत्रातील व आर्थिक क्षेत्रातील प्रत्येकी एक असे २ | ... | सदस्य |

असे अध्यक्षांसह एकूण २२ सदस्य आहेत.

**(घ) कार्यकारी समिती :**

अधिनियमातील कलम ५ व महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ सुधारणा अधिनियम २००१ (क २०) अनुसार महामंडळाच्या कार्यकारी समितीत खालील सदस्यांचा समावेश आहे :

| | | |
|---|---|---|
| १) महामंडळाचे अध्यक्ष | ... | मा.अध्यक्ष |
| २) महामंडळाचे उपाध्यक्ष | ... | मा.उपाध्यक्ष |
| ३) महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक | ... | सदस्य सचिव व इतर |
| ४) मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) पुणे | ... | सदस्य |
| ५) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,पुणे | ... | सदस्य |
| ६) संचालक, सामाजिक वनीकरण,पुणे | ... | सदस्य |
| ७) महामंडळाचे मुख्य लेखा व लेखा परीक्षा अधिकारी | ... | सदस्य |

असे एकूण ७ सदस्य आहेत.

**(च) लेखा विषयक धोरण :**

महामंडळाने रोख लेखा पध्दतीची प्रणाली अवलंबीली आहे. महामंडळामार्फत केली जाणारी कामे ही महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका व लेखा संहिता तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभागाने निर्देशित केल्यानुसार आणि जलसंपदा विभागाने निर्गमित केलेल्या (धोरणात्मक व तांत्रिक) शासन निर्णयानुसार केली जातात.

**(छ) निधीची उपलब्धता :**

महामंडळास मुख्यत्वे निधी उपलब्धता ही शासकीय अंशदान व कर्ज रोख्याच्या उभारणीतून होते. आतापर्यंत कर्ज रोख्याच्या माध्यमातून रु. १०३.०४ कोटी निधी उभा केलेला आहे.

**(ज) केलेल्या कामाचा तपशील :**

महामंडळाने पूर्ण केलेल्या, प्रगतीपथावरील व भविष्यकालीन योजना व दायित्व तसेच निर्मीत सिंचन क्षमता खालीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | योजनांचा तपशील | | योजनांची संख्या | आर्थिक दायित्व (रु. कोटीत) | सिंचन क्षमता (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पूर्ण झालेल्या योजना | ... | १४२२ | ... | ६७०६३ |
| २. | अंशत: पूर्ण झालेल्या योजना | ... | ३० | ... | २८०२ |
| ३. | प्रगतीपथावरील योजना | ... | २५६९ | १९८६.६० | ११०६१५ |
| ४. | प्रशासकीय मान्यता प्राप्त योजना | ... | १२०० | १२७१ | ३३९७० |

आतापर्यंत पूर्ण झालेल्या एकूण **१४२२** योजनांच्या माध्यमातून ६७,०६३ हेक्टर एवढी सिंचन क्षमता निर्मिती झालेली आहे. तसेच प्रगतीपथावरील व प्रशासकीय मान्यता प्राप्त योजनांची एकूण संख्या **३७६९** असून त्यासाठी लागणारा **निधी रु. ३२५७.६० कोटी** एवढा आहे. व यातून निर्मित होणारी सिंचन क्षमता **१४४५८५** हेक्टर एवढी आहे.

**४) नाशिक विभाग विकास कार्यक्रम :**

नाशिक विभाग विकास कार्यक्रमांतर्गत ५८ लघु पाटबंधारे योजनांची दुरुस्ती प्रस्तावित आहे. या योजनांच्या दुरुस्तीसाठी रु. ६.९४ कोटी निधीची आवश्यकता असून दुरुस्तीनंतर २७५६ हेक्टर सिंचन क्षमता पुनर्स्थापित होणार आहे. सन २०१४-१५ मध्ये याकरिता रु. २.१० कोटी निधी अर्थसंकल्पित झालेला आहे.

**५) सर्व्हेक्षण (लघु पाटबंधारे) ० ते २५० हेक्टर :**

० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या नवीन योजना हाती घेण्याचे दृष्टीने सदर योजनांच्या सर्व्हेक्षणाकरिता सन २०१४-१५ मध्ये ० ते १०० हेक्टरसाठी रु. ७.०० कोटी व १०१ ते २५० हेक्टरसाठी रु. १८.९० कोटी निधी अर्थसंकल्पित झालेला आहे.

**६) लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) योजनांचे संनियंत्रण व मूल्यमापन :**

लघु सिंचन (जलसंधारण) अंतर्गत पूर्ण झालेल्या लघु पाटबंधारे योजनांचे संनियंत्रण व मूल्यमापन करणेसाठी रु. १.०० कोटी इतका नियतव्यय राखीव ठेवण्यात आला आहे. या नवीन योजनेसाठी मंत्रीमंडळाची मान्यता घेण्यात आली असून नवीन लेखाशिर्ष उघडण्याचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

**ब) केंद्र पुरस्कृत/केंद्र सहाय्यित योजना :**

**१) ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या लघु पाटबंधारे योजनांची दुरुस्ती :**

केंद्र शासनाच्या दुरुस्ती, नुतनीकरण व पुनर्स्थापना (RRR) या कार्यक्रमांतर्गत विशेष क्षेत्राकरिता केंद्र शासनाचा ९० टक्के व राज्य शासनाचा १० टक्के तसेच सर्वसाधारण क्षेत्राकरिता केंद्र शासनाचा २५ टक्के व राज्य शासनाचा ७५ टक्के हिस्सा राहणार आहे. जलसंपदा विभागाकडील तांत्रिक सल्लागार समितीने (TAC) लघु सिंचन (जलसंधारण) विभागाचे एकूण २७७ डीपीआर मंजूर केले आहेत. त्यांची किंमत रु. ३१.१२ कोटी असून याद्वारे ४६१४ हेक्टर सिंचन पुनर्स्थापित होणार आहे.

जिल्हा परिषदेकडील ३८५ डीपीआर तांत्रिक सल्लागार समितीने (TAC) मंजूर केले आहेत. त्यांची किंमत रु. ४४.५६ कोटी असून त्याद्वारे ५६३५ हेक्टर सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित होणार आहे. अशाप्रकारे एकूण ६६२ डीपीआर तांत्रिक सल्लागार समितीने (TAC) ने मंजूर केले असून त्यांची एकूण किंमत रु. ७५.६९ कोटी इतकी असून याद्वारे १०२४९ हेक्टर क्षेत्र पुनर्स्थापित होणार आहे.

उपरोक्त सर्व ६६२ डीपीआर केंद्रीय जल आयोग, नागपूर यांचेमार्फत केंद्र शासनास सादर झालेले आहेत. उपरोक्त एकूण रु. ७५.६९ कोटी मध्ये राज्य शासन हिस्सा रु. १७.३९ कोटी व केंद्र शासन हिस्सा रु. ५८.३७ कोटी इतका आहे.

राज्य शासनाने सन २०१३-१४ मध्ये दुरुस्ती, नूतनीकरण व पुनर्स्थापना (आरआरआर) करिता रु. १५.०० कोटी निधी अर्थसंकल्पित केलेला आहे.

उपरोक्त ६६२ प्रस्तावांची मंजुरी केंद्र शासनाकडून प्रतिक्षेत आहे.

**२) लघु पाटबंधारे योजनांची प्रगणना :**

० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या लघु पाटबंधारे योजनांच्या प्रगणनेकरिता केंद्र शासनाकडून १०० टक्के निधी प्राप्त होत असतो. या कार्यक्रमांतर्गत चौथी लघु पाटबंधारे योजनांची प्रगणना पूर्ण करण्यात आली असून पाचव्या लघु पाटबंधारे योजनेची प्रगणना करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. सन २०१३-१४ या वर्षी रु.१.४० कोटी इतका निधी या कार्यक्रमासाठी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

**३) जर्मन अर्थसहाय्यित लघु पाटबंधारे कार्यक्रम-महाराष्ट्र (MIP-M):(Externally Aided Project)**

केंद्र शासन, के.एफ.डब्ल्यू. जर्मन बँक व राज्य शासन यांच्या संयुक्त प्रयत्नामधून जर्मन अर्थसहाय्यित लघु पाटबंधारे कार्यक्रम-महाराष्ट्र (MIP-M) राज्यात ०१ फेब्रुवारी, २००१ पासून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या लघु पाटबंधारे योजनांची कामे हाती घेतली जात होती. यामध्ये मुख्य धरणाचे कामासाठी केएफडब्ल्यू बँक कर्ज सहाय्य करीत होती व राज्य शासनाकडून योजनेच्या भूसंपादन व स्वामीत्व शुल्कासाठी निधी देण्यात येत होता तसेच लाभार्थी त्यांच्या शेतावरील पाटचाऱ्यांसाठी योगदान देत होते. सदर कार्यक्रम माहे ३० सप्टेंबर, २०११ मध्ये बंद झाला असून सद्य:स्थितीत १० योजनांची किरकोळ स्वरूपाची कामे बाकी आहेत. उर्वरित १५ योजना पूर्ण झाल्या असून पाणी वापर संस्थांमार्फत व्यवस्थापन सुरू आहे. यामध्ये निर्मित सिंचन क्षमतेचा वापर ८० टक्के एवढा आहे. यासाठी रु.१.४० कोटी निधी अर्थसंकल्पित आहे.

**४) राष्ट्रीय कृषि विकास योजना :**

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषि विकास योजने (RKVY) अंतर्गत जलसंधारण विभागामार्फत खालील योजना राबविण्यात येतात. या बाबतचा संक्षिप्त तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**(क) माजी मालगुजारी तलाव दुरुस्ती कार्यक्रम :**

पूर्व विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया व नागपूर जिल्ह्यात माजी मालगुजारी तलाव दुरूस्ती कार्यक्रम सन २००७-०८ पासून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत एकूण १६४० माजी मालगुजारी तलाव दुरूस्त करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते त्यापैकी १३७७ माजी मालगुजारी तलावांची दुरुस्ती पूर्ण झालेली आहे. सद्य:स्थितीत २५७ माजी मालगुजारी तलावांची दुरुस्ती प्रगतीत आहे व उर्वरित ३४ माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे हाती घेऊन माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीचे काम मार्च-२०१४ पर्यंत पूर्ण करावयाचे नियोजन आहे. सदर कामासाठी आतापर्यंत रु. ५३.०० कोटी निधी प्राप्त झाला असून त्यापैकी रु. ५२.९२ कोटी खर्च झाला आहे.

**(ख) शॅलो ट्युबवेल :**

विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली व नागपूर या जिल्ह्यातील शॅलो ट्युबवेल कामांसाठी रु.११.२६ कोटीचा कार्यक्रम मंजूर करण्यात आला होता. या कार्यक्रमांतर्गत १०१ शॅलो ट्युबवेलची कामे पूर्ण झाली असून ८३ प्रगतीपथावर आहेत. सदर योजनेवर आतापर्यंत रु. ९.०१ कोटी एवढा निधी प्राप्त झाला असून ८.०० कोटी खर्च झाला आहे. सदर १०१ शॅलो ट्युबवर ५०५ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण झाले आहे.

**(ग) क्षारपड जमीन सुधारणा प्रकल्प :**

सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील जमिनी अती पाण्याचा वापर, नैसर्गिक नाल्यामधील अडथळे व रासायनिक खतांचा जास्त प्रमाणात वापर यामुळे क्षारपड झाल्याने नापीक झाल्या आहेत. यापैकी उरण इस्लामपूर, साखराळे, बोरगाव व कासेगाव या चार गावातील ९१२ हेक्टर क्षारपड जमीन सबसरफेस ड्रेनेज सिस्टिम (SSD) या नवीन तंत्रज्ञानाने सुधारणा करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. सदर प्रकल्पास शासनाने रु. ९९९.७८ लक्ष किमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यापैकी १८.८५ कि. मी. इतके काम पूर्ण झाले आहे.

ही कामे केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY) अंतर्गत करावयाची असून यामध्ये केंद्र शासनाचा ६०%, राज्य शासनाचा २०%, तसेच लाभार्थी शेतकऱ्यांचा २०% हिस्सा प्रस्तावित आहे. प्रकल्पासाठी (RKVY) अंतर्गत केंद्र शासनाचा ६०% हिस्सा (रु. ५४९.७० लक्ष) पैकी रु. १८०.०० लक्षचा पहिला हप्ता मंजूर झाला आहे. तसेच बंदिस्त निचरा प्रणालीच्या कामापैकी राज्य शासनाच्या हिश्शाची रु. ७५.०४ लक्ष व मुख्य चरीच्या कामाची रक्कम रु. ३००.०० लक्ष इतका खर्च जिल्हा वार्षिक योजना, सांगली यांच्या प्रचलीत तरतुदीतून भागविण्याचे नियोजन आहे. प्रकल्पाची प्राथमिक कामे (सर्वेक्षण, माती परीक्षण इ.) पूर्ण झालेली आहेत. सदर कामे ब-१ निविदाद्वारे प्रगतीपथावर आहे. सदर कामावर रु. ४८२.९८ लक्ष खर्च झालेला आहे.

बंदीस्त निचरा प्रणालीचा वापर करून पुणे, सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील क्षारपड जमीन विकास करण्याबाबतचा प्रकल्प मंजूर करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पाची सुधारित मंजूर किंमत रु. ६२.०५ कोटी एवढी असून सदर प्रकल्पाचे काम करण्यासाठी रु. २.७६ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प राज्यस्तरीय मंजूर समितीने सन २०११-१२ मध्ये मंजूर केला असून, सदर प्रकल्पाचा कालावधी तीन वर्षाचा आहे. (सन २०११-१२, सन २०१२-१३, सन २०१३-१४) सदर योजनेमुळे ७१४५ हेक्टर एवढे क्षेत्र पुन:स्थापित होणार आहे. सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले आहे. सांगली जिल्ह्यातील

६ गावामधील एसएसडी व मेन ड्रेनच्या समडोळी, निलजी, ब्रम्हनाळ, वसगडे, धनगाव, बुरुंगवाडी व कारंदवाडी तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील उदगांव व कुरुंदवाड गावातील कामांचे आदेश देण्यात आले आहेत. कामावर रु. २२६.३५ लक्ष खर्च झालेला आहे.

**क्षारपड जमीन विकास कार्यक्रम अंतर्गत मुख्य चरीचे काम करणेबाबत :**

सदर कामाची किंमत रु. ६.५० कोटी असून सदर काम तीन वर्षात करण्यात येणार आहे. (सन २०११-१२, सन २०१२-१३ व सन २०१३-१४) सदर कामे प्रगतीपथावर आहेत. ४.७५ कि.मी. मुख्य चरीचे काम झालेले आहे.

| अ. क. | योजनेचे नाव | कामाचे स्वरूप | मंजूर निधी (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| १ | दुधगांव व दुधगांव (अतिरिक्त) ता. मिरज, जि. सांगली | मुख्य चरीचे काम | २५०.०० |
| २ | कसबे डिग्रज ता. मिरज, जि. सांगली | मुख्य चरीचे काम | २००.०० |
| ३ | उरण इस्लामपूर, साखराळे, बोरगांव व कासेगांव ता. वाळवा, जि. सांगली | मुख्य चरीचे काम | २००.०० |
| | | **एकूण** | **६५०.००** |

मंजूर रु. ६५० कोटी पैकी रु. ४६६.०० लक्ष निधी वितरीत केला असून रु. २९९.३७ लक्ष खर्च करण्यात आला आहे.

**(घ) राजीव गांधी सिंचन व कृषि विकास कार्यक्रम :**

लघु सिंचन कार्यक्रम-महाराष्ट्रात या कार्यक्रमास मिळालेले यश विचारात घेऊन शासनाने राजीव गांधी सहभागीय सिंचन व कृषि विकास कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. बांधण्यात आलेल्या सिंचन प्रकल्पांपासून निर्माण करण्यात आलेल्या प्रकल्पीय सिंचन क्षमतेचा पुरेपुर वापर होत नसल्याने अस्तित्वात असलेल्या सिंचन प्रकल्पांपासून जास्तीत जास्त सिंचन क्षमता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा हेतू आहे. याद्वारे सुमारे ४२३८ हेक्टर सिंचन क्षमता पुन:स्थापित करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम हा ३ वर्षाचा असून यासाठी रु. २५ कोटी खर्च येणार आहे. सदर कार्यक्रमासाठी विहीत केलेल्या निकषानुसार, पश्चिम महाराष्ट्र- ६ योजना, मराठवाडा - ८ योजना व विदर्भ - ११ योजनांची (एकूण २५ योजना) निवड करण्यात आली आहे. सदर योजनांची दुरुस्ती लोकसहभागातून करण्यात येणार आहे. मुख्य धरणाची व मुख्य वितरीकेची दुरुस्ती शासन निधीतून तर उपवितरण व्यवस्था व शेतचाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी लाभार्थ्यांकडून श्रमदान/साहित्य किंवा आर्थिक हिश्शाच्या स्वरुपात ३० टक्के सहभाग घेण्यात येणार आहे. सदर २५ योजनांवर पाणी वापर संस्था स्थापन झाल्या असून सर्व २५ योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर झाले आहेत. १३ योजनांची कामे प्रगतीपथावर असून उर्वरित १२ योजनांची निविदा प्रक्रिया सुरु आहे. सदर कार्यक्रमावर आतापर्यंत रु. ४१०.०० लक्ष खर्च झाला आहे.

**५) ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या प्रगतीपथावरील लघु पाटबंधारे योजना : (Fast Tracking of Last Mile Project)**

० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेचे ७५ टक्के पेक्षा जास्त पूर्ण झालेल्या लघु पाटबंधारे योजनांना निधी देवून सिंचन क्षमता वापरात आणण्याचा हा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमासाठी एकूण रु. १९८.७० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला असून आजपावेतो या कामावर रु. १३४.७० कोटी एवढा निधी खर्च झालेला आहे. सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात रु. ०.७३ कोटी निधी प्राप्त झालेला आहे.

**६) ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या योजनांची १०० टक्के तपासणी करणेबाबत :**

या योजने अंतर्गत जिल्हा परिषद व स्थानिक स्तर यंत्रणेच्या पूर्ण झालेल्या १६४५७ योजनांची तपासणी केली जाणार आहे. या कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. या कामासाठी रु.५.०० कोटी निधी प्राप्त झालेला आहे.

**७) निघोट नाल्याचे सरळीकरण करणेबाबत, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर :**

सदर कामास शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून सदर कामाची किंमत रु. २१.३३ लक्ष एवढी आहे. सदर कामास सन २०११-१२ साठी रु.२०.०० लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला असून तो खर्च करण्यात आला आहे. योजनेचे काम पूर्ण झालेले आहे.

---

# मृदसंधारण

## प्रस्तावना

**पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत विविध मृदसंधारण उपचारांच्या संदर्भात मिळणाऱ्या सवलती**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सीडीपी-११८३/२४४८३/सीआर-९६/९- अे, दि. २८ जुलै १९८३ अन्वये सर्वकष पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमातील मृद व जलसंवर्धनाची कामे संपूर्ण शासकीय खर्चाने करण्यात येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांवर कोणत्याही प्रकारचे कर्ज लादले जात नाही.

मृद व जलसंधारणाचे विविध उपचार पद्धतीचे शासन निर्णय :--

(१) क्र. जलयो-२०९४/सी आर-२०८/जल-७, दि. ५.१०.१९९४,

(२) क्र. जलयो-१०९४/सीआर-६९/जल-७ दि. २४.५.१९९५

(३) जलयो-२०९५/प्र.क्र.-८७/जल-७, दि. २०.१०.१९९५ आणि क्र. जलसं-१०९८/प्र.क्र. ६६६/जल-७ दि. ३०.१.१९९९

(४) शेततळ्याच्या तांत्रिक निकषास बदल करण्याबाबत शासन निर्णय क्र. जलसं/२००२/प्र.क्र. ६६४/जल-७, दि. ३-१-२००३

(५) क्र. जलसं-१००१/प्र.क्र. ४२६/जल-७, दि. १९.९.२००१

(६) शा.नि.क्र. रोहयो-२००७/प्र.क्र. ९५/रोहयो-१, दि. १६ जुलै २००७

(७) शा.नि.क्र. जलसं-२००८/प्र.क्र.-५६/जल-७, दि. ११.४.२००८ अन्वये मंजुर मापदंड सोबत जोडले आहेत.

(८) शासन निर्णय क्र. मग्रारो-२००९/प्र. १६६/मग्रारी-१, दि. २० जानेवारी, २०१०

(९) शासन निर्णय क्र. जलसं-२०१२ प्र.क्र. २३/जल-७, दि. ३१.५.२०१२

(१०) शासन निर्णय क्र. जलसं-२०१२ प्र.क्र. २३/जल-७, दि. १.६.२०१२

(११) शासन निर्णय क्र. जलसं-२०१२/प्र.क्र. २३/जल-७, दि. ५.३.२०१३ मृद व जलसंधारणाच्या विविध उपचांराची कामे मजुरांच्या सहाय्याने करण्यासाठी सुधारित तांत्रिक/मापदंडाचा तक्ता

(१२) शासन निर्णय क्र. जलसं-२०१२ प्र.क्र. २३/जल-७, दि. ५.३.२०१३ मृद व जलसंधारणाच्या विविध उपचांराची कामे मशिनच्या सहाय्याने करण्यासाठी सुधारित तांत्रिक/आर्थिक मापदंडाचा तक्ता

(१३) शासन निर्णय क्र. मापदंड-२०१३ प्र.क्र. ११४/जल-७, दि. १०.१०.२०१३ व १५.१०.२०१३ मृद व जलसंधारणाच्या विविध उपचांराची कामे मजुरांच्या व मशिनच्या सहाय्याने करण्यासाठी सुधारित तांत्रिक/आर्थिक मापदंड.

# मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन-सर्वसाधारण प्रगती

राज्यातील ३०७.५८ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी १८०.६४ लाख हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे. या क्षेत्रातील ८५ टक्के क्षेत्र कोरडवाहू असल्यामुळे राज्यातील ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने कोरडवाहू शेतीवर अवलंबून आहे. विविध स्तोत्राद्वारे राज्यातील जास्त ३० टक्के क्षेत्रच ओलिताखाली येण्याची शक्यता असल्यामुळे भविष्यातही ग्रामीण भागाचा विकास हा प्रामुख्याने कोरडवाहू क्षेत्राच्या विकासाशी निगडीत राहणार आहे.

राज्यात मृदसंधारण कामाची सुरुवात सन १९४३ पासून झाली असून मृद संधारणाची कामे सन १९८३ पर्यंत एकेरी उपचार पध्दतीने विखूरलेल्या स्वरुपात राबविण्यात येत होती. राज्यातील कोरडवाहू क्षेत्राची व्याप्ती व कोरडवाहू क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्याकरिता मृद व जलसंधारण कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता लक्षात घेऊन राज्य शासनाने सन १९८३ पासून सर्वंकष पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. पाणलोट क्षेत्र आधारित मृद व जलसंधारणाची कामे राबविण्याचा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमामध्ये मृद व जलसंधारण विभागाशिवाय या कार्यक्रमासाठी पुरक असणाऱ्या भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, सामाजिक वनीकरण, लघुसिंचन या विभागांचा देखील सहभाग आवश्यक असल्यामुळे **१९९२ मध्ये राज्य शासनाने स्वतंत्र जलसंधारण विभागाची निर्मिती केली.** जलसंधारण कार्यक्रम लोकसहभागाच्या माध्यमातून गांव घटक मानून राबविण्याच्या संकल्पनेसह जानेवारी १९९६ मध्ये एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.

**पाणलोट कार्यक्रमाचे उद्देश :-**

१. विविध कारणामुळे होणारी जमिनीची धूप थांबविणे.
२. पाणलोट क्षेत्रात उगमापासून ते संगमापर्यंत विविध उपचाराद्वारे अपधावेचे नियंत्रण करुन भुगर्भातील पाणीसाठा वाढविणे.
३. गाव घटक मानून लोक सहभागाच्या माध्यमातून कार्यक्रम राबविणे.
४. पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत्र बळकट करणे व अशा स्त्रोतांचे संरक्षण करणे.
५. पडीक, अवनत व अतिधूपीत जमिनीचा विकास करणे.
६. कृषि उत्पादनामध्ये वाढ करुन सातत्य राखणे.

**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन विभागामार्फत सध्या राज्यात पुढील केंद्र पुरस्कृत व राज्यपुरस्कृत योजना राबविण्यात येतात :-**

**केंद्र पुरस्कृत योजना :-** (१) पश्चिम घाट विकास कार्यक्रम

(२) एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम (आय डब्ल्यू एम पी) सन २००९-१० पासून सुरु

(३) राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम

(४) राष्ट्रीय कृषि विकास योजना

अ) महात्मा फुले जलभूमी संधारण अभियान

ब) साखळी पध्दतीने सिमेंट नाला बांध (चेकडॅम) बांधणेचा कार्यक्रम

क) विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम

**राज्य पुरस्कृत योजना :-** अ) एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम (गतिमान)

ब) साखळी पध्दतीने सिमेंट नाला बांध (सीएनबी) बांधणेचा कार्यक्रम

क) आदर्श गाव योजना

ड) नाबार्ड-ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी सहाय्यीत मेगा पाणलोट विकास कार्यक्रम

इ) पाणलोट विकास चळवळ

**एकात्मिक पाणलोट क्षेत्र कार्यक्रमाची व्याप्ती :-** राज्यात एकूण ४३७११ गावे असून त्यापैकी ३५७१७ म्हणजे ८४ टक्के गावे ही कोरडवाहू गावे आहेत. जलसंधारण कार्यक्रमासाठी विहीत केलेल्या निकषानुसार सन १९९२ पासून माहे मार्च २०१३ पर्यंतच्या कालावधीत जिल्हा स्तरीय यंत्रणेने २१५८० गावांची निवड केलेली आहे. त्यापैकी १५८५४ गावांमध्ये जलसंधारणाची कामे हाती घेतलेली आहेत. राज्यात दिनांक १-४-१९९२ पासून १२३७७ पाणलोट विकसित झाले असून राज्यात मार्च २०१४ अखेर रुपये ९१०९.५७ कोटीची मृद संधारणाची कामे करण्यात आली आहेत.

**सन १९९२ ते मार्च २०१४ अखेरची प्रगती**

| | | |
|---|---|---|
| १) | ३० जानेवारी १९९६ च्या शासन निर्णयानुसार निवडलेली गावे (संख्या) | २१५८० |
| २) | एकूण निवडलेले पाणलोट (संख्या) | ३४५४३ |
| ३) | प्रत्यक्ष सुरू केलेली गावे (संख्या) | १५८५४ |
| ४) | प्रत्यक्ष काम सुरू केलेले पाणलोट (संख्या) | २७५८७ |
| ५) | दि. १-४-१९९२ पासून पूर्ण झालेले पाणलोट (संख्या) | १२३७७ |
| ६) | पूर्ण झालेल्या पाणलोटांचे क्षेत्र (लाख हेक्टर) | १३८.३४ |

**मृद संधारण कार्यक्रमांतर्गत ज्या विविध उपचारांचा समावेश करण्यात आला आहे ते खालीलप्रमाणे :-**

**अ) क्षेत्र उपचारांची कामे :-**

(१) **समतल सलग चर :-** राज्यातील पडीक जमीन विकास कार्यक्रमांतर्गत बिगर शेतीखालच्या जमिनीत मातीसारख्या अमूल्य अशा विकास माध्यमांचे संरक्षण करणे मृद व जल संधारण करणे तसेच वृक्ष व चारा यांचे माध्यमातून स्थानिक लोकांच्या गरजा भागविणे व पर्यावरण संतुलन करणे हा सर्वसाधारण हेतू आहे. कमीत कमी खर्चात मृद व जलसंधारण करण्यासाठी सलग समपातळी चर घेऊन वृक्ष लागवड करावयाची आहे. या कामासाठी जमिनीचा उतार व पर्जन्यमान विचारात घेऊन राज्यांत पडीक जमीन विकासासाठी निरनिराळे आठ नमुने तयार करण्यात आले असून त्याप्रमाणे कामे करण्यात येत आहेत. सन **२०१५-१६** मध्ये समतल सलग चर **२९४४२** हे क्षेत्रावर खोदण्याचे उद्दिष्ट आहे.

(२) **जैविक बांधासह समपातळी / ढाळीची बांधबंदिस्ती :-** मृद संधारणाच्या ज्या अभियांत्रिकी उपाययोजना आहेत त्या अत्यंत खर्चिक असून त्यांचे परिणामही कालांतराने दिसून येतात. यासाठी कमी खर्चिक व लवकर परिणाम देणारी उपाययोजना म्हणून जैविक बांधाचे तंत्रज्ञान विकसीत करण्यात आले आहे. जैविक बांध म्हणजे मातीच्या किंवा दगडाच्या बांधाएवढी समपातळी रेषेवर गवत किंवा घायपात या सारख्या वनस्पतींची घट्ट लागवड करून भूपृष्ठावरुन वाहणाऱ्या पाण्यास अडथळा निर्माण करणे की जेणेकरुन पाण्याबरोबर येणाऱ्या मातीचे कण या ठिकाणी अडतील व स्वच्छ पाणी त्या बांधातून संथपणे वाहून जाईल. पाणी या वनस्पतीच्या जाळ्यातून वाहून जाऊ शकत असल्यामुळे या बांधास विशिष्ट प्रकारच्या सांडव्याची किंवा बांधास ढाळ देण्याची आवश्यकता रहात नाही. मातीच्या बांधाप्रमाणे हे बांध वाहून जाण्याची किंवा फुटण्याची शक्यता नसल्याने ते कोणत्याही प्रकारच्या तीव्र उताराच्या जमीनीवर देखील घालता येतात. मृद संधारणाचा हा एक स्वस्त व प्रभावी उपाय आहे. सन **२०१५-१६** या वर्षात **५१८६९८** हेक्टर जैविक बांधासह समपातळी / ढाळीचे बांधबंदिस्तीचे उदिष्ट ठरविलेले आहे.

(३) **पाणलोट क्षेत्र योग्य ठिकाणी धानाच्या जमिनीची बांधबंदिस्ती व मजगीची कामे करणे :-** ही योजना सन १९५९ पासून सुरू झाली. महाराष्ट्राच्या पश्चिम घाट भागात व विदर्भामध्ये जास्त पावसाच्या क्षेत्रात विशेषत: ४-८ टक्के जमिनीच्या उतारावर १० ते २० मी. अंतरावर छोटी खाचरे निम्म्या भागात खोदाई व निम्म्या भागात भराई करुन केली जातात. या खाचरामध्ये पावसाचे पाणी अडविण्यासाठी बांध घातला जातो. व जादा पाणी सांडीद्वारे सोडून देण्यात येते. या कामासाठी सर्वसाधारणपणे हेक्टरी खर्च जास्त येतो. परंतु नापीक क्षेत्र हे पिकाखाली आणण्यात येत असल्यामुळे भाताच्या उत्पादनामध्ये वाढ होते ज्या भागात धानाची बांधबंदिस्ती व भातखाचरे केली जातात तो भाग अत्यंत कमी उत्पादनाचा असल्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्नाचे भातशेती हे साधन असल्यामुळे ही योजना अत्यंत परिणामकारक ठरली आहे. सन **२०१५-१६** या वर्षामध्ये **२९८६०** हेक्टर क्षेत्रावर धानाची बांधबंदिस्ती व मजगीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

(४) **शेत बांधबंदिस्ती :-** हा उपचार सन २००३ पासून सुरु करण्यात आला आहे. शेतातील पाणी शेतातच अडविण्यासाठी आणि याद्वारे मृद संधारण करण्यासाठी या उपचारांचा अत्यंत चांगला उपयोग होतो. शेतकऱ्यांच्या शेताच्या खालील बाजूच्या हद्दीवर जमिनीचा प्रकार व उतारानुसार ०.८० ते १.०० मीटर उंचीचा बांध घातला जातो. जास्तीचे पाणी पाईप अथवा दगडाच्या सांडव्याद्वारे बाहेर काढले जाते. साधारणपणे दर हेक्टरी २०० मीटर लांबीचे बांध घातले जातात. या उपचारास शेतकऱ्यांची चांगली मागणी असून सन **२०१५-१६** या वर्षासाठी **२०८५८४** हेक्टरचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

**ब) नाला उपचारांची कामे :-**

**(१) नाला बांधबंदिस्ती :- (अ) मातीचे नाला बांध :-** मातीच्या नाला बांधाची कामे राज्यात सन १९६९ पासून सुरु करण्यात आली. सुरवातीला ही कामे अवर्षण प्रवण क्षेत्रापुरती मर्यादित होती. नंतरच्या कालावधीत भूपृष्ठाखालील पाण्याच्या पातळीत वाढ करण्याच्या दृष्टीने या कामाची व्याप्ती वाढून राज्याच्या सर्व जिल्ह्यात ही कामे हाती घेण्यात येत आहेत. या कामासाठी जागा निवडीची मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे आहेत.

(१) नाल्याच्या तळाचा उतार ३ टक्केपेक्षा जास्त नसावा.

(२) नाल्याचे पाणलोट क्षेत्र कमीत कमी ४० हेक्टर व जास्तीत जास्त ५०० हेक्टर असावे.

(३) नाल्याची रुंदी ५ मीटर पेक्षा कमी व १५ मीटर पेक्षा जास्त असू नये.

(४) अतिरिक्त जादा पाणी बाहेर काढून देण्यासाठी नाल्याच्या बाजूला कठीण मुरुम असावा.

मातीच्या बांधामध्ये सर्वसाधारणपणे जास्तीत जास्त ४ मीटर उंचीचा पाणीसाठा केला जातो. मातीच्या नालाबांधामुळे भूगर्भातील पाणीसाठ्यात वाढ होऊन जवळपासच्या पाण्याच्या पातळीत वाढ होते असे मूल्यमापन अहवालावरुन दिसून आले आहे. सन २०१५-१६ या वर्षात ६५२५ मातीचे नाला बांध बांधण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

**(२) सिमेंट नाला बांध :-** पाणलोट आधारित नाला उपचारामध्ये सिमेंट नाला बांध उपचारास अनन्य साधारण महत्त्व आहे. ज्या ठिकाणी मातीचे नाला बांध घेण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य जागा उपलब्ध नाही अशा ठिकाणी सिमेंटचे नाला बांध बांधून पाणीसाठा केला जातो. यामुळे भूपृष्ठामध्ये पाण्याच्या पातळीत वाढ होण्यास मदत होऊन नाल्यालगतच्या विहीरींच्या पाणी पातळीमध्ये लक्षणीय वाढ होत असते. पर्यायाने विहीरीखालील बागायती क्षेत्रामध्ये वाढ होते. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन महाराष्ट्र शासनाने सन २०११-१२ पासून राज्यातील टंचाईग्रस्त जिल्ह्यांमध्ये पाणलोट आधारित उपचाराबरोबरच एकेरी पध्दतीने सिमेंट नालाबांधाचा उपक्रम हाती घेतेलेला आहे. त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :--

| अ.क्र. | वर्ष | टंचाईग्रस्त जिल्हे संख्या | निधी स्त्रोत | खर्च निधी (रु. कोटी) | पूर्ण झालेले सिमेंट नाला बांध | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०११-१२ | २३ | रा.कृ.वि.यो. | २५ | ५८३ | कार्यक्रम पूर्ण |
| २ | २०१२-१३ | ११ | रा.कृ.वि.यो. | २५ | ३३५ | कार्यक्रम पूर्ण |
| ३ | २०१२-१३ | ६ | राज्य निधी | १४२.८१ | १४९४ | कार्यक्रम पूर्ण |
| ४ | २०१३-१४ | ११ | राज्य निधी | ८०.०० | ४८७ | कार्यक्रम प्रगतीत |
| ५ | २०१४-१५ | २ | राज्य निधी | १०.८१ | ३२ | कार्यक्रम प्रगतीत |
| | **एकूण** | **५३** | | **२८३.६२** | **२९३१** | |

ही कामे सन १९८९ पासून शास्त्रोक्त पध्दतीने सुरू करण्यात आली. वर्ष २०१५-१६ या वर्षासाठी ५९०० सिमेंटचे नाला बांध बांधण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

**(३) वळण बंधारा :-** ज्या पाणलोट क्षेत्रामध्ये सर्वसाधारणपणे डिसेंबर अखेरपर्यंत ओढ्याला पाणी टिकते व सर्वसाधारणपणे १५० लिटर प्रतिसेंकद पाणी वहाते अशा नाल्यावर १ मीटर उंचीचे सिमेंटचे पक्के बांध घालून हे पाणी समपातळीमध्ये बाजूच्या शेतात वळविले जाते. भातखाचरांना सतत पाणी लागत असल्यामुळे नाल्याचे पाणी ढाळाने भातखाचरात वाहून नेण्यासाठी चराचा अवलंब केला जातो. ज्या नाल्याला वरील पाणलोट क्षेत्रात फारच कमी पाऊस पडतो व तो नाला फक्त पावसाळ्यात वाहतो व इतर वेळेस कोरडा पडतो या ठिकाणी या उपचाराने प्रवाही सिंचनाखाली क्षेत्र आणता येते. ही कामे सन १९९०-९१ वर्षात सुरु करण्यात आली. सन २०१५-१६ मध्ये ६५० वळण बंधारे बांधण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

**(४) गॅबीयन बंधारा :-** दिवसेंदिवस भूगर्भातील पाण्याचा साठा कमी होत चालला आहे. पाणलोटात पडलेले पावसाचे पाणी हे जे अपधावेच्या स्वरुपात वाहून जाते ते योग्य उपचाराद्वारे जागोजागी अडविणे व जिरविणे महत्वाचे आहे. परंतु काही भागात सांडव्यासाठी योग्य जागा मिळत नसल्यामुळे मातीचे बांध घालणे शक्य होत नाही. तर पक्का पाया मिळत नाही म्हणून सिमेंट बांध बांधता येत नाही अशा भागासाठी गॅबीयन स्ट्रक्चरचे बांधकाम सोपे व कमी खर्चाचे आहे. यामुळे अपधावेचा वेग कमी होऊन जमिनीची धूप थांबविण्यास व भूगर्भात पाणी मुरण्यास मदत होते. गॅबीयन स्ट्रक्चर म्हणजे अनघड दगडाच्या जाळीच्या गुंडाळ्यात नाला पात्रात घातलेला आडवा बांध होय. ही कामे १९९२ मध्ये राष्ट्रीय पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमातंर्गत सुरु करण्यात आली. परंतु सदर कामाची उपयुक्तता विचारात घेऊन सदरची कामे इतर पाणलोट उपचाराप्रमाणे तांत्रिक दृष्ट्या योग्य जागेची निवड करुन जलसंधारणाचा या नियमित उपचार म्हणून राबविण्यास शासनाने आता मान्यता दिलेली आहे. सन २०१५-१६ या वर्षात ८०० गॅबीयन बंधारे बांधण्याचे उद्दिष्ट ठरविले आहे.

**(५) शेततळे :-** शेताच्या खोलगट भागात वेगवेगळ्या आकारमानाचे शेततळे घेण्यात येतात. शेततळ्याचा उपयोग पाण्याचा तात्पुरता निचरा होणेसाठी पावसाचा ताण पडल्यास पिकांना संरक्षित पाणी देण्यासाठी तसेच भूगर्भातील पाणी साठ्यांत वाढ करणेसाठी होतो. सन २०१५-१६ वर्षात ३१९४९ शेततळे खोदण्याचे उद्दिष्ट आहे. कारण मृद संधारणाच्या व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाच्या नियमित कार्यक्रमाबरोबरच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या निधीतून ग्रामपंचायत व कृषि विभागामार्फत शेततळे कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

**(६) लहान मातीचे बांध :-**

(क) **ओघळीचे नियंत्रण :-** पावसाचे पाणी शेतात पडल्यानंतर त्यातील काही पाणी जमिनीत मुरते व बऱ्याच मोठ्या प्रमाणात जमिनीवरुन वाहुन जाते. पावसाचे पाणी जमिनीवरुन वहाताना त्याच्या लहानसहान ओघळी तयार होतात. व या ओघळीमधून वहात जाणाऱ्या पाण्याबरोबर जाणाऱ्या मातीला तेथेच अडवून व पाण्याची गती कमी करुन जमिनीत पाणी मुरण्यासाठी सुरवातीपासून ओघळीचे नियंत्रण करणे आवश्यक आहे. ही कामे सन १९९३-९४ पासून पाणलोटात घेण्यात आली आहेत.

(ख) **अनघड दगडाचे बांध :-** ओघळीचे रुपांतर लहान नाल्यात झाल्यानंतर त्यातून वहाणाऱ्या पाण्याचा वेग व परिमाण जास्त होतो अशा ठिकाणी शेतातील दगड गोळा करून त्याचा नाल्याच्या रुंदीएवढा बांध घालण्यात येतो या बांधासाठी नाल्याच्या पात्रात पाया खोदावा लागतो यामुळे दगडांना बळकटी येते. दगड रचतांना ते पडू नयेत यासाठी बांधाला दोन्ही बाजूनी उतार देण्यात येतो. अशा दगडाच्या बांधाची संख्या, ओघळीची लांबी उतार व शेत परिस्थितीप्रमाणे ठरविण्यात येते. सन २०१५-१६ या वर्षात ११४१७० इतके बांध घालण्याचे प्रस्तावित केले आहे.

**विवरणपत्र पत्र १**

**शासन निर्णय क्र. मापदंड-२०१३/प्र.क्र. ११४/जल-७, दिनांक १० ऑक्टोबर, २०१३ चे सहपत्र**

**मृद व जलसंधारणाच्या विविध उपचारांची कामे मजुरामार्फत करण्यासाठी सुधारित तांत्रिक/आर्थिक मापदंडाचा तक्ता**

| अ. क्र. | उपचाराचे नाव | तांत्रिक मापदंड | | | | | | | सपाटीकरण खोदकाम | परिमाण | आर्थिक मापदंड (रु.) (रु. १६२ प्रति दिनप्रमाणे) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उतार गट/ जमिनीचा प्रकार | पाया रुंदी मी. | बांधाची उंची मी. | माथा रुंदी मी. | बाजू उतार | बांधाचा छेद चौ.मी. | बांधाची लांबी मी. | परिमाण घ.मी. | | ज.जा.उ.यो /डों.भाग | इतर |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १ | ढाळीचे बांध बंदिस्ती | भारी | २.५० | ०.८० | ०.५० | १.२५:१ | १.२० | ९५ | .. | हेक्टर | १२८६५ | ११२०९ |
| | | मध्यम | २.३० | ०.७५ | ०.५० | १.२०:१ | १.०५ | १६५ | .. | -"- | १७७३४ | १५४५४ |
| | | हलकी | २.०० | ०.७५ | ०.५० | ०.०४ | ०.९५ | २१० | .. | -"- | १९९३७ | १७३८० |
| २ | (अ) भात खाचरे बांध बंदिस्ती (मजगी) | ३% पर्यंत | १.८० | ०.६८ | ०.४५ | ०.०४ | ०.७५ | ६५० | ७५० | हेक्टर | १११९६६ | ९७४०४ |
| | (कोकण व पश्चिम महाराष्ट्राकरिता) | ३ ते ६% | १.८० | ०.६८ | ०.४५ | ०.०४ | ०.७५ | ७२० | १३१२ | -"- | १६८७०९ | १४६७४४ |
| | (०.७५ चौ.मी. छेदाचे बांध) | ६ ते ८% | १.८० | ०.६८ | ०.४५ | ०.०४ | ०.७५ | ८१७ | १५०० | -"- | १९२२२४ | १६७१९९ |
| | (ब) ०.५४ चौ.मी. छेदाचे बांध असलेले भात | ३% पर्यंत | १.५० | ०.६० | ०.३० | ०.०४ | ०.५४ | ६५० | ७५० | हेक्टर | १००९३८ | ८७८१३ |
| | खाचरे बांध बंदिस्ती (मजगी) (पश्चिम | ३ ते ६% | १.५० | ०.६० | ०.३० | ०.०४ | ०.५४ | ७२० | १३१२ | -"- | १५६४९३ | १३६१२१ |
| | महाराष्ट्र कोकण व विदर्भ) (हलकी जमीन) | ६ ते ८% | १.५० | ०.६० | ०.३० | ०.०४ | ०.५४ | ८१७ | १५०० | -"- | १७८३६२ | १५५१४५ |
| ३ | भात खाचरे बांध बंदिस्ती (पॅडी बंडिग) (विदर्भाकरिता). . | | २.२० | ०.६० | ०.४० | १.५:१ | ०.७८ | ७७८ | ५६२.५ | -"- | १०००७१ | ८७११७ |
| ४ | जुनी भातशेती बांध दुरुस्ती (कोकण, पश्चिम महाराष्ट्र व विदर्भाकरिता) | बांधाचा अतिरिक्त छेद-०.४५ चौ.मी. | | | | | | | | हेक्टर | ३६९४३ | ३२१२५ |
| ५ | भात खाचरे बांध बंदिस्ती (पडकई कार्यक्रमातंर्गत दगडी बांधासह मजगी) (कोकण, पश्चिम महाराष्ट्र व विदर्भाकरिता) | | | | | | | | | | | |
| | (अ) ८ ते १२ टक्के उतार | ८ ते १२% | ०.८७ | ०.९० | ०.६० | ०.३:१ | ०.६६ | ८१६ | .. | हेक्टर | २५३५४६ | .. |
| | (ब) १२ ते १६ टक्के उतार | १२ ते १६% | ०.८७ | ०.९० | ०.६० | ०.३:१ | ०.६६ | ११२६ | .. | -"- | ३०२३२६ | .. |
| | (क) १६ ते २० टक्के उतार | १६ ते २०% | ०.८७ | ०.९० | ०.६० | ०.३:१ | ०.६६ | १४११ | .. | -"- | ३४९५०९ | .. |
| ६ | शेत बांध बंदिस्ती (कंपार्टमेटचे बंडीग) | | | | | | | | | | | |
| | ० ते ४ उतार व हलकी जमिन | हलकी | १.८० | ०.७५ | ०.३० | ०.०४ | ०.८० | २०० | .. | हेक्टर | १४५३१ | १२८४५ |
| | ० ते ४ उतार व मध्यम जमिन | मध्यम | २.०० | ०.८५ | ०.३० | ०.०४ | १.०० | २०० | .. | -"- | १७७६२ | १५६५५ |
| | ० ते ४ उतार व भारी जमिन. . | भारी | २.२५ | ०.९० | ०.४५ | ०.०४ | १.२० | २०० | .. | -"- | २०९९४ | १८४६५ |
| ७ | चिंबड जमिन सुधारणा (उघडे चर) | | ०.६० | १.२० | ३.६० | १.२५:१ | २.५२ | ६५ | .. | हेक्टर | ३७५४९ | ३२६८८ |
| ८ | गॅबियन बंधारा | | २.४५ | १.०० | ०.४५ | ०.०४ | १.४५ | .. | .. | घ.मी. | १००१ | ९५२ |
| ९ | शेततळे | शेततळ्याचा आकार १५x१५x३ मी. ते ३०x३०x३ मी.बाजू उतार बाजुने १:१ ते १.५:१,बम २ मी. | | | | | | | | ह.घ.मी. | १५४८९१ | १३४७०८ |
| १० | मऊ खडकामध्ये शेततळे | २ मि. खोलीपर्यंत सर्वसाधारण भूस्तर व १ मी. मऊ खडकामध्ये खोदकाम | | | | | | | | अ.क्र.९ वरील शेततळ्याच्या मापदंडापेक्षा २५ टक्के अधिक मापदंड लागू राहतील. | | |
| ११ | खोदतळे | खोदतळ्याचा आकार ३०x२०x३ - दोन्ही काठाच्या बाजुने १:१ प्रवाहाच्या दिशेने वरील बाजूस ३.१ खालील बाजूस ६:१ | | | | | | | | अ.क्र.९ वरील शेततळ्याच्या मापदंडाएवढा मापदंड लागू राहतील | | |
| १२ | अर्दन स्ट्रक्चर (मातीचा बांध) | | २.७६ | ०.७२ | ०.६० | १.५:१ | १.२० | | .. | घ.मी. | १७६ | १५४ |

**विवरणपत्र पत्र १**

**शासन निर्णय क्र. मापदंड-२०१३/प्र.क्र. ११४/जल-७, दिनांक १० ऑक्टोबर, २०१३ चे सहपत्र**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | अनघड दगडाचे बांध (अ) ० ते ५ टक्के उताराच्या ओघळीवरील बांधास दोन्ही बाजूस १:१ बाजू उतार | | | | | | | | | | | |
| | पाणलोट क्षेत्राचा वरचा भाग (अपर रिचेस) | .. | २.०० | ०.७५ | ०.५० | ०१:०१ | ०.९४ | .. | .. | घ.मी. | २६३ | २२९ |
| | पाणलोट क्षेत्राचा मधलाभाग (मिडल रिचेस) | .. | २.५० | १.०० | ०.५० | ०१:०१ | १.५० | .. | .. | -"- | २६३ | २२९ |
| | (ब) ५ ते १५ टक्के उताराच्या ओघळीवरील बांधास पुढील बाजुस १:१ व मागील बाजूस २:१ बाजू उतार | | | | | | | | | | | |
| | पाणलोट क्षेत्राचा वरचा भाग (अपर रिचेस) | .. | २.७५ | ०.७५ | ०.५० | ०१:०१ | १.२२ | .. | .. | घ.मी. | २६३ | २२९ |
| | पाणलोट क्षेत्राचा मधलाभाग (मिडल रिचेस) | .. | ३.५० | १.०० | ०.५० | ०१:०१ | २.०० | .. | .. | -"- | २६३ | २२९ |
| १४ | नाला बांध | मुख्य बांध - १) बाजू उतार-१.५:१ ते २:१ २) माथा रुंदी - १ ते १.५० मी. | | | | | | | | | | |
| | अ) मातीचे नाला बांध | ३) साडव्यावरुन वाहणाऱ्या पाण्याची उंची- ०.४० मी. ते १ मी. ४) फ्रि बोर्ड-१.०० मी. | | | | | | | | ह.घ.मी. | | |
| | १ टक्के नाला तळ उतारा पर्यंत | ५) अभेद्य भिंत-१) बाजू उतार-१:१, २) माथा रुंदी-०.६० मी. | | | | | | | | पाणी साठा | ७१२९८ | ६२०१२ |
| | २ टक्के नाला तळ उतारा पर्यंत | ६) सी.ओ.टी. (नाला तळामध्ये)-१) बाजू उतार-०.५:१, २) तळ रुंदी-१ ते २ मी. | | | | | | | | -"- | १२६१६८ | १०९७३५ |
| | ३ टक्के नाला तळ उतारा पर्यंत | ७) सी.ओ.टी. (नाला तळाव्यतिरिक्त) १) माथा रुंदी १ मी., २) तळ रुंदी १ मी., ३) खोली १ मी. | | | | | | | | -"- | १६५१९७ | १४३६८४ |
| | ब) भिनार पध्दतीचे माती नालाबांध | | | | | | | | | अ.क्र. १४ अ) येथील माती नाला बांधाचे मंजूर आर्थिक मापदंड लागू राहतील. | | |
| | क) सिंमेट नाला बांध (अनघड दगडाचे) | | | | | | | | | ह.घ.मी. | | |
| | १ टक्के नाला तळ उतारा पर्यंत | १) बांधाचा बाजू उतार-१:०.३३ ते १:०.७७ २) माथा रुंदी - ०.७५ ते १.४० मी. | | | | | | | | पाणी साठा | ८१४४७ | ७९५२३ |
| | २ टक्के नाला तळ उतारा पर्यंत | ३) पाणी साठा उंची- १.५० ते ५.००, ४) फ्रि बोर्ड-०.३० ते ०.६० मी. | | | | | | | | -"- | ९३६६४ | ९१४५२ |
| | ३ टक्के नाला तळ उतारा पर्यंत | ५) सांडव्यावरून वाहणाऱ्या पाण्याची उंची- ०.२५ ते २.०० मी. | | | | | | | | -"- | १०५८८१ | १०३३८० |
| १५ | वळण बंधारा | १) बांधाची उंची १.१० मी. २) पाया रुंदी १.६५ मी. ३) बाजू उतार १:०.५० ४) माथा रुंदी ०.६० मी. | | | | | | | | प्र.हे.सं.क्षेत्र | १२४८० | १२२०५ |
| १६ | डोंगर उतारावर समपातळी दगडी बांध घालणे | | | | | | | | | | | |
| | १० टक्के पर्यंत | १०% पर्यंत | ०.७५ | ०.६० | ०.४५ | ०.२५:१ | ०.३६ | ७४० | .. | घ.मी. | १७५ | १५५ |
| | ११ ते १४ टक्के | ११ ते १४% | ०.७५ | ०.६० | ०.४५ | ०.२५:१ | ०.३६ | ८०० | .. | -"- | १७५ | १५५ |
| | १४ टक्के पेक्षा जास्त | १४% पेक्षा जास्त | ०.७५ | ०.६० | ०.४५ | ०.२५:१ | ०.३६ | ८७० | .. | -"- | १७५ | १५५ |
| १७ | अ) सलग समपातळी चर (०.३० मी. खोलीचे चर) | | | | | | | | | | | |
| | मॉडेल क्र. १ | ० ते ४% | ०.६० | ०.३० | ०.६० | .. | ०.१८ | ८३३ | .. | हेक्टर | ३११४२ | २९०८७ |
| | मॉडेल क्र. २ | ४ ते ८% | ०.६० | ०.३० | ०.६० | .. | ०.१८ | ९८७ | .. | -"- | ३५९९५ | ३३५६२ |
| | मॉडेल क्र. ३ | ८ ते १५% | ०.६० | ०.३० | ०.६० | .. | ०.१८ | ९२५ | .. | -"- | ३९८४७ | ३७५६६ |
| | मॉडेल क्र. ४ | १५ ते ३३% | ०.६० | ०.३० | ०.६० | .. | ०.१८ | १३८९ | .. | -"- | ५६६३३ | ५३२०८ |
| | मॉडेल क्र. ५ | ० ते ४% | ०.६० | ०.३० | ०.६० | .. | ०.१८ | १००० | .. | -"- | २४२२५ | २१७१४ |
| | मॉडेल क्र. ६ | ४ ते ८% | ०.६० | ०.३० | ०.६० | .. | ०.१८ | ११७९ | .. | -"- | २८०४७ | २५०८८ |
| | मॉडेल क्र. ७ | ८ ते १५% | ०.६० | ०.३० | ०.६० | .. | ०.१८ | १५१४ | .. | -"- | ३५११२ | ३१३१० |
| | मॉडेल क्र. ८ | १५ ते ३३% | ०.६० | ०.३० | ०.६० | .. | ०.१८ | २१७४ | .. | -"- | ४९१२९ | ४३६७० |

**विवरणपत्र पत्र १**

**शासन निर्णय क्र. मापदंड-२०१३/प्र.क्र. ११४/जल-७, दिनांक १० ऑक्टोबर, २०१३ चे सहपत्र**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ब) सलग समपातळी चर (०.४५ मी. खोलीचे चर) | | | | | | | | | | | |
| | मॉडेल क्र. १ | ० ते ४% | ०.६० | ०.४५ | ०.६० | .. | ०.२७ | ८३३ | .. | हेक्टर | ४१५६८ | ३८४८७ |
| | मॉडेल क्र. २ | ४ ते ८% | ०.६० | ०.४५ | ०.६० | .. | ०.२७ | ९८७ | .. | -"- | ४६६६९ | ४३२४८ |
| | मॉडेल क्र. ३ | ८ ते १५% | ०.६० | ०.४५ | ०.६० | .. | ०.२७ | ९२५ | .. | -"- | ५५१३८ | ५१४८८ |
| | मॉडेल क्र. ४ | १५ ते ३३% | ०.६० | ०.४५ | ०.६० | .. | ०.२७ | १३८९ | .. | -"- | ७६९३० | ७१७९३ |
| | मॉडेल क्र. ५ | ० ते ४% | ०.६० | ०.४५ | ०.६० | .. | ०.२७ | १००० | .. | -"- | ३३७४२ | २९९७६ |
| | मॉडेल क्र. ६ | ४ ते ८% | ०.६० | ०.४५ | ०.६० | .. | ०.२७ | ११७९ | .. | -"- | ३९२६९ | ३४८२९ |
| | मॉडेल क्र. ७ | ८ ते १५% | ०.६० | ०.४५ | ०.६० | .. | ०.२७ | १५१४ | .. | -"- | ४९५२२ | ४३८१९ |
| | मॉडेल क्र. ८ | १५ ते ३३% | ०.६० | ०.४५ | ०.६० | .. | ०.२७ | २१७४ | .. | -"- | ६९८२२ | ६१६३२ |
| | क) गुरे प्रतिबंधक चर | .. | ०.६० | १.०० | १.९० | .. | १.२५ | १०२ | .. | र.मी. | १५० | १३० |
| | (स.स. चराचा १० हेक्टर पेक्षा अधिक सलग गट असल्यास) | | | | | | | | | | | |
| १८. | जुन्या बोडीचे नुतनीकरण/दुरुस्ती | | | | | | | | | | | |
| | मुख्य बांधाची लांबी ५० मी. व उंची १.५० मी. | .. | ५.५० | १.५० | १.०० | ०.०० | ४.८८ | .. | .. | प्रति बोडी | ३६६२९ | ३२०६४ |
| | मुख्य बांधाची लांबी ५० मी. व उंची २.०० मी. | .. | ७.०० | २.०० | १.०० | ०.०० | ८.०० | .. | .. | प्रति बोडी | ७२५०८ | ६३३२३ |
| | मुख्य बांधाची लांबी ७० मी. व उंची १.५० मी. | .. | ५.५० | १.५० | १.०० | ०.०० | ६.८८ | .. | .. | प्रति बोडी | ४३२८२ | ३७९४८ |
| | मुख्य बांधाची लांबी ७० मी. व उंची २.०० मी. | .. | ७.०० | २.०० | १.०० | ०.०० | ८.०० | .. | .. | प्रति बोडी | ८८४३२ | ७७१८० |
| | मुख्य बांधाची लांबी १०० मी. व उंची १.५० मी. | .. | ५.५० | १.५० | १.०० | ०.०० | ८.८८ | .. | .. | प्रति बोडी | ६८९४८ | ६०२०७ |
| | मुख्य बांधाची लांबी १०० मी. व उंची २.०० मी. | .. | ७.०० | २.०० | १.०० | ०.०० | ८.०० | .. | .. | प्रति बोडी | १२७९९२ | १११६३३ |
| १९. | वनराई बंधारा | .. | २.१० | १.२० | १.५० | .. | २.१२ | .. | .. | प्रति र. मी. | ७५९ | ७२७ |
| | | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | प्रति घ. मी. | ३५९ | ३४४ |
| २०. | विहिर पुनर्भरण-अ) भारी जमीन पक्की विहिर | १) साठवण खड्डा-३ मी. X १ मी. X २ मी.  २) २ मी. X २ मी. X २ मी. | | | | | .. | .. | .. | प्रति विहिर | १२०६३ | ११३९७ |
| | ब) हलकी जमीन पक्की विहिर | ३) साठवण खड्याकरिता इनलेट-लांबी २० मी., माथा १.२० मी., पाया ०.६० मी., खोली ०.६० मी. | | | | | | | | प्रति विहिर | १२५२४ | ११७९७ |
| | क) भारी जमीन कच्ची विहिर | ४) साठवण खड्डा ते शोष खड्डा नाली-लांबी २ मी., माथा ०.९० मी., पाया ०.६० मी., खोली ०.३० मी. | | | | | | | | प्रति विहिर | १३५९४ | १२८४६ |
| | ड) हलकी जमीन कच्ची विहिर | ५) शोष खड्ड्याकरीता आऊटलेट-लांबी १५ मी., माथा ०.९० मी., पाया ०.६० मी., खोली ०.३० मी. | | | | | | | | प्रति विहिर | १४०५५ | १३२४६ |

**विवरणपत्र पत्र २**

**शासन निर्णय क्र. मापदंड-२०१३/प्र.क्र. ११४/जल-७, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१३ चे सहपत्र**

**मृद व जलसंधारणाच्या विविध उपचारांची कामे मशिनच्या सहाय्याने करण्यासाठी सुधारित तांत्रिक/आर्थिक मापदंडाचा तक्ता**

| अ. क्र. | उपचाराचे नाव | तांत्रिक मापदंड | | | | | | | सपाटीकरण खोदकाम परिमाण घ.मी. | परिमाण | आर्थिक मापदंड (रु.) (रु. १६२ प्रति दिनप्रमाणे) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उतार गट/ जमिनीचा प्रकार | पाया रुंदी मी. | बांधाची उंची मी. | माथा रुंदी मी. | बाजू उतार | बांधाचा छेद चौ.मी. | बांधाची लांबी मी. | | | ज.जा.उ.यो /डों.भाग | इतर |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १ | ढाळीचे बांध बंदिस्ती | भारी | २.५० | ०.८० | ०.५० | १.२५:१ | १.२० | ९५ | .. | हेक्टर | ५८३३ | ५४४० |
| | | मध्यम | २.३० | ०.७५ | ०.५० | १.२०:१ | १.०५ | १६५ | .. | -"- | ८००४ | ७४७९ |
| | | हलकी | २.०० | ०.७५ | ०.५० | ०.०४ | ०.९५ | २१० | .. | -"- | ९०११ | ८४२६ |
| २ | शेत भात बंदिस्ती (कंपार्टमेटचे बंडीग) ० ते ४ टक्के उतार | | | | | | | | | | | |
| | हलकी जमीन | हलकी | १.८० | ०.७५ | ०.३० | ०.०४ | ०.८० | २०० | .. | हेक्टर | ७२२० | ६८६० |
| | मध्यम जमीन | मध्यम | २.०० | ०.८५ | ०.३० | ०.०४ | १.०० | २०० | .. | -"- | ८६३२ | ८१८२ |
| | भारी जमीन | भारी | २.२५ | ०.९० | ०.४५ | ०.०४ | १.२० | २०० | .. | -"- | ९८५७ | ९३४१ |
| ३ | (अ) भात खाचरे बांध बंदिस्ती (मजगी) | ३% पर्यंत | १.८० | ०.६८ | ०.४५ | ०.०४ | ०.७५ | ६५० | ७५० | हेक्टर | ४६६६७ | ४३५९७ |
| | (कोकण व पश्चिम महाराष्ट्राकरिता) | ३ ते ६% | १.८० | ०.६८ | ०.४५ | ०.०४ | ०.७५ | ७२० | १३१२ | -"- | ६६३०७ | ६२२६६ |
| | (०.७५ चौ.मी. छेदाचे बांध) | ६ ते ८% | १.८० | ०.६८ | ०.४५ | ०.०४ | ०.७५ | ८१७ | १५०० | -"- | ७५४६८ | ७०८७९ |
| | (ब) ०.५४ चौ.मी. छेदाचे बांध असलेले भात | | | | | | | | | | | |
| | खाचरे बांध बंदिस्ती (मजगी) पश्चिम महाराष्ट्र, | ३% पर्यंत | १.५० | ०.६० | ०.३० | ०.०४ | ०.५४ | ६५० | ७५० | -"- | ४०४४८ | ३७९३० |
| | कोकण व विदर्भ (हलकी जमीन) | ३ ते ६% | १.५० | ०.६० | ०.३० | ०.०४ | ०.५४ | ७२० | १३१२ | -"- | ५९४१८ | ५५९८९ |
| | | ६ ते ८% | १.५० | ०.६० | ०.३० | ०.०४ | ०.५४ | ८१७ | १५०० | -"- | ६७६५२ | ६३७५७ |
| ४ | भात खाचरे बांध बंदिस्ती (पॅडी बंडिंग) (विदर्भाकरिता) | | २.२० | ०.६० | ०.४० | १.५:१ | ०.७८ | ७७८ | ५६२.५ | हेक्टर | ४४४२८ | ४१२१४ |
| ५ | जुनी भातशेती बांध दुरुस्ती (कोकण, पश्चिम महाराष्ट्र व विदर्भाकरिता) | | | बांधाचा अतिरिक्त छेद-०.४५ चौ.मी. | | | | | | हेक्टर | १२७५७ | १२१४० |
| ६ | (अ) इनलेट आऊटलेटसह शेततळे | शेततळ्याचा आकार | | | | | | | | | | |
| | | १५ x १५ x ३ मी. | | बाजु उतार १:१ ते १.५:१ | | | बर्म-२ मी. | ४४१ | | प्रति शेततळे | २३२५२ | २२३२९ |
| | | २० x १५ x ३ मी. | | बाजु उतार १:१ ते १.५:१ | | | बर्म-२ मी. | ६२१ | | प्रति शेततळे | ३२७४२ | ३१४४२ |
| | | २० x २० x ३ मी. | | बाजु उतार १:१ ते १.५:१ | | | बर्म-२ मी. | ८७६ | | प्रति शेततळे | ४६१८७ | ४४३५४ |
| | | २५ x २० x ३ मी. | | बाजु उतार १:१ ते १.५:१ | | | बर्म-२ मी. | ११३१ | | प्रति शेततळे | ५९६३२ | ५७२६५ |
| | | २५ x २५ x ३ मी. | | बाजु उतार १:१ ते १.५:१ | | | बर्म-२ मी. | १४६१ | | प्रति शेततळे | ७७०३१ | ७३९७३ |
| | | ३० x २५ x ३ मी. | | बाजु उतार १:१ ते १.५:१ | | | बर्म-२ मी. | १७९१ | | प्रति शेततळे | ९४४३० | ९०६८२ |
| | | ३० x ३० x ३ मी. | | बाजु उतार १:१ ते १.५:१ | | | बर्म-२ मी. | २१९६ | | प्रति शेततळे | ११५७८४ | १११९८८ |
| | (ब) इनलेट आऊटलेटसह शेततळ | २० x १५ x ३ मी. | | बाजु उतार १:१ ते १.५:१ | | | | ६२१ | | प्रति शेततळे | २९४०९ | २८२४६ |
| | | २० x २० x ३ मी. | | बाजु उतार १:१ ते १.५:१ | | | | ८७६ | | प्रति शेततळे | ४१४८६ | ३९८४४ |
| | | २५ x २० x ३ मी. | | बाजु उतार १:१ ते १.५:१ | | | | ११३१ | | प्रति शेततळे | ५३५६२ | ५१४४२ |
| | | २५ x २५ x ३ मी. | | बाजु उतार १:१ ते १.५:१ | | | | १४६१ | | प्रति शेततळे | ६९१९० | ६६४५२ |
| | | ३० x २५ x ३ मी. | | बाजु उतार १:१ ते १.५:१ | | | | १७९१ | | प्रति शेततळे | ८४८१८ | ८१४६२ |
| | | ३० x ३० x ३ मी. | | बाजु उतार १:१ ते १.५:१ | | | | २१९६ | | प्रति शेततळे | १०३९९८ | ९९८८३ |

**विवरणपत्र पत्र २**

**शासन निर्णय क्र. मापदंड-२०१३/प्र.क्र. ११४/जल-७, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१३ चे सहपत्र**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | मातीचे नाला बांध | मुख्य बांध-१) बाजू उतार- १.५:१ ते २:१ २) माथा रुंदी-१ ते १.५० मी. | | | | | | | | ह.घ.मी. | .. | .. |
| | १ टक्के नाला तळ उतारा पर्यंत | ३) सांडव्यावरुन वाहणाऱ्या पाण्याची उंची ०.४० ते १ मी. ४) फ्रि बोर्ड १.०० मी. | | | | | | | | पाणी साठा | ३२००३ | २९३४३ |
| | २ टक्के नाला तळ उतारा पर्यंत | ५) अभेद्य भिंत-१) बाजू उतार- १:१ २) माथा रुंदी ०.६० मी. | | | | | | | | पाणी साठा | ५५८८१ | ५१२३७ |
| | ३ टक्के नाला तळ उतारा पर्यंत | ६) सी.ओ.टी. (नाला तळामध्ये) १) बाजू उतार ०.५:१ २) तळ रुंदी १ ते २ मी. | | | | | | | | पाणी साठा | ७२६४६ | ६६६०९ |
| | | ७) सी.ओ.टी. (नाला तळाव्यतिरिक्त) १) माथा रुंदी १ मी. २) तळ रुंदी १ मी. ३) खोली १ मी. | | | | | | | | .. | .. | .. |
| ८. | अ) बोडी दुरुस्ती/नुतनीकरण | | | | | | | | | प्रति बोडी | | |
| | १) मुख्य बांधाची लांबी ५० मी. व उंची १.५० मी. | -- | ५.५० | १.५० | १.०० | १.५:१ | ४.८८ | ५० | .. | -"- | १७२७० | १५९१९ |
| | २) मुख्य बांधाची लांबी ५० मी. व उंची २.०० मी. | -- | ७.०० | २.०० | १.०० | १.५:१ | ८.०० | ५० | .. | -"- | ३१७३२ | २९२७७ |
| | ३) मुख्यबांधाची लांबी ७० मी. व उंची १.५० मी. | -- | ५.५० | १.५० | १.०० | १.५:१ | ४.८८ | ७० | .. | -"- | २०८९२ | १९२१२ |
| | ४) मुख्य बांधाची लांबी ७० मी. व उंची २.०० मी. | -- | ७.०० | २.०० | १.०० | १.५:१ | ८.०० | ७० | .. | -"- | ३९२८४ | ३६१८७ |
| | ५) मुख्य बांधाची लांबी १०० मी. व उंची १.५० मी. | -- | ५.५० | १.५० | १.०० | १.५:१ | ४.८८ | १०० | .. | -"- | ३१८२३ | २९२५२ |
| | ६) मुख्य बांधाची लांबी १०० मी. व उंची २.०० मी. | -- | ७.०० | २.०० | १.०० | १.५:१ | ८.०० | १०० | .. | -"- | ५५२६४ | ५०८५३ |
| ९. | अ) सलग समपातळी चर (०.४५ मी. खोलीचे चर) | | | | | | | | | | | |
| | कोकण व पश्चिम घाट प्रदेशासाठी मॉडेल क्र. १ | ० ते ४% | ०.६० | ०.४५ | ०.६० | .. | ०.२७ | ८३३ | -- | हेक्टर | ३०७२४ | २९६४५ |
| | कोकण व पश्चिम घाट प्रदेशासाठी मॉडेल क्र. २ | ४ ते ८% | ०.६० | ०.४५ | ०.६० | .. | ०.२७ | ९८७ | -- | हेक्टर | ३५६३१ | ३४३५२ |
| | कोकण व पश्चिम घाट प्रदेशासाठी मॉडेल क्र. ३ | ८ ते १५% | ०.६० | ०.४५ | ०.६० | .. | ०.२७ | ९२५ | -- | हेक्टर | ४२२२१ | ४१०२२ |
| | अ.प्र. क्षेत्र व हमखास पावसाच्या प्रदेशासाठी मॉडेल क्र. ५ | ० ते ४% | ०.६० | ०.४५ | ०.६० | .. | ०.२७ | १००० | -- | हेक्टर | १९३२४ | १८०१५ |
| | अ.प्र. क्षेत्र व हमखास पावसाच्या प्रदेशासाठी मॉडेल क्र. ६ | ४ ते ८% | ०.६० | ०.४५ | ०.६० | .. | ०.२७ | ११७९ | -- | हेक्टर | २२२७० | २०७२६ |
| | अ.प्र. क्षेत्र व हमखास पावसाच्या प्रदेशासाठी मॉडेल क्र. ७ | ८ ते १५% | ०.६० | ०.४५ | ०.६० | .. | ०.२७ | १५१४ | -- | हेक्टर | २७६९२ | २५७०९ |
| | ब) सलग समपातळी चर (०.३० मी. खोलीचे चर) | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| | कोकण व पश्चिम घाट प्रदेशासाठी मॉडेल क्र. १ | ० ते ४% | ०.६० | ०.३० | ०.६० | .. | ०.१८ | ८३३ | -- | हेक्टर | २३१४६ | २२४२६ |
| | कोकण व पश्चिम घाट प्रदेशासाठी मॉडेल क्र. २ | ४ ते ८% | ०.६० | ०.३० | ०.६० | .. | ०.१८ | ९८७ | -- | हेक्टर | २६५२१ | २५६६८ |
| | कोकण व पश्चिम घाट प्रदेशासाठी मॉडेल क्र. ३ | ८ ते १५% | ०.६० | ०.३० | ०.६० | .. | ०.१८ | ९२५ | -- | हेक्टर | ३०९६८ | ३०१६९ |
| | अ.प्र. क्षेत्र व हमखास पावसाच्या प्रदेशासाठी मॉडेल क्र. ५ | ० ते ४% | ०.६० | ०.३० | ०.६० | .. | ०.१८ | १००० | -- | हेक्टर | १४६०९ | १३७४५ |
| | अ.प्र. क्षेत्र व हमखास पावसाच्या प्रदेशासाठी मॉडेल क्र. ६ | ४ ते ८% | ०.६० | ०.३० | ०.६० | .. | ०.१८ | ११७९ | -- | हेक्टर | १६७१५ | १५६८६ |
| | अ.प्र. क्षेत्र व हमखास पावसाच्या प्रदेशासाठी मॉडेल क्र. ७ | ८ ते १५% | ०.६० | ०.३० | ०.६० | .. | ०.१८ | १५१४ | -- | हेक्टर | २०५५९ | १९२३७ |
| | ब) गुरे प्रतिबंधक चर | | ०.६० | १.०० | १.९० | .. | १.२५ | १०२ | -- | र.मी. | ६१ | ५६ |
| | (स. स. चराचा १० हेक्टर पेक्षा अधिक सलग गट असल्यास) | | | | | | | | | | | |
| १०. | खोल सलग समपातळी चर (१ मी. X १ मी.) | ११ | १.०० | १.०० | १.० | .. | १.०० | २४० | .. | हेक्टर | ११४११ | ११४११ |

**मृद संधारण विभागातील सन २०१४-१५ वर्षांतर्गत योजनानिहाय अर्थसंकल्पिय तरतूदी, वितरीत अनुदान व खर्च माहे आक्टोबर, २०१४ अखेर**

**(रु. लाख)**

| अ.क्र. | योजना/लेखाशिर्ष | अर्थसंकल्पीय तरतूद | खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **अ** | **राज्य योजना** | | | |
| १ | डीपीडीसी सर्वसाधारण जिल्हास्तर | १३९९३ | ६७६.० | ४.८३ |
| २ | राज्यस्तर | ३५००.०० | .. | .. |
| ३ | विशेष घटक योजना | ९१९३ | .. | .. |
| ४ | जनजाती क्षेत्रातंर्गत योजना (टी.एस.पी) | ५०४० | .. | .. |
| ५ | जनजाती क्षेत्राबाहेर योजना (ओ.टी.एस.पी.) | ९४२ | .. | .. |
| ६ | आदर्शगांव | ७००.०० | २६६.१३ | ३८.०२ |
| ७ | पडकई | ९००.०० | .. | .. |
| ८ | अ) पाणलोट चळवळ | ३८५.०० | .. | .. |
| | ब) पारितोषिके | १७५.०० | .. | .. |
| ९ | आर. आय. डी. एफ. | २२४०.०० | .. | .. |
| १० | एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम | ५६००.०० | .. | .. |
| ११ | टंचाईग्रस्त जिल्ह्यात साखळी पध्दतीने सिनाब बांधणी कार्यक्रम | २६१००.०० | ३११.०० | १.१९ |
| | **एकूण अ** | **६८७६८.००** | **१२५३.१३** | **१.८२** |
| **ब** | **केंद्र पुरस्कृत योजना** | **कृति आराखड्याप्रमाणे** | | |
| १ | नदी खोरे प्रकल्प* | .. | .. | .. |
| २ | रा.पा.वि.का* | .. | .. | .. |
| ३ | सुदूर संवेदन | .. | .. | .. |
| ३ | पश्चिम घाट विकास योजना | २५००.०० | .. | .. |
| ४ | आय.डब्ल्यू एम.पी. ९० टक्के केंद्रपुरस्कृत | १२२८५०.०० | .. | .. |
| | **एकूण ब** | **१२५३५०.००** | .. | .. |
| | **एकूण ( अ + ब)** | **१९४११८.००** | **१२५३.१३** | **१.८२** |

*टीप- दि. २६ मार्च, २०१३ चे केंद्र शासनाचे पत्रानुसार सन २०१३-१४ पासून कृति आराखड्यांतर्गत योजनांसाठी निधी देण्याचे केंद्र शासनाने बंद केले आहे.

## मृद संधारण विभागातील सन २०१३-१४ वर्षांतर्गत योजनानिहाय अर्थसंकल्पिय तरतूदी, वितरीत अनुदान व खर्च माहे ३१ मार्च, २०१४ अखेर

| अ.क्र. | योजना/लेखाशिर्ष | अर्थसंकल्पीय तरतूद | प्रत्यक्ष वितरीत निधी | खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **अ** | **केंद्र पुरस्कृत योजना कृति आराखड्याप्रमाणे** | | | | |
| १ | नदी खोरे प्रकल्प | .. | .. | .. | .. |
| २ | रा. पा. वि. का | .. | .. | .. | .. |
| ३ | पश्चिम घाट विकास योजना (९० टक्के कें.पु. १० टक्के राज्य पुरस्कृत) | २५००.०० | १८७५.०० | १८७५.०० | १००.०० |
| ४ | एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (९० टक्के कें.पु.) आय.डब्ल्यू.एम.पी. | १३०५३३.०० | ४६५३७.०० | ४६५३७.०० | १००.०० |
| | **एकूण अ** | **१३३०३३.००** | **४८४१२.००** | **४८४१२.००** | **१००.००** |
| **ब** | **राज्य योजना** | | | | |
| १ | एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम-राज्यस्तर | २५००.०० | १९८५.०० | १९८५.०० | १००.०० |
| २ | विशेष घटक योजना | ४१०४.०० | ३९११.०० | ३८७१.०० | ९८.९८ |
| ३ | आदर्शगांव | ४८०.०० | ५६९.०० | ५६९.०० | १००.०० |
| ३अ | आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती | २००.०० | ३००.०० | २६०.०० | ८६.६७ |
| ४ | पडकई | ५९५.०० | ५७६.०० | ५७६.०० | १००.०० |
| ५ | पाणलोट चळवळ | ५००.०० | १४८.३० | १४८.३० | १००.०० |
| ६ | नाबार्ड आर.आय.डी.एफ. | ३२००.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (१० टक्के राज्य हिस्सा) आय.डब्ल्यू.एम.पी. | ८००.०० | २००.४० | २००.४० | १००.०० |
| ८ | मृद संधारण योजनांचे संनियंत्रण व मुल्यमापन | १००.०० | ५५.०० | ५५.०० | १००.०० |
| ९ | टंचाईसदृश तालुक्यात साखळी पध्दतीने सिमेंट नालाबांध बांधण्याचा कार्यक्रम सन २०१३-१४ | ९२०५.०० | ८००४.०० | १२८५.०० | १६.०५ |
| | **एकूण ब** | **२१६८४.००** | **१५७४८.७०** | **८९४९.७०** | **५६.८३** |
| **क** | **जिल्हा स्तरावरून प्राप्त अनुदान** | | | | |
| १ | डीपीडीसी सर्वसाधारण जिल्हास्तर | १००६३.०० | १५९७७.०० | १५९७७.०० | १००.०० |
| २ | जनजाती क्षेत्रातंर्गत योजना (टी.एस.पी.) | ३९१३.०० | ८४७५.०० | ८३२५.०० | ९८.२३ |
| ३ | जनजाती क्षेत्राबाहेरील योजना (ओ.टी.एस.पी) | ७४३.०० | ९५१.०० | ९४८.०० | ९९.६८ |
| | **एकूण क** | **१४७१९.००** | **२५४०३.००** | **२५२५०.००** | **९९.४०** |
| | **एकूण (अ+ब+क)** | **१६९४३६.००** | **८९५६३.७०** | **८२६११.७०** | **९२.२४** |
| | **राष्ट्रीय कृषि विकास योजना सन २०१३-१४** | | | | |
| अ | महात्मा फुले जलभूमी अभियान | २६००.०० | २६००.०० | २६००.०० | १००.०० |
| ब | विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम | २३०००.०० | १५१४०.०० | ११३९०.०० | ७५.२३ |
| क | मृद व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन पायाभूत प्रशिक्षण | २१२.०० | २१२.०० | १८६.०० | ८७.७४ |
| इ | राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम | २०००.०० | १९९०.०० | १९९०.०० | १००.०० |
| ई | नदी खोरे प्रकल्प | ९५००.०० | ५००.०० | ४९७.४८ | ९९.५० |
| | **एकूण** | **३७३१२.००** | **२०४४२.००** | **१६६६३.४८** | **८१.५२** |

## सन २०१३-१४ मधील उपचारनिहाय साध्य

| अ.क्र. | काम / बाब | परिमाण | साध्य |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | सलग समतल चर | हेक्टर | १२२५३ |
| २ | खोल सलग समतल चर | हेक्टर | ५४४ |
| ३ | जैविक बांधासह / ढाळीचे बांध | हेक्टर | ३७५४३६ |
| ४ | मजगी | हेक्टर | २७९९१ |
| ५ | कम्पार्टमेंट बंडींग | हेक्टर | २११७९० |
| ६ | लूज बोल्डर स्ट्रक्चर | संख्या | ७८५७४ |
| ७ | नाला सरळीकरण | संख्या | १६ |
| ८ | अर्दन स्ट्रक्चर | संख्या | १९०६४ |
| ९ | वळण बंधारा | संख्या | ८१ |
| १० | शेततळे | संख्या | २२३१ |
| ११ | गॅबियन स्ट्रक्चर | संख्या | ८१ |
| १२ | माती नाला बांध | संख्या | १८११ |
| १३ | सिमेंट नाला बांध | संख्या | १२३६ |

## सन २०१४-१५ भौतिक लक्ष्यांक

| अ.क्र. | काम / बाब | परिमाण | साध्य |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | सलग समतल चर | हेक्टर | २६७६६ |
| २ | समपातळीवरील जैविक बांध | हेक्टर | .. |
| ३ | जैविक बांधासह समपातळी / ढाळीचे बांध | हेक्टर | ४५१०४२ |
| ४ | मजगी | हेक्टर | १८६६२ |
| ५ | कम्पार्टमेंट बंडींग | हेक्टर | १८१३७८ |
| ६ | लूज बोल्डर स्ट्रक्चर | संख्या | १०३७९१ |
| ७ | नाला सरळीकरण | संख्या | १७५०० |
| ८ | अर्दन स्ट्रक्चर | संख्या | ७२७८२ |
| ९ | वळण बंधारा | संख्या | ५८८ |
| १० | शेततळे | संख्या | २७७८२ |
| ११ | गॅबियन स्ट्रक्चर | संख्या | ७२१ |
| १२ | माती नाला बांध | संख्या | ५४३९ |
| १३ | सिमेंट नाला बांध | संख्या | ४९२० |

## सन २०१५-१६ प्रस्तावित आर्थिक तरतूद राज्ययोजना

| अ.क्र. | योजना | प्रस्तावित आर्थिक नियोजन रु. लाखात |
|---|---|---|
| १ | एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम- राज्यस्तर | ३८५०.०० |
| २ | आदिवासी क्षेत्रांतर्गत / क्षेत्राबाहेरील | ६५७९४०.०० |
| ३ | विशेष घटक योजना | ५७१२.४५ |
| ४ | डीपीडीसी सर्वसाधारण | १५३९१.९९ |
| ५ | आर.आय.डी.एफ. अंतर्गत पाणलोट विकास | ३१३९.८४ |
| ६ | साखळी पध्दतीने सिमेंट नालाबांध बांधणी | २८७००.०० |
| ७ | आदर्शगाव | १४००.०० |
| ८ | आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती व्यवस्थापन | ३३.०० |
| ९ | एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम- राज्य हिस्सा १० टक्के | १५०००.०० |
| १० | नदी खारे प्रकल्प | ५५५१.९४ |
| ११ | पाणलोट चळवळ विकास कार्यक्रम (प्रचार व प्रसिध्दी) | ४००.०० |
| १२ | पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम पारितोषिक योजना | २५०.०० |
| १३ | पडकई | १०००.०० |
| १४ | संनियत्रण व मुल्यमापन | ८०.०० |
| | **एकूण** | **७३८४४९.२२** |

## सन २०१५-१६ मधील प्रस्तावित भौतिक लक्ष्यांक

| अ.क्र. | काम / बाब | परिमाण | लक्ष्य |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | सलग समतल चर | हेक्टर | २९४४२ |
| २ | जैविक बांधासह / ढाळीचे बांध | हेक्टर | ५१८६९८ |
| ३ | मजगी | हेक्टर | २९८६० |
| ४ | कम्पार्टमेंट बंडींग | हेक्टर | २०८५८४ |
| ५ | लूज बोल्डर स्ट्रक्चर | संख्या | ११४१७० |
| ६ | गॅबियन स्ट्रक्चर | संख्या | ८०० |
| ७ | वळण बंधारा | संख्या | ६५० |
| ८ | शेततळे | संख्या | ३१९४९ |
| ९ | अर्दन स्ट्रक्चर | संख्या | ७३००० |
| १० | माती नाला बांध | संख्या | ६५२५ |
| ११ | सिमेंट नाला बांध | संख्या | ५९०० |

# मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत विविध राज्य/केंद्र पुरस्कृत योजना

**१. राज्य योजना :**

**(अ) पाणलोट विकास चळवळ कार्यक्रम**

**योजनेची माहिती -**

राज्यातील बहूतांश क्षेत्र कोरडवाहू असून उपलब्ध जलस्त्रोताचा उपयोग केला तरी देखील ६० टक्के पेक्षा जास्त क्षेत्र कायमस्वरुपी नैसर्गिकरित्या पडणाऱ्या पावसावर अवलंबून राहणार आहे. पर्जन्याधारित क्षेत्रातील उत्पन्नाचे सातत्य टिकविण्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्ती जतन करणे, संरक्षित जलसिंचनांची साधने निर्माण करणे, जमिनीची प्रचंड प्रमाणात होणारी धूप थांबविणे, पडीक जमिनीचा विकास करुन ग्रामीण भागातील उत्पन्न व उत्पन्नाची साधने वाढविणे. विविध उपचाराद्वारे पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत विविध उपचारांनी बळकट करणे. भूगर्भातील पाणी काटकसरीने व आवश्यकतेनुसार उपयोगात आणणे. या सर्व उपचारांनी राज्यात मृद व जलसंधारणाचा कार्यक्रम विविध राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून राबविण्यात येतो. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक स्तरावर लोकसहभागाची नितांत आवश्यकता आहे. मृद व जलसंधारणाचे उद्दिष्ट सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी जलसंधारणाकरिता पाणलोट विकास चळवळ कार्यक्रम महत्वाचा आहे.

**उद्देश -**

१. पाणलोट विकास कार्यक्रमांना विविध प्रसिध्दी माध्यमांतून प्रसिध्दी देणे.
२. ग्रामीण भागातील जनतेमध्ये जल, भूमी व इतर नैसर्गिक साधनसंपत्ती संवर्धनाबाबत आस्था निर्माण करणे.
३. जलसंधारण कामांना अधिक गती देणे.
४. पाणलोट विकासाच्या विविध टप्प्यामध्ये जलजागृतीद्वारे लोकसहभाग घेणे.
५. पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत निर्माण केलेल्या विविध स्त्रोतांचे जतन करण्यासाठी लोकजागृती निर्माण करणे.
६. उपलब्ध भूपृष्ठावरील आणि भूगर्भातील पाण्याचा काटकसरीने वापर करुन उत्पन्न आणि उत्पादन वाढविण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे.

**१) सन २०१२-१३ मधील कार्यक्रम -**

सन २०१२-१३ मध्ये ही योजना राबविणेसाठी रु. ३५०.०० लाख इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली होती. रक्कम रुपये ८०.०० लाख निधी वितरीत करण्यात आला होता. मार्च २०१३ अखेर रुपये ७९.९६ लाख निधी खर्च झाला आहे.

**२) सन २०१३-१४ चा कार्यक्रम**

सन २०१३-१४ साठी रक्कम रु. २५०.०० लाख निधीची अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी रु. १४७.०० लाख खर्च करण्यात आला. सन २०१४-१५ या वर्षासाठी रक्कम रु. ३८५.०० लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे.

**(ब) आदर्शगांव संकल्प व प्रकल्प**

**प्रस्तावना -** क्रांती दिनाच्या स्वर्णमहोत्सवी वर्षाचे निमित्ताने थोर स्वातंत्र्यसेनानी कै. डॉ. अच्युतराव पटवर्धन यांच्या सुचनेनुसार व मा. अण्णासाहेब हजारे यांचे मार्गदर्शनाखाली राळेगणसिध्दीचे धर्तीवर राज्यातील प्रत्येक तालुक्यात एक गाव स्वयंपूर्ण करण्याच्या संकल्पनासह सन १९९२ मध्ये आदर्शगांव विकास योजना सुरु झाली. लोकसहभागातून ग्रामविकास व लोककार्यक्रमांत शासनाचा सहभाग या संकल्पनेवर आधारीत आदर्शगांव संकल्प व प्रकल्प योजना सन १९९४-९५ पासून राज्यस्तरीय योजना म्हणून राबविण्यात येत आहे.

**उद्देश -** लोककार्यक्रमात शासनाचा सहभाग या सुत्रानुसार गावांच्या सर्वांगिण विकासाबरोबरच गावाची सामाजिक शिस्त सुधारुन प्रत्येक तालुक्यातून एक पथदर्शक अशा स्वयंपूर्ण गावांचा ग्रामस्थांच्या सहकार्याने व स्वयंसेवी संस्थांच्या सहभागाने सर्वांगिण व निरंतर विकास करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

**वैशिष्ट्ये -** आदर्शगांव संकल्प व प्रकल्प योजना ही इतर योजनांपेक्षा अत्यंत वेगळी योजना आहे. योजने अंतर्गत निवड झालेल्या प्रत्येक गावाने शिवारात मृद व जलसंधारणाच्या (गाभा क्षेत्रातील उपचार) कामांची गावाने निवडलेल्या स्वयंसेवी संस्थेमार्फत अंमलबजावणी करणे तसेच गावविकासाची कामे (बिगरगाभा क्षेत्रातील कामे) योजनेतून व शासकीय विभागाच्या सहकार्याने करणे अपेक्षित आहे.

**योजनेची माहिती -** शासन निर्णय क्रमांक आगायो २०१०/प्र.क्र.४५/जल-८ मंत्रालय मुंबई दि. १३-८-२०१० अन्वये नविन गावे समाविष्ट करतांना पहिल्या टप्प्यात १०० गावे निवडण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सन २००९ पासून १५ डिसेंबर, २०१४ अखेर योजने अंतर्गत ६६ गांवे निवडली असून मार्च, २०१५ अखेर ३४ गावांची निवड करण्यात येणार आहे.

**आर्थिक व भौतिक साध्य -** निवडण्यात आलेल्या ६६ गावांना १५ डिसेंबर, २०१४ अखेर रु. १७०२.०१ लाख निधी वितरीत करण्यात आला आहे. वितरीत करण्यात आलेल्या निधीनुसार निवडण्यात आलेल्या गावातील एकूण १०७०७.८० हेक्टर क्षेत्र उपचारित होणार आहे.

**वार्षिक योजना सन २०१४-१५** :- सन २०१४-१५ साठी रु. ७००.०० लाख नियतव्य मंजुर झालेला असून, पुरवणी मागणीद्वारे आणखी रु. ५००.०० लाख निधीची मागणी करणेत आलेली आहे. याप्रमाणे एकुण रु. १२००.०० लाख एवढ्या निधीची आवश्यकता आहे.

**कार्यक्रमाची फलश्रुती**

**पुरस्कार प्राप्त गांवे -**

१) **राष्ट्रीय उत्पादकता पुरस्कार :-** या योजने अंतर्गत १) मौजे- हिरवे बाजार, जिल्हा अहमदनगर, २) पाटणादेवी, जिल्हा जळगाव, ३) भातसई, जिल्हा रायगड यांना राष्ट्रीय उत्पादकता परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत राष्ट्रीय उत्पादकता पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

२) **संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता पुरस्कार** :- संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता मोहिमेअंतर्गत १) मौजे राजवड, जिल्हा जळगांव नाशिक विभागात प्रथम पुरस्कार मिळालेला आहे. १) हिवरेबाजार, जिल्हा अहमदनगर, २) दुधा, जिल्हा जालना, ३) हाडोळी, जिल्हा नांदेड यांना जिल्हास्तरावरील **संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता पुरस्कार** प्रथम क्रमांक मिळालेला आहे.

३) **उत्कृष्ठ गावाचा पुरस्कार** :- मौजे श्रावण जिल्हा सिंधुदुर्ग व मौजे गुंजेगांव जिल्हा सोलापूर या गावांना उत्कृष्ठ गावाचा पुरस्कार देण्यात आलेला आहे.

**टँकरमुक्त गांवे -**

प्राधान्यक्रमाने निवडण्यात आलेल्या मौजे जांभरुण महाली, चालढाणा, पापळ, वलनीफेटरी, पुंगळा, कोतुळ, वरंध, सावरसई, पिंपळगावकौडा, मुरकुटे, मिणचे आणि औरंगपूर या गावामध्ये मृद व जलसंधारणाचे कामामुळे गावे टँकरमुक्त झाली आहेत. तसेच भुजलाची पातळी वाढल्यामुळे ओलीताखालील क्षेत्रात वाढ होऊन प्रती हेक्टरी पीक उत्पादनात भरीव वाढ झालेली आहे.

**स्वयंपूर्ण गांवे -**

आतापर्यंत नव्याने निवडणेत आलेल्या मौजे निवंडुगेवाडी, जिल्हा अहमदनगर, मौजे किनगांव व मौजे ववा, जि. औरंगाबाद, मौजे साखरा, जि. वाशिम, मौजे कोठोडा व मौजे पिपंळदरी, जि. यवतमाळ, मौजे खोर, जि. बुलढाणा, मौजे भागडी, जि. पुणे या गावामध्ये मृद व जलसंधारणाचे कामामुळे भुजलाची पातळी वाढल्याने ओलीताखालील क्षेत्रात वाढ होऊन प्रति हेक्टर पिक उत्पादनात भरीव वाढ झालेली आहे. याप्रमाणे इतर आदर्शगांवे स्वयंपूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत.

**(क) गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम**

अपूर्ण पाणलोटांची कामे जलद गतीने पुर्ण करण्याच्या उद्देशाने शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक आदर्श-२००७/ प्र.क्र.१२१/जल-७, दि. ३०-११-२००७ अन्वये राज्यातील ३५३ तालुक्यात प्रत्येकी किमान १ याप्रमाणे ३५३ पाणलोट सन २००७-०८ मध्ये विकसीत करण्यासाठी गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम राबविणेचा निर्णय घेण्यात आला आहे. हा कार्यक्रम धडक मोहिमे अंतर्गत गतिमान पध्दतीने राबविण्यात येणार असल्यामुळे या मोहिमे अंतर्गत विकसित होणारे पाणलोट राज्यात पथदर्शक पाणलोट ठरतील व त्यासाठी जास्तीत जास्त लोकसहभाग मिळविण्यात येत आहे. सन २००७-०८ मध्ये ४०५ व २००८-०९ मध्ये ८३४ पाणलोट गतिमान पध्दतीने पूर्ण करण्यात आलेले आहे. सन २००९-१० मध्ये ३४१ पाणलोट पूर्ण, सन २०१०-११ मध्ये ३६७ पूर्ण, सन २०११-१२ मध्ये ३८६, सन २०१२-१३ मध्ये ८४, व सन २०१३-१४ मध्ये ४२ पाणलोट पूर्ण झालेले असून सन २००७-०८ ते २०१४-१५ अखेर ७१४० पाणलोटांना सुकाणू समितीने मान्यता दिलेली असून ३०७७ पाणलोट पूर्ण झाले आहेत. या कार्यक्रमासाठी राज्य निधी, डीपीडीसी, विघयो, टिएसपी, ओटीएसपी. इ. निधीस्त्रोत उपयोगात आणला जातो. सन २०१४-१५ मध्ये उपरोक्त सर्व योजनांमध्ये रु. २८६.६८ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित झाला असून त्यामधून सुमारे २.३९ लक्ष हेक्टर क्षेत्र उपचारित होणार आहे.

**(ड) ग्रामीण विकास पायाभूत निधी (RIDF) अंतर्गत पाणलोट विकास कार्यक्रम**

**१. योजनेची माहिती -**

राज्यातील पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत सध्याच्या भूजलाची स्थिती व त्यानुसार भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (GSDA) आणि MRSAC, यांच्या अहवालानुसार एकूण १५०५ मेगा पाणलोट दर्शविण्यात आले आहेत. त्यापैकी प्राथमिक वर्गवारीनुसार ७९३ पाणलोट हे उच्च (High), मध्यम (Moderate), कमी (Low) व अंत्यत कमी (lowest), प्राथमिकता असलेले आहेत. एकूण १५०५ पाणलोटामध्ये ओव्हर एक्सप्लॉयटेड, क्रिटीकल, सेमीक्रिटीकल व डीपीएपी क्षेत्रातील पाणलोटांचा समावेश आहे. प्राथमिकता यादीतील ओव्हर एक्सप्लॉयटेड, क्रिटीकल, सेमीक्रिटीकल व डीपीएपी पाणलोट त्वरित विकसित करण्याचे शासनाने निश्चित केले आहे.

ग्रामीण पायाभूत विकास निधी (RIDF), अंतर्गत नाबार्डकडून कर्ज उपलब्ध करुन घेवून सन २००९-१० मध्ये पाणलोट विकसित करण्यासाठी भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा आणि MRSAC यांनी घोषित केलेल्या मेगा पाणलोटामधून प्राथम्यक्रमानुसार एकूण ६८ मेगा पाणलोटांची निवड करण्यात आली.

**योजनेचा उद्देश -**

**१.१** पाणलोट क्षेत्र विकासाच्या सर्वमान्य उद्दिष्टांसोबत पाणलोट विकासाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या कृषि आधारित स्वयंरोजगाराच्या संधीद्वारे समाज घटकांची आर्थिक उन्नती साधणे.

**१.२** ग्रामसभेच्या सहभागातून स्थानिक परिस्थिती व संसाधनांचा विचार करुन प्रकल्प नियोजन करणे. मृद व जलसंधारण (In situ व ex situ) या पध्दतीने कामासोबतच संसाधन आधारित स्वयंरोजगाराचे दिर्घकालीन नियोजन करणे.

**१.३** पाणलोट विकास कार्यक्रमाबरोबरच पाणलोट प्लस कार्यक्रमाचे नियोजन व त्याची अंमलबजावणी करणे. पाण्याच्या ताळेबंदाविषयी जनजागृती व सक्षमतेने पाणी वापर या संदर्भात प्रबोधन करणे.

**१.४** दीर्घकालीन शाश्वत रोजगार निर्मितीवर भर देणे.

**१.५.** दीर्घकालीन शाश्वत देखभाल दुरुस्ती कायमस्वरुपी सहभागी पद्वतीने करण्यासाठी पाणलोट देखभाल निधी उभारणे.

**२. सन २०१४-१५ साठी निश्चित केलेले लक्ष्य**

या योजनेसाठी सन २०१४-१५ या वित्तीय वर्षासाठी रुपये २२४०.०० लाख अर्थसंकल्पिय नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**(ई) साखळी पद्धतीने सिमेंट नालाबांध बांधणे**

राज्यातील टंचाई सदृश परिस्थितीवर मात करण्याच्या दृष्टिने भूगर्भातील पाण्याची पातळी २ मी. पेक्षा जास्त खाली गेलेल्या १५ तालुक्यात सिमेंट नालाबांध बांधण्याचा महत्वपूर्ण कार्यक्रम राज्यात राबविण्याचा निर्णय दि. १६ मे २०१२ रोजी घेण्यात आला. त्याअनुषंगाने शासन निर्णय दि. २९ मे २०१२ व दि. १६ ऑगस्ट २०१२ अन्वये या कार्यक्रमाकरिता रुपये १५०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदरचा कार्यक्रम लघू पाटबंधारे व मृद संधारण विभागामार्फत राबविण्यात आलेला असून १४९४ सिमेंट नाला बांधाची कामे पूर्ण झालेली आहेत. व रक्कम रु. १४२.८१ कोटी खर्च झाले आहेत.

या कार्यक्रमाकरिता गावे निवडण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून टँकरग्रस्त गावांना प्राधान्य देण्याबाबत निकष आहेत. या कार्यक्रमात **सांगली** जिल्ह्यातील जत, कवठेमहाकाळ, आटपाडी, खानापुर, कडेगाव व मिरज, **सातारा** जिल्ह्यातील खटाव आणि माण, **सोलापूर** जिल्ह्यातील मंगळवेढा व सांगोला, **पुणे** जिल्ह्यातील पुरंदर, **अहमदनगर** जिल्ह्यातील संगमनेर आणि पारनेर व **उस्मानाबाद** जिल्ह्यातील भूम या १५ तालुक्यांचा समावेश आहे.

३० मार्च २०१३ व २५ एप्रिल २०१३ चे शासन निर्णयानुसार सन २०१३-१४ मध्ये साखळी पद्धतीने सिमेंट नालाबांध बांधणेसाठी शासनाने रु. ८०.०० कोटी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर निधीतून सिमेंट नालाबांधाची कामे मृद संधारण विभागामार्फत करण्यात येत आहेत.

सन २०१४-१५ करिता साखळी पधदतीने सिमेंट नाला बांध बांधणेसाठी रु. २६१.०० कोटी निधी अर्थसंकलपीत करण्यात आलेला असून रक्कम रु. १५६.६० कोटी निधी उपलब्ध झालेला आहे. सदर निधीतून लघूपाटबंधारे विभाग व मृद संधारण विभागामार्फत साखळी पध्दतीने सिमेंट नालाबांधाची कामे करण्यात येत आहेत.

**२. केंद्र योजना :-**

**(अ) केंद्र पुरस्कृत नदी खोरे प्रकल्प योजना**

**१. योजनेची माहिती :-**

जमिनीच्या अतिधूपीमुळे जलसिंचन प्रकल्पात मोठया प्रमाणात गाळ साठून या प्रकल्पाचे अस्तित्व धोक्यात येत असल्यामुळे केंद्र शासनाने तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून ही योजना सुरु केलेली आहे. सदरची योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत आहे. आंतरराज्य स्तरावरील दमणगंगा, कोचमपाड, उकाई, नागार्जुन सागर, सरदा सरोवर या मोठ्या सिंचन प्रकल्पांचे पाणलोट क्षेत्रात (कॅचमेंट) सन १९९३-९४ पासून पाणलोट विकास कार्यक्रमांच्या धर्तीवर मृदसंधारणाची कामे करण्यात येत आहे. ही योजना सन १९७२-७३ पासून वन विभागाकडे होती. सन १९९३-९४ पासून सदरची योजना कृषि खात्याकडे वर्ग करण्यात आलेली आहे.

**२. योजनेचा उद्देश :-**

१. नदी खोरे प्रकल्पांचे जलग्रहण क्षेत्रामध्ये जमिनीचा ऱ्हास थांबविणे.

२. पाणलोट क्षेत्रामध्ये जमिनीची उत्पादन क्षमता व ओलावा टिकविण्याची क्षमता वाढविणे.

३. जमिनीची क्षमता विचारात घेवून जमिनीचा वापर करणे.

४. मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयात येणाऱ्या गाळांचे प्रमाण कमी करण्यासाठी जलग्रहण क्षेत्रावरील वापर वाढविणे.

५. पाणलोट क्षेत्र विकासामध्ये लोकसहभाग वाढविणे.

**३. योजनेची सन २०१२-१३ साठी केलेली आर्थिक तरतूद आणि झालेला खर्च व फलनिष्पत्ती :-**

सन २०१२-१३ वर्षासाठी रुपये ९५००.०० लाखाची श्वेत पुस्तिकेतील अर्थकल्पिय तरतूद होती. वर्क प्लॅन अंतर्गत रुपये ५८८.५८ लाख मंजुर करण्यात आलेले होते. राज्य शासनाकडून रुपये ५८८.५८ लाख प्राप्त झाले व माहे मार्च २०१३ अखेर रुपये ५८८.५८ लाख खर्च करण्यात आले आहेत. या योजनेंतर्गत ७५५५ हेक्टर क्षेत्रावर उपचार करण्यात येवून १३४४ स्ट्रक्चर्स पूर्ण करण्यात आले.

सन २०१३-१४ मध्ये रुपये ९५००.०० लाख अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली होती. राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत रक्कम रु. ५००.०० लाख निधी प्राप्त झाला असून, रक्कम रु. ४९७.४८ लाख निधी खर्च करण्यात आला आहे.

**४. योजनेची सन २०१४-१५ साठी निश्चित केलेले लक्ष :-**

केंद्र पुरस्कृत नदी खोरे सन २०१४-१५ वर्षासाठी श्वेत पुस्तिकेतील अर्थसंकल्पित तरतूद मंजुर करण्यात आली नाही. तथापि सन २०१४-१५ साठी मंजुर असलेले नविन पाणलोटीचा कार्यक्रम व सन २०१३-१४ अखेरचा शिल्लक कार्यक्रम असा एकूण रुपये ५५५१.९४ लाख रक्कमेचा कार्यक्रम राबविणे प्रस्तावित आहे. त्यासाठी राज्यनिधीतून निधी मागणी प्रस्तावित आहे.

**(ब) केंद्र पुरस्कृत पश्चिम घाट विकास कार्यक्रम :-**

पश्चिम घाट विकास कार्यक्रम हा १०० टक्के केंद्र पुरस्कृत कार्यक्रम महाराष्ट्रात सन १९७४-७५ पासून डोंगराळ भागाच्या विकासासाठी राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम महाराष्ट्रातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग, नाशिक, धुळे, नंदुरबार, सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे आणि अहमदनगर या १२ जिल्ह्यातील ६३ तालुक्यात राबविला जात आहे.

**१. कार्यक्रमाची ठळक उद्दिष्टे :-**

अ) पाणलोट क्षेत्र विकासाच्या सर्वसामान्य उद्दिष्टांसोबत पाणलोट विकासाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या कृषि आधारित स्वयंरोजगाराच्या संधीद्वारे समाजघटकाची आर्थिक उन्नती करणे.

ब) ग्रामसभेच्या सहभागातील, लोकसहभागातून, स्थानिक परिस्थिती व उपलब्ध नैसर्गिक व पायाभूत संसाधानाचा विचार करुन प्रकल्प नियोजन करणे, मृद व जलसंधारणांच्या कामासोबतच स्थानिक संसाधनावर आधारित स्वयंरोजगाराचे दिर्घकालीन नियोजन करणे.

क) पाणलोट विकास कार्यक्रमाबरोबरच पाणलोट प्लस कार्यक्रमाचे नियोजन व त्याची अंमलबजावणी करणे.

ड) पाण्याच्या ताळेबंदाविषयी जनजागृती व सक्षमतेने पाणीवापर यासंदर्भात प्रबोधन करणे.

इ) दिर्घकालीन रोजगार निर्मितीवर भर देणे व कृषि आधारित अर्थव्यवस्था बळकट करणे.

ई) दिर्घकालीन शाश्वत देखभाल दुरुस्ती कायमस्वरुपी सहभागी पद्धतीने करणेसाठी पाणलोट देखभाल निधी उभारणे.

**२. प्रकल्प व्यवस्थापन व अंमलबजावणी :-**

पाणलोट प्रकल्पाची सुयोग्य पद्धतीने व विहित कालमर्यादेत अंमलबजावणी करणेचे दृष्टीने प्रकल्पातील कामे पुढील प्रमुख तीन टप्प्यात करावयाची आहेत.

| | |
|---|---|
| १. पुर्वतयारीची कामे | : १ ते २ वर्षे |
| २. पाणलोट क्षेत्र कामे | : २ ते ३ वर्षे |
| ३. एकत्रिकरण व प्रकल्पोत्तर कामे | : १ ते २ वर्षे |

सन २००९-१० पासून मेगा पाणलोट धर्तीवर केंद्र शासनाच्या सामाईक मार्गदर्शक सूचना २००८ (सुधारित २०११) नुसार पश्चिम घाट विकास योजनेचे प्रकल्प हाती घेण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार सन २००९-१० मध्ये ७ नविन पाणलोट प्रकल्पास व सन २०१०-११ मध्ये ९ नविन पाणलोट प्रकल्पास शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर प्रकल्प पश्चिम घाट क्षेत्रात जलसंधारण, वने, सामाजिक वनीकरण संबधित विभागामार्फत राबविण्यात येतात.

**३. सन २०१३-१४ साठी निश्चित केलेले आर्थिक उद्धिष्ट व झालेला खर्च :-**

सन २०१३-१४ या वित्तिय वर्षामध्ये रु. १८७५.०० लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून खर्च रु. १८७५.०० लाख झालेला आहे.

**४. सन २०१४-१५ साठी निश्चित केलेले आर्थिक उद्धिष्ट :-**

सन २०१४-१५ साठी रक्कम रुपये २५००.०० लाख नियतव्यय शासनाकडून मंजूर असून निधी अप्राप्त आहे. सन २०१५-१६ साठी रुपये ३०००.०० लाख उद्दिष्ट प्रस्तावित आहे.

**(क) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP) :-**

केंद्र शासनाच्या सर्व विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांसाठी सामाईक मार्गदर्शक सूचना २००८ (सुधारित २०११) या दिनांक १ एप्रिल २००८ पासून लागू करण्यात आल्या. त्यानुसार केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भूसंसाधन विभागामार्फत (DOLR) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम सन २००९-१० पासून कार्यान्वित करण्यात आला आहे. या योजनेस केंद्र ९० टक्के आणि राज्य १० टक्के अशा प्रमाणात अर्थसहाय्य मंजूर आहे. सदर योजना वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा (VWDA) जी महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम २०१२ नुसार धर्मादाय आयुक्तांकडे पंजीकृत झालेली आहे, तिच्यामार्फत महाराष्ट्र राज्यात राबविली जात आहे.

**बॅच-१ (२००९-१०)** साठी केंद्र शासनाकडून एकूण २३९ प्रकल्पांना ९.८३ लाख हेक्टर क्षेत्रास मंजूरी दिली असून त्याचे प्रकल्प मूल्य रु. १२४० कोटी आहे. ऑक्टोबर २०१४ अखेर रक्कम रूपये ५०८.०० कोटी निधी प्राप्त झाला आहे. त्यापैकी रक्कम रू. ५५५.४५ कोटी निधी खर्च झाला आहे.

**बॅच-२ (२०१०-११)** साठी केंद्र शासनाकडून एकूण ३५९ प्रकल्पांना १५.६१ लाख हेक्टर क्षेत्रास मंजूरी दिली असून त्याचे प्रकल्प मूल्य रु. १९५७ कोटी आहे. ऑक्टोबर २०१४ अखेर रक्कम रूपये ७४०.०० कोटी निधी प्राप्त झाला आहे. त्यापैकी रक्कम रू. ६३९.९६ कोटी निधी खर्च झाला आहे.

**बॅच-३ (२०११-१२)** साठी केंद्र शासनाकडून एकूण २१५ प्रकल्पांना ९.३१ लाख हेक्टर क्षेत्रास मंजूरी दिली असून त्याचे प्रकल्प मूल्य रु. १९९५ कोटी आहे. ऑक्टोबर २०१४ अखेर रक्कम रुपये १७३.०० कोटी निधी प्राप्त झाला आहे. त्यापैकी रक्कम रु. २०२.९३ कोटी निधी खर्च झाला आहे.

**बॅच-४ (२०१२-१३)** साठी केंद्र शासनाकडून एकूण १२० प्रकल्पांना ५.२७ लाख हेक्टर क्षेत्रास मंजूरी दिली असून त्याचे प्रकल्प मूल्य रु. ६८३ कोटी आहे. ऑक्टोबर २०१४ अखेर रक्कम रूपये ६४.०० कोटी निधी प्राप्त झाला आहे. त्यापैकी रक्कम रू. २८.५६ कोटी निधी खर्च झाला आहे.

**बॅच-५ (२०१३-१४)** साठी केंद्र शासनाकडून एकूण ११६ प्रकल्पांना ५.१९ लाख हेक्टर क्षेत्रास मंजूरी दिली असून त्याचे प्रकल्प मूल्य रु. ६६५ कोटी आहे. माहे ऑक्टोबर २०१४ अखेर रक्कम रूपये २.६० कोटी निधी खर्च झाला आहे.

**बॅच-६ (२०१४-१५)** साठी केंद्र शासनाकडून ५.१९ लाख हेक्टर क्षेत्राचा लक्षांक दिलेला आहे. त्यासाठी ३५ जिल्ह्यातील ५.४२ लाख हेक्टर क्षेत्राचे व रक्कम रु. ६९६.६२ कोटीचे १२२ प्राथमिक प्रकल्प अहवालांना केंद्र शासनाची मंजूरी मिळाली आहे.

बॅच-१, ३ व ५ ला कमी पडलेला निधी बॅच-२ मधील उपलब्ध निधीतून वितरीत केला आहे.

केंद्र शासनास सन २०१४-१५ या वार्षिक कृति आराखडा रक्कम रु. ११८५.०० कोटीचा सादर करण्यात आला आहे. सन २०१५-१६ चा वार्षिक कृति आराखडा रु. १००० कोटीचा प्रस्तावीत असून त्यासाठी राज्य शासनाचे १० टक्के तरतूदीनुसार रु. १०० कोटी आवश्यक राहतील.

### (ड) राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम :-

राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यामध्ये आठव्या पंचवार्षिक योजनेपासून करण्यात येत आहे. नवव्या योजनेची अंमलबजावणी अतिम टप्प्यात असताना राष्ट्रीय पाणलोटविकास कार्यक्रमासाठी नविन मार्गदर्शक सूचना **वरसा जनसहभागिता** अमलात आल्या. या सुचनांची अंमलबजावणी १४ नोव्हेंबर, २००२ पासून करण्यात केंद्र शासनाने सुचविलेले होते. त्यानुसार राज्य शासनाने १० च्या पंचवार्षिक राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमासाठी सुधारित मार्गदर्शक सूचना लागू करण्यास दि. ३१ जानेवारी, २००२ शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे. यानंतर १ एप्रिल, २००८ पासून सामाईक मार्गदर्शक सूचना सदर योजनेसाठी लागू करण्यात आल्या असून त्याप्रमाणे मापदंडात बदल झाल्यामुळे एकूण प्रकल्प आराखड्यात बदल झाला आहे.

### योजनेचे उद्देश :-

**अ)** नैसर्गिक साधन संपत्तीचे तिच्या वापराच्या समावेशासह संधारण विकास आणि कायमस्वरुपी व्यवस्थापन.

**ब)** कृषिविषयक उत्पादकतेत वाढ करणे आणि शाश्वत पद्धतीने उत्पादन घेणे.

**क)** झाडे झुडपे व गवत योग्यरितीने एकत्रित करुन त्या क्षेत्रातील हिरवळीद्वारे पर्जन्याश्रयी पर्यावरण यंत्रणेत झालेला ऱ्हास आणि बिघडलेल्या पर्यावरणाचा समतोल पुन:स्थापन करणे.

**ड)** सिंचनाखाली आणि पर्जन्याश्रयी क्षेत्रामधील प्रादेशिक तफावत कमी करणे.

**इ)** भूमी हिनांचा समावेशासह ग्रामीण समुहासाठी कायम स्वरुपी रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

राज्यामध्ये दहाव्या पंचवार्षिक योजनेंतर्गत अंमलबजावणींसाठी एकूण ४३३ पाणलोंटापैकी ३२६ पाणलोट पूर्ण झालेले आहेत. प्रकल्प खर्चाच्या एकूण रक्कमेपैकी ७४९०.८९ लाख खर्च झाला आहे. उपचारित क्षेत्र १५५५२२३ हेक्टर इतके झालेले आहे. सन २००७-०८ ते २०११-१२ हा ११ च्या पंचवार्षिक योजनेचा कालखंड असून, १० व्या पंचवार्षिक योजनेतील ९८ अपूर्ण पाणलोट ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या प्रथम वर्षी म्हणजे सन २००७-०८ मध्ये पुर्णत्वासाठी हाती घेण्यात आले. ११ व्या पंचवार्षिक योजनेकरिता ३२४ नविन पाणलोट निवडण्यात आलेले आहेत. सन २००७-०८ ते २०१३-१४ या कालावधीमध्ये वितरीत अनुदान रुपये १३६३२.४३ लाख असून खर्च रु. १३५९५.६९ लाख इतका खर्च करण्यात आलेला आहे. सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेमधून ३५ अपूर्ण लघु पाणलोट पूर्ण करणेसाठी रुपये ६६५.४४ लाख निधी निधी मंजुर झालेला आहे. एप्रिल २००८ पासून केंद्र शासनाने सामाईक मार्गदर्शक सूचना नविन पाणलोट प्रकल्पांना लागू करण्यात आलेल्या असून नविन मार्गदर्शक सुचनांनुसार मापदंड प्रति हेक्टर रुपये १२०००/- इतका करण्यात आला आहे.

**राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत वर्षनिहाय प्राप्त अनुदान व खर्च (२००२-०३ ते २०१३-१४)**

| वर्षे | आर्थिक कार्यक्रम रू. लाखात | | | भौतिक कार्यक्रम हे. | |
|---|---|---|---|---|---|
| | कृति आराखड्यानुसार मंजूर कार्यक्रम | प्रत्यक्ष वितरीत निधी | खर्च | प्रकल्प आराखड्यानुसार भौतिक उदिष्ट | प्रत्यक्ष खर्चानुसार उपचारित क्षेत्र |
| २००२-०३ | १९५०.०० | ७००.२८ | ६८६.९५ | २०३६० | १४२२५ |
| २००३-०४ | ११००.०० | ८५०.०० | ८५०.०० | ४०७२० | १७६३६ |
| २००४-०५ | ११००.०० | १६००.०० | १६०९.३४ | ५५५८३ | ३३८९ |
| २००५-०६ | ९००.०० | १४००.०० | १३९९.३९ | २९०४५ | २९०३२ |
| २००६-०७ | १४४०.०० | २९४०.६१ | २९३७.३६ | २९८७५ | ६१००८ |
| २००७-०८ | १८९४.७४ | १८९४.७४ | १८६०.३८ | २९८७५ | ३११२२ |
| २००८-०९ | १५५४.४५ | १८६९.६४ | १८६७.३६ | ३१५७९ | १५५०३ |
| २००९-१० | १४००.०० | १४३९.६२ | १४३९.६२ | २८८६७ | ११११६ |
| २०१०-११ | २०७५.१० | २०७५.१० | २०७५.१० | १७२९२ | १७२९२ |
| २०११-१२ | १८५२.०७ | १८५२.०७ | १८५२.०७ | १५४३४ | १५४३४ |
| २०१२-१३ | १९०७.१६ | १९०७.१६ | १९०७.१६ | १५८९३ | १५८९३ |
| २०१३-१४ | आरकेव्हीवाय २०००.०० | १९९०.०० | १९९०.०० | १६५८० | १६५८० |
| २०१४-१५ | आरकेव्हीवाय ६६५.४४ | ०.०० | ०.०० | ५५४५ | ०० |
| **एकूण** | **१९८३८.७६** | **१८५२९.२२** | **२०४७४.७३** | **३३६६४८** | **२७८३१०** |

**योजनेची सन २०१३-१४ साठी निश्चित केलेले लक्ष :-**

सन २०१३-१४ पासून कृति आराखडा बंद झाल्यामुळे राष्ट्रीय कृषि विकास योजनेमधून सन २०१३-१४ करिता रुपये २०००.०० लाख निधी मंजूर झाला होता. तो १०० टक्के खर्च करण्यात आला आहे व सन २०१४-१५ करिता राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून रक्कम रू. ६६५.४४ लाख निधी मंजूर झालेला आहे.

